
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र.

प्रा. रा. का. बर्वे



# राजकीय हत्या

REFBK-0014449

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना :**— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 JUN 1976

[ क्र. मा. प. ]

# राजकीय हत्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३३२ वि: चारित्र
क्रमांक १२९५ नों. दि. १२.३.६५

प्रा. रा. का. बर्वे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४४४९

...ाशन
...णे २

REFBK-0014449

मूल्य चार रुपये

प्रकाशक
अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार पेठ
पुणे २.

●

मुखपृष्ठ
सुधाकर खामगांवाले

●

ठसे
व. सं. दाते
कलामुद्रण

●

सर्व हक्क लेखकाधीन

●

प्रकाशन
२६ जानेवारी १९६५

●

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५, टिळक रोड, पुणे २.

पं. महादेवशास्त्री जोशी

यांस—

# या पुस्तकाचा इतिहास

श्री. दि. बा. मोकाशी यांच्या रेडियो दुरुस्तीचे दुकानात फावल्या वेळांत रेडियो दुरुस्त केले जातात. नवे-जुने लेखक, प्रकाशक, मासिकांचे संपादक वगैरे साहित्यक्षेत्रातील शेतकरी व दलाल मंडळी मोकाशींच्या दुकानात आपली हजेरी लावून जातात.

एक दिवस मी असाच त्यांच्या दुकानात बसलो असता मोकाशींच्या मनांत एक कल्पना आली असे वाटले. रेडियो दुरुस्ती थांबवून ते उठले आणि रस्त्यावर पिंक टाकून मला म्हणाले.

“ काय रे ! लिंकन, केनेडी अशा खून झालेल्या व्यक्तींचे खून कसे झाले याची माहिती देणारं पुस्तक कसं जाईल ? ”

मला ती कल्पना लगेच पटली. मी प्रथम त्यांनाच विनंती केली. त्यांनीहि होकार दिला; पण तो रेडियोच्या गिऱ्हाइकांना दिलेल्या होकारासारखा वाटला. म्हणून मग मी ती कल्पना डोक्यांत ठेवून वावरू लागलो. नंतर प्रा. वर्वे यांचे केसरीतील लिंकन व केनेडी यांच्यावरील दोन लेख माझ्या वाचण्यात आले. लगेच मी त्यांची गाठ घेतली. वर्वे यांना ती कल्पना पटली व त्यांनी त्या कल्पनेला अतिशय परिश्रम घेऊन मूर्त स्वरूप दिले.

या पुस्तकाचा हा इतिहास.

— *अशोक महादेव जोशी*

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................

# श्रेयदान

या पुस्तकाची कल्पना श्री. अशोक महादेव जोशी यांची आहे. यामध्ये समाविष्ट करण्यांत आलेले श्री. लिंकन व श्री. केनेडी यांच्यावरील लेख मी 'केसरी'साठी लिहिले होते. त्यात पुष्कळ भर घालून व बदल करून ते या पुस्तकात समाविष्ट केले आहेत.

हे दोन लेख लिहिण्यामागील प्रेरणा केसरीच्या संपादक-मंडळांतील श्री. का. ना. सोमण यांची! श्री. केनेडींची हत्या झाल्यानंतर श्री. सोमण यांनी त्यांच्याविषयीं उपलब्ध असलेली सर्व माहिती माझ्या पुढे टाकली व मला लेख लिहायला सांगितले. एवढेंच काय; पण त्या लेखाचा स्थूल आराखडासुद्धा त्यांनी मला सांगितला होता.

हे दोन्ही लेख श्री. अशोक जोशी यांनी वाचले व नंतर त्यांनीं या पुस्तकाची कल्पना मला सांगितली. मी तात्काळ कामाला लागलो.

हे सर्व लिहिण्याच्या निमित्ताने पुष्कळ वाचन करावे लागले. पैकी श्री. ट्रॉट्स्की यांच्याविषयी कुतूहलाच्या पोटी मी पुष्कळसे

अगोदरच वाचले होते. पण इतर लेखांसाठी मला आवर्जून वाचन करणे भाग पडले. हे करतांना मला प्रामुख्याने दोन ग्रंथालयांचा उपयोग झाला. पहिले म्हणजे फर्ग्युसन कॉलेजचे ग्रंथालय व दुसरे म्हणजे 'केसरी मराठा ग्रंथालय'. या दोन्ही ग्रंथालयातील ग्रंथपाल श्री. चोरगांवकर व श्री. बर्वे यांनी मला हवी असलेली पुस्तके व इतर संदर्भ ग्रंथ, मासिके वगैरे निरलसपणे उपलब्ध करून दिली. इतकेंच काय; पण पुष्कळदा "अमुक माहिती अमुक एका ग्रंथांत सांपडेल" अशी उपयुक्त माहितीहि पुरविली. या दोन्ही ग्रंथपालांचे मनःपूर्वक आभार.

श्री. अशोक जोशी यांच्याच प्रयत्नांमुळे व प्रेरणेमुळे हे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

श्री. सोमण यांना त्यांचे आभार मानलेले आवडणार नाहीत. परंतु हे लेखन करीत असताना त्यांनी मला वेळोवेळीं प्रोत्साहन दिले आहे, मार्गदर्शन केले आहे. तें त्यांचे ऋण मी शिरीं वागवू इच्छितों.

— रा. का. बर्वे

# अनुक्रम


- गंगाधरशास्त्री पटवर्धन १
- अ‍ॅब्राहम लिंकन १७
- लिऑन ट्रॉट्स्की ३१
- यु आँग सॉन ५५
- दाग हॅमरशील्ड ८२
- प्रे. जॉन केनेडी ९८
- सॉलोमन बंदरनायके ६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि. ....................
१०८८९

# गंगाधरशास्त्री पटवर्धन

मराठ्यांच्या इतिहासात गंगाधरशास्त्री पटवर्धनांच्या खुनाला फार महत्त्व आहे. शास्त्र्याच्या खुनाचे निमित्त करून इंग्रजांनीं वजीराच्या मुसक्या बांधल्या आणि राजाला शह दिला.

ज्या पद्धतीने हे कृत्य उरकण्यात आले व पुरावा नष्ट करण्यात आला ते पाहिले म्हणजे या खुनाच्या मागे फार मोठी अक्कल होती असे दिसून येते

त्र्यंबकजी डेंगळे व शास्त्री यांची युति जमली असती तर या जोडीनें मराठी राज्याला लागलेले इंग्रजांचे खग्रास ग्रहण निश्चित दूर केले असते.

इतिहासांत कांही लोकांचे खून अशा वेळीं आणि अशा प्रकारे होतात की त्यामुळे संपूर्ण इतिहासाला एक वेगळें वळण लागतें. ज्या व्यक्तीचा खून होतो ती व्यक्ति जिवंत राहिली असती, तर कदाचित् कधीहि घडून आलें नसतें तेंच त्या व्यक्तीचा खून झाल्यामुळे घडून येतें. पेशवाईच्या अखेरीस झालेला गंगाधरशास्त्री पटवर्धन या शास्त्र्याचा खून हा अशा प्रकारचा खून आहे.

या गंगाधरशास्त्र्याचें मूळ घराणें मेणवलीचें! त्या वेळीं श्री. हरिपंत फडके यांचें घराणें मातबर व सरदारी. या हरिपंत फडक्यांच्या घराण्याचें पौरोहित्य मेणवलीच्या पटवर्धनांकडे होतें. श्री. कृष्णंभट पटवर्धन हे श्री. गंगाधरशास्त्र्यांचे वडील चांगले व्युत्पन्न ब्राह्मण होते. त्यांचा गंगाधर हा मुलगा चांगला चुणचुणीत व वळणदार हस्ताक्षर असलेला असा होता. पटवर्धनांचें पुण्याला येणें जाणें पुष्कळ असे. शिवाय ते श्री. हरिपंतांचे उपाध्याय असल्यामुळे अगदी लहानपणींच श्री. गंगाधर याला पुण्यास पेशव्यांचे वाड्यांत कारकुनाची नोकरी मिळाली. त्याची नेमणूक प्रथम कर्नाटकाचे स्वारीचे दप्तरांत करण्यांत आली होती.

पुढे शास्त्र्यांचा मुलगा कारकुनी करतो म्हणून राग धरून श्री. हरिपंत फडके यांनी त्यांच्या घराण्याचें पौरोहित्य काढून घेतलें. पण याचा गंगाधरास राग आला व त्याने नोकरी सोडून वाईला प्रयाण केलें. तेथे सात-आठ वर्षें राहून त्याने शास्त्राध्ययन केलें. गंगाधर बुद्धिमान् असल्यामुळे शास्त्राध्यनांतहि त्याने अल्पकालांत वाखाणण्याजोगी प्रगति केली व तो पुनः पुण्यास आला.

मध्ये कांही वर्षें श्री. गंगाधरशास्त्री जरी पुण्याच्या बाहेर होता, तरी त्याला पुण्यांतील सर्व घडामोडींची अगदी बित्तंबातमी असे. पुण्यास आल्यावर पुनः

त्याला दरबारीं नोकरी मिळाली. बाळोजी कुंजीराबरोबर दोस्तीचे संबंध ठेवून त्याने आपलें बस्तान बसवायला सुरवात केली. एवढेंच काय, पण प्रत्यक्ष श्रीमंतांची सुद्धा मर्जी संपादन करण्यांत त्याने यश मिळविलें.

पुण्यांत अशा तऱ्हेने त्याचें चांगलें बस्तान बसत असतां एक अनपेक्षित घटना घडली. नाना फडणविसांचे मेहुणे श्री. दादा गद्रे हे पुण्यांत प्रसिद्ध होते. पुण्यांत आता खुन्या मुरलीधर या नांवाने प्रसिद्ध असलेलें देऊळ त्यांनीच बांधिलें होतें. गद्रे यांचें घराणें सावकारीबद्दल त्या वेळीं फार प्रसिद्ध होतें. या दादा गद्रेंची एक रखेली होती. ही रखेली ऐन जवानींत असलेल्या गंगाधरशास्त्र्यावर फिदा झाली. त्याच्यावरून जीव ओवाळून टाकावयाससुद्धा तिने मागेपुढे पाहिलें नसतें असें म्हणतात.

याचा परिणाम असा झाला कीं, या दादा गद्र्यांची व त्यामुळेच नानांची गंगाधरशास्त्र्यावर गैरमर्जी झाली. त्या वेळीं नाना व गद्रे हीं दोन्हीं प्रस्थेंच होतीं. त्यांची गैरमर्जी असतांना पुण्यांत सुखरूप राहणें हें फार कठीण होतें हें ओळखण्याइतकी धूर्तता व दूरदृष्टि गंगाधरशास्त्र्यापाशी खासच होती. योग्य संधि मिळतांच आपल्याला पुण्यांतून आपला गाशा गुंडाळणें आवश्यक आहे हें त्याने बरोबर हेरलें.

१७९४ च्या सुमारास बडोद्याच्या गायकवाडीचा कारभार गोविंदराव गायकवाड यांचेकडे होता. १७९३ सालीं नानांनीच त्यांना सेनाखासखेलचीं वस्त्रे देवविलीं होतीं. पुण्याहून जेव्हा गोविंदराव गायकवाडांची बडोद्याला रवानगी करण्यांत आली तेव्हाच नानांनी त्यांच्या मदतीसाठी रावजी अप्पाजी फणसे या गृहस्थांस कारभारी म्हणून पाठविलें. या फणसे घराण्याचा व पटवर्धन कुटुंबाचा पूर्वीपासून घरोबा होता. रावजी अप्पाजीचा मुलगा सीताराम हा तर गंगाधरशास्त्र्याच्या बरोबरीचाच होता. त्यामुळे जेव्हा फणसे घराणें बडोद्यास जावयास निघालें तेव्हा पुण्याहून पटवर्धनसुद्धा त्यांच्याबरोबर निघाले. कारण गंगाधरशास्त्री व त्यांचे वडील यांची अशी खात्री पटली होती की, आपला इतःपर पुण्यांत निभाव लागणें शक्य नाही.

इ. स. १८०० च्या अखेरीस गोविंदराव गायकवाड मरण पावले. गायकवाडांना औरस अनौरस संतति पुष्कळ होती. त्यांच्या हयातींतच त्यांचेपैकी कांहींनी उघड उघड बंडें केलीं होतीं. ही बंडाळी कह्यांत ठेवतां यावी म्हणून

गायकवाडांनी फणसे यांच्या मार्फतीनेच कांही अरबी फौज नोकरीस ठेविली होती. या अरबी फौजेने गोविंदराव गायकवाड वारतांच बंडावा करावयास सुरवात केली. शिवाय गोविंदरावांच्या मुलांनीहि दौलतीसाठी बंडावा करावयास सुरवात केली. या सर्वांचा बंदोबस्त करण्यासाठी गायकवाडांना टोपीकर इंग्रजांची मदत घेणें भाग पडलें.

इंग्रज कुणालाहि फुकट मदत करणें शक्यच नव्हतें. कंपनीतर्फे मेजर वॉकर यांनी आनंदराव गायकवाड यांचेकडून अशा प्रकारचा तह लिहून घेतला की, त्यामुळे गायकवाड हे पूर्णपणें इंग्रजांचे ताबेदार झाले. इंग्रज येतांच त्यांनी प्रथम रावजी अप्पाजी फणसे यांचा चांगला जम बसवून दिला. असें करणें इंग्रजांचे दृष्टीने अतिशय दूरदृष्टीचें होतें. कारण प्रत्यक्ष कारभारीच अशा तऱ्हेने इंग्रजांच्या अंकित झालेला असल्यामुळे बडोदेकर गायकवाड शिरजोर होतील अशी धास्ती बाळगण्याची इंग्रजांना जरूर उरली नाही.

रावजी अप्पाजी फणसे यांचा सीताराम हा दत्तकपुत्र होय. या फणसे घराण्याची एकजूट चांगली होती. रावजींचा पुतण्या सखाराम व चुलता काकाजी हे समशेरबहाद्दर होते. या सर्वांच्या एकोप्याच्या वागणुकीमुळे इंग्रजांवरसुद्धा रावजी अप्पाजींचा चांगला वचक होता. याचा उपयोग करून रावजी अप्पाजींनी गंगाधरशास्त्री यास १८०३ सालीं दरमहा शंभर रुपये पगारावर गायकवाडांचा दरबारी वकील नेमून घेतलें.

दरबारी वकील म्हणून गंगाधरशास्त्र्याची नेमणूक झाल्यापासून त्याचा झपाट्याने उत्कर्ष झाला. गायकवाडांच्या रेसिडेंटशी त्याला वरचेवर बोलण्याचा प्रसंग पडूं लागला. त्यामुळे त्याने इंग्रजी शिकून घेतलें. पुढे रावजी अप्पाजींचा मुलगा सीताराम यास बडोद्याची दिवाणी मिळाली, पण त्याचा जम बसला नाही, कारण इंग्रज फार सावधगिरीने आपला कारभार करीत होते. त्यांनी बडोदेकरांच्या वंशजांचा युक्तिप्रयुक्तीने व तलवारीच्या जरबेने चांगला बंदोबस्त केला. हें सर्व घडून येत असतांना गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचा इंग्रजांस अतिशय उपयोग झाला.

१८०६ सालीं बडोद्याचा कारभार पाहण्यासाठी मेजर वॉकर याने रीजन्सी कौन्सिल नेमिलें. या कौन्सिलमध्ये स्वतः मेजर वॉकर तर होताच, पण नेटिव्ह असिस्टंट म्हणून गंगाधरशास्त्र्याचाहि त्यांत समावेश होता. १८०३ सालीं

शास्त्र्याचा कारभारांत प्रवेश झाला व १८०६ सालीं त्याची रीजन्सीमध्ये नेमणूक झाली ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे शास्त्र्याच्या चातुर्याची कल्पना येते.

या रीजन्सीचा कारभार सुरू झाल्यापासून बडोदें राज्यांत इंग्रजांचें फार वर्चस्व झालें. संस्थानचे पूर्वीचे अधिकारी नुसते नामधारी बनले. खरी सत्ता इंग्रजांकडे गेली. हें सर्व पूर्वीचे अधिकारी उघड्या डोळयांनी पाहात होते, पण इंग्रजांविरुद्ध कांही उठाव केल्यास तो यशस्वी होईल असें दिसेना. १८०६ सालापासून १८१२।१३ सालपर्यंत निरनिराळ्या लोकांनी इंग्रजांना बडोद्यांतून हाकून देण्याचे प्रयत्न केले, पण ते सर्व अयशस्वी झाले. हे प्रयत्न निष्फळ ठरण्यास गंगाधरशास्त्री हा पुष्कळअंशी कारणीभूत होता. कारण कोणती व्यक्ति कोणत्या प्रकारचा उद्योग करीत आहे, त्याची कुवत किती आहे, कुणाचें बल किती इत्यादि गोष्टींचें अचूक ज्ञान गंगाधरशास्त्र्यास होतें. त्यामुळे इंग्रजांस त्याचा उत्तम उपयोग झाला. इंग्रजांनी खूष होऊन गंगाधरशास्त्र्याला सालिना साठ हजार रुपयांचा तनखा ठरवून दिला. यावरून त्यांना त्याचा किती उपयोग झाला असेल, याचा अंदाज येतो.

या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की, बडोद्यांतील लोकांना गंगाधर-शास्त्र्याचा मनापासून तिटकारा येऊं लागला. गंगाधरशास्त्र्यामुळेच इंग्रजांचें राज्य बडोदें संस्थानच्या बोकांडीं कायमचें बसणार अशी बडोदेकरांना भीति वाटूं लागली. परंतु त्याचें पारिपत्य त्यांना करतां येईना, कारण इंग्रजांची त्याच्यावर बहाल मर्जी होती. त्याच्यामार्फत बडोद्यांतील यच्चयावत् बित्तं-बातमी इंग्रजांना कळत असे, त्यामुळे गंगाधरशास्त्री बडोद्यांतून निघून जाईल तर बरें असें सर्वांना होऊन गेलें होतें

गंगाधरशास्त्र्याला बडोद्यांतून बाहेर पडण्यास आवश्यक ती पार्श्वभूमि अशा तऱ्हेने तयार झालेली असतांनाच पुण्याचे पेशवे व बडोदेकर गायकवाड यांच्यामध्ये वाद सुरू झाला. पेशव्यांनी अहमदाबादची व्यवस्था गायकवाडांकडे दिलेली होती. ही व्यवस्था दहा वर्षांसाठी देण्यांत येई. ती मुदत १८१४ सालीं संपत होती. बाजीरावाला असें वाटलें की, बडोद्याच्या बदललेल्या परिस्थितींत जर आपण अहमदाबादेची सुभेगिरी पूर्वीप्रमाणेच बडोदेकरांकडे ठेविली, तर तीहि इंग्रजांच्या ताब्यांत जाईल व आपण आपल्या हक्काला कायमचें मुकूं, म्हणून बाजीरावाने त्याबद्दल वाद आरंभिला होता.

गायकवाडांना पुणेकर पेशव्यांचें पुष्कळ कर्ज झालें होतें. वेळोवेळी द्यावयाच्या नजराण्याची ५६ लाख रुपये रक्कम साटली होती. शिवाय मागचें कांही कर्ज होतें. याचा निकाल लावणें जरूर होतें. हें सर्व कर्ज सुमारे चार-पांच कोटींच्या घरांत जात होतें आणि हें सर्व कर्ज गायकवाडांनी एक-रकमी परत करावें, असा बाजीरावाने तगादा लावला होता. शिवाय कर्जाच्या हिशेबांत गोंधळ होता. हें सर्व प्रकरण कसें मिटतें, यावर बडोद्यांतील इंग्रजांचें वस्तान अवलंबून होतें. या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन इंग्रजांचें हित राखणारा म्हणून पेशव्यांशी वाटाघाटी करण्यास गंगाधरपंतास पाठविण्यांत आलें. इंग्रजांना गंगाधरशास्त्र्याच्या नेमणुकीस हरकत घेण्याचें कांहीच कारण नव्हतें. बडोद्यांतील इतर मुत्सद्द्यांना “ या कारणाने का होईना, पण शास्त्री बडोद्याबाहेर पडतो तर पडूं द्या ” असें वाटत होतें. त्यामुळे त्यांनीहि गंगाधर-शास्त्र्याच्या या नेमणुकीस हरकत घेतली नाही. खुद्द गंगाधरशास्त्री पुण्यांत यावयास फारसा उत्सुक नव्हता, परंतु इंग्रजांनी त्याच्या सुरक्षिततेची हमी घेतांच तोहि कबूल झाला, कारण ज्या पुण्यांतून त्याला जीवभयाने व एक साधा कारकून म्हणून पळून जावें लागलें होतें त्याच पुण्यांत त्याला बडोदेकर गायकवाडांचा वकील म्हणून इतमामाने मिरवतां आलें असतें. बडोद्याहून निघून शास्त्री मुंबईला गेला. तेथे त्याने गव्हर्नरांची भेट घेतली व तो १८१४ च्या फेब्रुवारी महिन्यांत पुण्यांत येऊन दाखल झाला.

पुण्यांत बाजीरावाला बडोद्याची बित्तंबातमी असे. त्यावरून या शास्त्र्याचें बडोद्यांत केवढें प्रस्थ होतें याची त्याला कल्पना होती. शिवाय बडोद्यांतील सखाराम, राणी तख्ताबाई, भगवंतराव वगैरे लोकांनी बाजीरावाशी संधान राखलें होतें. या सर्वांच्या बोलण्यावरून गायकवाडीवर पेशव्यांचा पूर्ववत् अंमल सुरू करावयाचा असेल, तर गंगाधरशास्त्र्यास तेथून हलविलें पाहिजे, असें बाजीरावाचे मनाने घेतलें होतें. त्यामुळे त्यानेहि गंगाधरशास्त्र्यास वाटाघाटी-साठी पुण्यास पाठवून द्या असें सांगितलें होतें. त्यामुळे गंगाधरशास्त्री पुण्यांत येऊन दाखल होतांच बाजीरावासहि एक प्रकारे आनंदच झाला.

गंगाधरशास्त्री पुण्यांत येऊन दाखल होतांच, पुण्यास त्या वेळीं मुक्काम ठोकून असलेल्या एल्फिन्स्टन साहेबास भेटला. इंग्रजांचा गुजराथेंत ठिकठिकाणी मुलख होता, त्यामुळे अहमदाबादची सुभेगिरी बडोदेकरांकडे राहणें त्यांच्या दृष्टीने

फायद्याचें होतें. कारण बडोद्यांत त्यांच्याच मसलतीने कारभार चालत होता, त्यामुळे अहमदाबादची सुभेगिरी जर बडोदेकरांकडे राहिली, तर ती आपल्या-कडेच असल्यासारखी आहे, असा त्यांचा समज होता.

पण बाजीरावहि हें ओळखून होता. तसेंच बाजीरावाचा विश्वासू व कर्तृत्व-वान कारभारी श्री. त्र्यंबकजी डेंगळे हासुद्धा याबाबत पूर्णपणे जागरूक होता. काय वाटेल तें झालें, तरी मराठी राज्य टिकवायचेंच अशा जिद्दीने तो कामास लागला होता. त्यामुळे गंगाधरशास्त्री व एल्फिन्स्टन या दोघांचे राज-कारणी डाव तो पुरे ओळखून होता.

अहमदाबादेची सुभेगिरी आपणांस मिळावी म्हणून त्या वेळीं पुष्कळ लोकांनी खटपट चालविली होती. बडोदेकरांमार्फत गंगाधरशास्त्री पटवर्धन व इतर लोक बाजीरावाकडून ही सुभेगिरी उकळण्यासाठी प्रयत्न करीत होतेच, पण खुरशेटजी मोदीसारखा मध्यस्थहि ती आपणाला मिळावी अशी खटपट करीत होता. परंतु बाजीरावाने कुणालाच दाद दिली नाही.

बाजीरावाने अहमदाबादच्या सुभेगिरीची मुदत संपेपर्यंत या ना त्या कारणाने गंगाधरशास्त्र्याची गाठच घेतली नाही व शेवटी जेव्हा ती मुदत भरली तेव्हा ती सुभेगिरी त्याने श्री. त्र्यंबकजी डेंगळे यांजकडे लावून दिली. त्र्यंबकजी कारभारास फार चोख होता. त्याने आपल्यातर्फे विठ्ठल नरसिंह याला अहमदाबादची व्यवस्था पाहण्यासाठी पाठवून दिलें.

गंगाधरशास्त्री ज्या दोन कामांसाठी मुख्यतः पुण्यांत आला होता, त्यांपैकी एक तर अशा तऱ्हेने बारगळलेंच. या सर्व प्रकरणांत एका प्रश्नाची तड लावून घेण्याची बाजीरावाची खटपट होती. तो प्रश्न म्हणजे गायकवाडीवर अंतिम सत्ता कुणाची ? गायकवाड हे पेशव्यांचे सरदार आहेत, म्हणून गायकवाडांवर सत्ता पेशव्यांचीच आहे असें बाजीराव व त्याच्यातर्फे बोलणीं करणारा त्र्यंबकजी डेंगळे यांचें मत होतें.

इंग्रजांचें असें म्हणणें होतें की, गायकवाडांनी इंग्रजांशी स्वतंत्र तह करून जी व्यवस्था मान्य केली आहे, त्यांत ढवळाढवळ करण्याचा बाजीरावाला बिलकुल अधिकार नाही. परंतु हें म्हणणें बाजीराव मान्य करीत नसे, कारण गायकवाड जर पेशव्यांचे सरदार हें मान्य केलें, तर त्यांना पेशव्यांच्या संमती-शिवाय इंग्रजांबरोबर कोणत्याहि प्रकारचा तह करतांच येत नाही व जर असा तह

त्यांनी केलाच, तर तो कायदेशीर ठरत नाही. या वादांत पेशव्यांची बाजू न्यायाची होती, पण इंग्रज हे शिरजोर होते व त्यांचाच गंगाधरशास्त्र्यास पाठिंबा होता. गंगाधरशास्त्र्याची ही सर्व पार्श्वभूमि लक्षांत घेऊनच त्याच्याशी बाजीराव वागत होता.

गंगाधरशास्त्र्याने आपला मुक्काम लकडी पुलाजवळ ठेवला होता. सभोवताली यशवंतरावजी मांढरे, मानसिंगराव जाधव, बापू मैराळ, रावजी मराठे वगैरे बडोदेकर मानकऱ्यांचे तंबू होते. मध्यभागी शास्त्र्याचा शामियाना होता. एखाद्या लष्करी तळासारखें त्याच्या डेऱ्याला स्वरूप आलें होतें. अरब व गायकवाडी स्वार यांचा जागता पहारा ठेवण्यांत आला होता. शास्त्री मोठ्या ऐटीने पुण्यांत राहिला होता. एल्फिन्स्टन साहेबाबरोबर त्याचीं नित्य खलबतें चालत.

बाजीरावासाठी त्याने बडोदेकरांकडून नजराणा आणिला होता व तो बाजीरावाने इंग्रजांदेखत स्वीकारावा, असा शास्त्र्याचा आग्रह होता. तें बाजीरावाला आणि त्र्यंबकजी डेंगळ्याला बिलकूल पसंत नव्हतें. तरीपण आपल्याला भेटायला आलेल्या आपल्या सरदारांच्या वकिलांचा आपणहून पाणउतारा करूं नये, म्हणून बाजीरावातर्फे भाऊ माणकेश्वर या कारभाऱ्यांनी शास्त्र्याची भेट घेतली होती. पण शास्त्र्याला प्रत्यक्ष बाजीरावाची भेट घेणें आवश्यक होतें, म्हणून शास्त्री पुण्यांत तळ देऊन होता. संधि साधून तो बाजीरावाने आपणांस भेट द्यावी, असा लकडा लावीत होता.

त्र्यंबकजी डेंगळे हें सर्व ओळखून अतिशय सावधगिरीने त्याच्याशी वागे. शास्त्र्यास पुण्यांत येऊन उणेपुरे आठ-नऊ महिने झाले, तरी पेशवे दिवस-गत करून आपली भेट घेत नाहीत हें चांगलें लक्षण नाही हें ओळखून शास्त्र्याने "आपणांस आपल्या धन्यांकडून जरवेचीं पत्रें येतात, सबब श्रीमंतांनी आम्हास समक्ष भेटीची संधि देऊन आमच्या कामाचा तावडतोबीने फडशा पाडावा" असा निरोप पाठविला. शेवटी बाजीरावाने भरदरबारांत शास्त्र्याची भेट घ्यावयास मान्यता दिली.

गंगाधरशास्त्री पुण्यांत मोठ्या दिमाखाने राही. मध्यम उंचीचा, तांबूस गोऱ्या वर्णाचा, धारदार नाकाचा व कावेबाज डोळ्यांचा शास्त्री करवतकाठी धोतर परिधान करी. वर रेशीमकाठी उपरणे घेई. डोक्याला लाल पगडी व कानांत

बोराएवढ्या मोत्यांची भिकबाळी घाली. बोलण्याचालण्यांत तर तो फारच तरबेज होता. कुणाचीहि भीड त्याला वाटत नसे. वाटेल त्याला तो उलट उत्तर करी. बोलण्यांत मधून मधून इंग्रजी शब्द वापरण्याची त्याला सवय होती. कुणालाहि तो " डॅम रास्कल " असें म्हणे. पेशवे व त्यांचे कारभारी यांना तर तो उघडउघड मूर्ख म्हणे. पूर्वी पुणेकरांनी त्याचा पाणउतारा केला होता. दुसऱ्याला तुच्छ लेखण्याची, पाणउतारा करण्याची पुणेकरांची ही जुनी खोड शास्त्र्याच्या चांगली परिचयाची होती. आपल्या अपमानाचा तो सूड उगवीत होता, बदला घेत होता, असें म्हटलें, तरी चालेल. कारण टोपीकर इंग्रजांचा त्याला पाठिंबा होता.

श्रीमंतांनी भरविलेल्या दरबारला जातांनासुद्धा शास्त्री अशाच दिमाखाने गेला. पांढऱ्याशुभ्र उमद्या घोड्यावर रेशमी लगाम धरून शास्त्री मोठ्या ऐटीने मध्यभागी चालला होता. पुढे-मागे पूर्वीच्या इतमामानुसार हत्ती, कर्णे, स्वार व इतर लोक होते, पण या सर्वांत शास्त्र्याची ऐटबाज मूर्ति उठून दिसे. त्याने सारा थाट असा केला होता कीं, सारें पुणें थक्क होऊन त्याच्याकडे पाहात राहिलें.

श्रीमंतांनी शास्त्र्याची भर दरबारांत भेट घेतली, परंतु शास्त्र्याला बडोदे-करांचा मुतालिक म्हणून मान्यता द्यावयास श्रीमंत कबूल होईनात. त्यावरच वादंग माजलें व शेवटी शास्त्री हा बडोदेकरांचा वकील आहे असें श्रीमंतांनी मान्य केलें. आणि तेवढ्यावरच भेट संपली.

शास्त्र्याच्या पुण्यांतील मुक्कामाचा कांहीं उपयोग होईल, असा रंग दिसेना. अहमदाबादची सुभेगिरी तर हातची गेलीच होती. ज्या पद्धतीने बोलण्याची सुरवात झाली होती, त्या पद्धतीवरून कर्जाचा फैसला होईल असेंहि शास्त्र्यास वाटेना. तशांत एल्फिन्स्टनने शास्त्र्याला सांगितलें कीं, तुमच्या मध्यस्थीचा कांही उपयोग होईल असें वाटत नाही, तर तुम्ही बडोद्यास परत जा. बडोद्याला परत जाणें हें शास्त्र्याच्या दृष्टीने अगदी अयोग्य असें होतें; कारण त्यामुळे शास्त्र्याचें बडोद्यांत असलेलें सर्व वजन नष्ट झालें असतें. म्हणून शास्त्र्याने आणखी कांही दिवस पुण्यांत राहावयाचें ठरविलें.

शास्त्री जरी इंग्रजांचा अंकित असला, तरी फार धूर्त आहे राजकारण-धुरंधर आहे, याची कल्पना त्र्यंबकजी डेंगळयाला आलेली होती. म्हणून

त्याला असें वाटे की, जर याला आपल्या बाजूला वळवितां आलें तर काय बहार होईल. या प्रयत्नाला त्र्यंबकजी डेंगळे लागला होता. त्याला फार प्रयत्न करावे लागले नाहीत. शास्त्र्याच्या मनांत देशभक्तीचा अंकुर अजून शिल्लक होता. तसेंच तो धूर्त होता. कारण ज्या कामासाठी तो पुण्याला आला होता तें काम समाधानकारक रीतीने होणार नाही, निदान त्र्यंबकजीच्या हातीं कारभार असेपर्यंत तरी होणार नाही, याची त्याला खात्री होती. शिवाय त्र्यंबकजीने असें आमिष दाखविलें की, जर शास्त्री पेशव्यांचे मसलतींत आला, तर त्याला पेशव्यांचे मुख्य कारभारी नेमण्यांत येईल. शास्त्री नुसताच धूर्त नव्हता, तर तो महत्त्वाकांक्षीहि होता. पुण्यांत पेशव्यांचा कारभारी म्हणून मिरविण्याची कल्पना त्याला फारच सुखद वाटली. त्यामुळे शास्त्र्याने पेशव्यांना मिळण्याचें अभिवचन दिलें. इंग्रजांसारख्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या असामीला डावलून किंवा त्यांच्याशी उघडउघड शत्रुत्व पत्करून पेशवेपक्षाला मिळण्याची हिंमत त्या काळांत धरणें ही गोष्ट सामान्य नव्हती. यावरूनहि शास्त्र्याच्या हिमतीची, साहसी वृत्तीची व जबर महत्त्वाकांक्षेची कल्पना येते.

शास्त्री व त्र्यंबकजी यांचे संबंध मैत्रीचे होतांच त्यांचें येणें-जाणें वाढलें. शास्त्र्याला श्रीमंतांनी पक्तीला जेवायला बोलाविलें, त्या वेळी संभाषणांत शास्त्र्याने आपल्या चातुर्याने श्रीमंतांना खूष केलें. श्रीमंतांना त्र्यंबकजीची निवड अचूक आहे, याची खात्री पटली. विडे देऊन झाल्यावर शास्त्र्याने एक अर्जी केली. श्रीमंतांनी ती मंजूर केली. शास्त्र्याने सांगितलें की, आपल्या मुलाची पुण्यांत मुंज करावी, अशी इच्छा आहे, तर आपण मुंजीला हजर राहून उपकृत करावें. श्रीमंतांनी त्याला होकार भरला.

असें सर्व चालू होतें. शास्त्र्याचें पेशव्यांशी सूत जमतांच त्याचें संगमावरील एल्फिन्स्टन साहेबाकडील जाणें-येणें कमी झालें. साहेबाच्या लक्षांत हा बदल आल्याशिवाय राहिला नाही. त्याने हेर वाढविले. त्र्यंबकजी डेंगळे व शास्त्री या दोघांचीहि बित्तंबातमी काढण्यासाठी त्याने आपलें सर्व बुद्धिचातुर्य पणास लाविलें.

शास्त्र्याने आपल्या मुलाची मुंज पुण्यांत मोठ्या थाटाने केली. बडोदें, नाशिक, त्र्यंबकेश्वर, वाई इत्यादि ठिकाणांहून व्युत्पन्न ब्राह्मण आले होते. त्यांना भरपूर दक्षणा व शालजोड्या देऊन शास्त्र्याने त्यांची संभावना केली.

शास्त्र्याला मिरविण्याची फार हौस होती. या मुंबींत ती सर्व हौस त्याने भागवून घेतली.

श्रीमंतांच्या मनांत शास्त्र्याला पुरा अंकित करून टाकायचा होता, म्हणून श्रीमंतांनी आपल्या मेहुणीचा शास्त्र्याच्या मुलाशी विवाह घडवून आणायचा घाट घातला. शास्त्र्याने याला एकदम संमति दिली. श्रीमंतांच्या पत्नीच्या धाकट्या बहिणीचें शास्त्र्याच्या मुलाशी लग्न ठरल्याची बातमी हा हा म्हणतां सर्वत्र पसरली. इंग्रज व बडोदेकर यामुळे अस्वस्थ झाले. बडोदेकर इंग्रजांच्याच सल्ल्याने चालत, त्यामुळे त्यांना हा संबंध घडून आलेला नको होता. शास्त्र्याला वाटाघाटी संपवून ताबडतोब परत या, असा बडोद्याहून खलिता आला. शास्त्र्याला त्यांनी स्पष्टपणें कळविलें की, जर तुम्ही पेशव्यांचे आप्त झालांत, तर तुम्हाला आमच्या हितापेक्षां पेशव्यांच्या हिताची अधिक मातब्बरी वाटेल. या सर्व गोष्टींचा परिणाम फार वाईट झाला.

लग्नाची सर्व तयारी झाली होती. नाशिकला लग्न व्हायचें ठरलें होतें. निमंत्रणें गेलीं होतीं आणि एवढ्यांत पेशव्यांची भेट घेऊन शास्त्र्याने हें लग्न होणार नाही, असें सांगितलें. त्र्यंबकजी डेंगळे व पेशवे हे नाराज झाले. पण शास्त्र्याला तसें केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. आपली भूमिका शास्त्र्याने या दोघांना पटवून दिली. राजकारणांत अधून मधून आवश्यक तेव्हा माघार घ्यावी लागते हें जाणून त्र्यंबकजी गप्प बसला.

श्रीमंतांनी आषाढीच्या वारीला पंढरपुरीं जावयाचें ठरविलें. शास्त्र्यानेहि बडोदेकरांची आणखी महिना दोन महिने राहून वाटाघाटी चालू ठेवण्यास परवानगी मिळविली. एल्फिन्स्टन साहेबाच्या सूचनेवरून शास्त्र्याला तशी परवानगी मिळाली. त्र्यंबकेश्वरची यात्रा आटोपून श्रीमंत ज्येष्ठ वद्यांत पंढपुरास जावयास निघाले. बरोबर त्र्यंबकजी डेंगळे व शास्त्री होते. शास्त्र्याबरोबर बापू मैराळ हा मदतनीस होता. हा बापू मैराळ मोठा धूर्त व सर्व अंतःस्थ हालचाली ओळखून होता. त्याने शास्त्र्यास सावध केलें.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे पेशव्यांबरोबर एल्फिन्स्टन होता, परंतु बाजीरावाने त्यासहि चतुराईने बाजूला सारिलें. पंढरपुरास जाऊन मुक्काम करतांच बाजीरावाने आपल्या भोवतालचा पहारा अतिशय कडक केला. बडोदेकरांचा कारभारी सीताराम रावजी याच्यातर्फे गोविंदराव बंधुजी व भगवंतराव हेहि पेशवेदरबारी

शास्त्र्याची मसलत फुकट जावी व बडोदेकरांचा वाद त्यांना फायदेशीर होईल अशा तऱ्हेने सुटावा म्हणून खटपट करीत होते. तेहि पंढपुररास गेले. त्यांना तेथे पाहतांच शास्त्र्याला फार वाईट वाटलें. त्याने त्र्यंबकजी डेंगळयास तसें सांगितलेंहि, पण त्र्यंबकजीने त्यांना घाबरण्याचें कांही कारण नाही असें सांगितलें. परंतु दरम्यानच्या काळांत शास्त्र्याला गोविंदराव बंधुजी यांच्याकडून बडोदेकर तख्ताबाईस लिहिलेला एक खलिता सापडला. त्यांत लिहिलें होतें की, आता शास्त्री कांही बडोद्यास जिवंत येत नाही. हा खलिता मिळाल्यापासून शास्त्री अस्वस्थ झाला, पण वरकरणी तसें न दाखवितां शास्त्री अधिक बंदोबस्ताने राहूं लागला.

आषाढ शुद्ध अष्टमीस श्रीमंतांस पंढरपुरीं मेजवानी झाली. त्या मेजवानीला शास्त्री हजर होता, परंतु त्यानंतर मात्र "आपली प्रकृति बरोबर नाही" या सबबीवर तो कुणाचीहि भेट घेईना. पुढे १७, जुलै, १८१५ रोजी आषाढी एकादशी होऊन गेली. शास्त्र्याला खरोखरच बरें वाटत नव्हतें. अंगांत थोडा ज्वर होता.

दि. २० जुलै १८१५ रोजी शास्त्र्याकडे त्याचे मित्र चिपळूणकर सावकार क्षेमकुशल विचारण्यासाठी गेले होते. तेवढ्यांत त्र्यंबकजीकडून निरोप आला की, देवळांत गर्दी नाही, शांतपणें दर्शन घेतां येईल, तरी शास्त्र्यांना दर्शनास बोलविलें आहे." शास्त्र्याने उलट निरोप पाठविला की, "प्रकृतीस अजून आराम वाटत नाही म्हणून दर्शनास येत नाही."

पुनः शास्त्र्याला वाटलें की, देवदर्शनाने चित्तवृत्ति सुखावेल. थोडें बरें वाटेल, तेव्हा दर्शन घेऊन लगोलग परत यावें. शास्त्र्याने दर्शनाला जायचा पोशाख केला. हरकारे, मशालजी वगैरे लवाजमा घेऊन तो बाहेर पडला. पंढरपूरच्या अरुंद बोळांतून तो देवळाकडे जात होता. महाद्वार रस्त्याला लागतांच कुणीतरी विचारीत होतें, "तो बडोद्याचा शास्त्री कोणता रे?"

"तो पाहा. तो शालजोडी घेतलेला, गळयांत कंठा घातलेला, गोरापान माणूस तोच शास्त्री!"

आपल्याला पाहायला लोक किती उत्सुक आहेत हें पाहून शास्त्री अंतर्यामीं सुखावला. त्याच्या मनांत बरेंच कांही येऊन गेलें. या सुखद विचारांच्या धुंदींतच त्याने देवळांत प्रवेश केला. तेथे त्र्यंबकजी होताच. त्याने पुढे होऊन शास्त्र्याचें

स्वागत केलें. एकमेकांचे हात हातांत धरून ते चार पावलें चालले आणि मग देवदर्शनास गेले. शास्त्र्याने विठ्ठलाला कवेंत घेऊन दर्शन घेतलें. त्र्यंबकजीने विठ्ठलाच्या पायावर डोकें ठेवून दर्शन घेतलें. गर्भागारांतून बाहेर येऊन तो क्षणभर बसला. प्रसादासाठी त्याने आपल्या नोकराला मागे राहायला सांगून शास्त्र्याने त्र्यंबकजीचा निरोप घेतला. त्र्यंबकजीने आपले हत्यारबंद शिपाई शास्त्र्याबरोबर दिले.

आभाळ भरून आलें होतें. पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसत होतीं. दिवस बुडून दोन घटका होऊन गेल्या होत्या. मशालजी पुढे चालले होते. मागून त्र्यंबकजीचे हत्यारबंद शिपाई चालले होते. त्यांच्यामागून शास्त्री चालला होता. त्याच्या पाठीमागे आणखी दोन मशालजी होते व त्यांच्यामागे हरकारे होते. गोविंदपुऱ्याच्या दिशेने शास्त्री चालला होता. भजनीदास मठाजवळ तो पोचला होता. तेथे बराच काळोख होता. एवढ्यांत पाठीमागून 'पैस,'' पैस' असें ओरडत तीन–चार लोक धावत आले. काय घडतंय तें समजायच्या आंत त्या हत्यारबंद लोकांनी समोर येतील त्यांच्यावर वार करायला सुरवात केली. मशालजी, हरकारे पळून गेले. त्र्यंबकजीचे हत्यारबंद शिपाई पुढे होते ते येईपर्यंत त्यांनी शास्त्र्याचे तुकडे केले होते. मारेकरी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले होते. अशा रीतीने २० जुलै १८१५ या दिवशीं पंढरपुरांत गंगाधरशास्त्र्याचा खून झाला.

त्र्यंबकजीने जंग जंग पछाडलें, पण खुनी सापडूं शकले नाहीत. याचा फायदा इंग्रजांनी घेतला. एल्फिन्स्टनने संधि साधली. त्याने जारीने पुरावा गोळा करावयास सुरवात केली. या खुनाचा वहीम त्याने त्र्यंबकजी डेंगळ्यावर घेतला. एल्फिन्स्टनला काय वाटेल तें करून त्र्यंबकजीला बाजूला सारावयाचें होतें. त्र्यंबकजीचा बंदोबस्त केल्याशिवाय त्यांना पेशव्यांना नेस्तनाबूद करतां येणें शक्य नाही हें त्याने बरोबर ओळखलें होतें आणि म्हणूनच या खुनाचा आरोप त्याने उघडपणे त्र्यंबकजीवर ठेविला.

एल्फिन्स्टनने असें सांगितलें की शास्त्र्याच्या सुरक्षिततेची हमी बडोदेकरांसाठी इंग्रजांनी घेतली होती. सबब शास्त्र्याच्या खुनाची चौकशी आम्हांस केली पाहिजे. बाजीरावाने जंग जंग पछाडलें. त्याने सांगितलें की शास्त्र्याचा खून आमचे राज्यांत झालेला आहे. आम्ही त्याची चौकशी करूं. खुनी

सापडला, तर त्याला योग्य ती शिक्षा देऊ. त्याबाबतींत इंग्रजांना ढवळाढवळ करण्याचें प्रयोजन नाही.

पण एल्फिन्स्टनने कांही मानिलें नाही. त्याने त्र्यंबकजीस अटक करा, असा एकच धोशा चालू ठेविला आणि त्यानंतर त्यास ताबडतोब आमच्या स्वाधीन करा असा लकडा लावला. त्र्यंबकजीने पुष्कळ फौज पुण्यास गोळा केली आहे ती येथून हलवा वगैरे बोलणीं चालू केलीं.

बाजीरावाने चालढकल चालवली, पण शेवटी इंग्रजांच्या जबरदस्तीपुढे भित्र्या बाजीरावाचें कांही चाललें नाही. नाइलाजाने बाजीरावाने त्र्यंबकजीस अटक करविली व त्याला दि. १९ सप्टेंबर १८१५ या दिवशीं कॅप्टन हिक याचे स्वाधीन केलें. खरें म्हणजे त्र्यंबकजी डेंगळे आपणहूनच स्वाधीन झाला असें म्हटलें पाहिजे.

शास्त्र्याच्या या खुनामुळे इतिहासाला भलतेंच वळण लागलें. शेवटपर्यंत संशयातीतरीत्या शास्त्र्याचा खुनी कोण, याचा पत्ता लागला नाही. त्र्यंबकजीने हा खून केला असावा, असें वाटत नाही. कारण शास्त्र्याच्या वागणुकीवरून असें दिसतें की, शास्त्र्याला त्र्यंबकजीने आपल्या बाजूला वळविलें होतें. बाजीरावाने तर आपल्या मेहुणीशी त्याच्या मुलाचा विवाह करावा, असाच घाट घातला होता. असें असतांना त्याचा खून करण्याची त्र्यंबकजीला मुळींच जरुरी नव्हती. शिवाय शास्त्र्यासारख्या धूर्त माणसाला आपल्याकडे वळविण्यांत जो त्र्यंबकजी यशस्वी झाला, त्याला त्याचा खून करण्यांत कांही स्वारस्य नाही. उलट त्याचा आपल्याला फार उपयोग होण्याजोगा आहे हें निश्चितच उमगलें असेल.

ज्या पद्धतीने हें कृत्य उरकण्यांत आलें व पुरावा नष्ट करण्यांत आला तें पाहिलें म्हणजे या खुनाच्या पाठीमागे फार मोठी अक्कल होती असें दिसून येतें. त्र्यंबकजी डेंबळे व एल्फिन्स्टन यांचे संबंध व एकमेकांना चीत करण्याचे डाव पाहिले म्हणजे असें वाटतें की, एल्फिन्स्टननेच हा खून घडवून आणिला असावा. आणि असें असेल, तर मात्र त्याने एका दगडाने दोन पक्षी मारले व इंग्रजांचें कोटकल्याण केलें असें म्हटलें पाहिजे. हे दोन पक्षी म्हणजे त्र्यंबकजी डेंगळे व गंगाधरशास्त्री हे होत. इथे राजकारणांत इंग्रजांनी त्र्यंबकजीवर मात केली असें म्हटलें पाहिजे.

शास्त्र्याचा जर खून झाला नसता व त्र्यंबकजी व शास्त्री यांची पुण्याला जोडी जमली असती, तर या दोन्ही मुत्सद्द्यांनी इंग्रजांच्या मुसक्या बांधल्या असत्या, असा तर्क करावयास प्रत्यवाय नाही. एल्फिन्स्टनचा जो पत्रव्यवहार आता उपलब्ध आला आहे, त्यावरून त्यानेच शास्त्र्याचा खून केला असावा, असा संशय येतो.

गंगाधरशास्त्र्याचा खून झाला नसता आणि तो जरी इंग्रजांच्या बाजूने राहिला असता, तरीहि पेशवाईचें जेवढें नुकसान झालें नसतें तेवढें नुकसान त्याचा खून झाल्यामुळे झालें. इतिहासाला निराळें वळण लावणारा हा खून होता, यांत संशय नाही.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों दि: ........................

# ॲब्राहम लिंकन

वॉशिंग्टनसारख्या शहरातून अमेरिकेच्या अध्यक्षाचा खून करून हजारों प्रेक्षकांसमक्ष बूथला पळून जाणे कसे शक्य झाले हा मोठा चमत्कारिक प्रश्न आहे. लिंकनचा खून करणे व पळून जाणें या दोन्ही गोष्टी घडवून आणणारा पडद्यामागील सूत्रधार कुणी निराळाच असावा.

जॉन विल्किन्स बूथचा शेवट कसा झाला हे आज मितीसहि अज्ञात आहे. सरकारी रीत्या बूथ जळून मेला असें जाहीर करण्यात आले तरी वस्तुस्थिती निराळीच होती.

अत्यंत गरीब कुटुंबांत जन्माला येऊन केवळ स्वतःच्या कर्तृत्वावर महत्पदाला पोचणाऱ्या व्यक्तींमध्ये श्री. लिंकन यांची गणना केली पाहिजे. केंटुकी परगण्यांतील होजेनव्हिल या गांवीं दि. १२–२–१८०९ या दिवशीं श्री. लिंकन यांचा जन्म झाला. त्यांचे वडील एक साधे शेतकरी होते. त्यांच्या आईवडिलां-पैकी कुणालाहि लिहितांवाचतांसुद्धा येत नव्हतें, परंतु आपल्या मुलाने शिकावें, असें मात्र त्यांना मनापासून वाटे.

सर्व प्रकारचें शेतीचें काम त्यांना करतां येत असे, परंतु लाकडें तोडण्याचें काम करण्यांत ते अतिशय वाकबगार होते. सहा फूट चार इंच उंची आणि अत्यंत दणकट शरीरप्रकृति एवढी कमाई त्यांनी अठरा एकोणीस वर्षांचा असतांनाच केली. नंतर स्वतः हिंमतीवर शिकून त्यांनी वकिलीची सनदहि मिळविली. अगदी लहानपणापासून त्यांना समाजकार्याची अतिशय आवड होती. हें समाजकार्य करण्याची संधि त्यांना १८३० सालापासूनच मिळत गेली. त्या वर्षी ते इलिनॉइसमध्ये जाऊन स्थायिक झाले. १८३२ सालीं ते प्रथम राज्य विधिमंडळावर निवडून आले. तेव्हापासून संपत्ति व मान त्यांच्यापाशी चालून आल. १८४२ सालीं त्यांचा मेरी टॉड नांवाच्या तरुणीशी विवाह झाला.

१८६० सालीं अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक त्यांनी लढविली व ते अमेरिकेचे अध्यक्ष झाले. १८६४ सालीं ते पुनः अध्यक्षपदावर निवडून आले. अमेरिकेच्या अध्यक्षपदाची माळ लिंकनच्या गळ्यांत पडल्यापासून लिंकनना उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांच्यांतील यादवी युद्धाची धुरा आपल्या खांद्यावर वागवावी लागली असें म्हणावयास हरकत नाही. १८६४ च्या नोव्हेंबरमध्ये लिंकन पुनः अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आणि

९ एप्रिल १८६५ या दिवशीं उत्तर–दक्षिण अमेरिका संघर्षांत उत्तर अमेरिका यशस्वी ठरली. या यशाचें श्रेय श्री. लिंकन यांचेंच होतें, पण त्यानंतर म्हणजे युद्ध थांबल्यानंतर पांचच दिवसांनी श्री. लिंकन यांचा खून झाला.

१४ एप्रिल १८६५ च्या रात्रीं वॉशिंग्टन येथील फोर्ड रंगमंदिरांत श्री. लिंकन आपल्या कुटुंबियांसमवेत नाटक पाहात बसले होते. त्यांच्यासाठी खास खोली तयार करण्यांत आली होती. आवश्यक ती संरक्षणव्यवस्थाहि करण्यांत आली होती, परंतु असें असूनहि जॉन विल्किस बूथ या नांवाच्या नटाने श्री. लिंकन यांच्या डोक्यावर पिस्तुलाने गोळ्या झाडून त्यांना ठार केलें. त्या वेळीं तेथे हजारो लोक हजर होते.

गोळ्यांचा आवाज होतांच रंगमंदिरांत असलेले सर्व लोक सावध झाले. बूथनें लिंकनच्या डोक्यावर नेम धरून गोळ्या मारल्या, ते कोसळल्याचें पाहिलें आणि तो ताबडतोब पळून जाण्याच्या प्रयत्नास लागला. त्याने तत्काळ रंगमंचावर उडी मारिली. त्यावेळीं रंगमंचावर असलेले नट गोंधळले. तेथे उडी मारली, तेव्हा बूथच्या घोट्याला मार लागला, परंतु त्याची त्याने पर्वा केली नाही. लिंकन कोसळल्याचें पाहतांच सर्वजण जीवभयाने पळूं लागले व या गडबडींत रंगमंचाजवळच्या दरवाजानें बूथ हा सहीसलामत पळून गेला.

श्री. केनेडी यांचा खून केल्याचा आरोप ज्या ली ओस्वाल्डवर ठेवण्यांत आला होता, तो त्यापूर्वी अप्रसिद्ध होता. त्याला ओळखणारे लोक कमी होते, पण बूथ या नटाच्या बाबतींत तशी परिस्थिति नव्हती. त्या काळीं गाजलेल्या नटांमध्ये त्याची गणना होत होती. त्याला हजारो लोकांनी पाहिलें होतें. कुणीहि त्याला ओळखूं शकलें असतें. शिवाय खून त्यानेच केला होता याबद्दलहि सुतराम् शंका नव्हती आणि असें असूनहि तो पळून जाऊं शकला हें खरोखर आश्चर्य नव्हे काय ?

जॉन विल्किस बूथ याने हा खून राजकीय मतभेदांवरूनच केला याबद्दल संशय बाळगण्याचें कांहीच कारण नाही. कारण बूथचें त्या काळीं सालिना उत्पन्न सुमारे वीस हजार डॉलर्स एवढें होतें. कांही अमेरिकन लेखकांनी तो एक उडाणटप्पू नट होता, असें बूथचें वर्णन केलें आहे, पण तें बरोबर असावें असें वाटत नाही.

इ. स. १८६० सालीं श्री. लिंकन हे अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून प्रथम

निवडून आले. ते निवडून येण्यापूर्वीपासून दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिका यांच्यामध्ये संघर्ष चालू झाला होता. या संघर्षाला अनेक कारणें होतीं. पैकी गुलामगिरीची प्रथा नष्ट करून सर्व व्यक्तींना समान दर्जाचें नागरिकत्व देण्यांत यावें, ही जी उत्तर अमेरिकेची भूमिका होती, तिला दक्षिण अमेरिकेचा अतितीव्र विरोध होता. श्री. लिंकन हे तर मानवतेचे पुजारी व गुलामी नष्ट करावी असें म्हणणाऱ्या लोकांचे नेते होते, त्यामुळे ते अध्यक्ष म्हणून निवडून येतांच दक्षिण अमेरिकेंतील गुलामगिरी ठेवावी, असें म्हणणाऱ्या लोकांचा अगदी तळतळाट झाला.

१८६४ सालीं लिंकन पुन: निवडून आले. १८६० ते १८६४ या कालांत उत्तर दक्षिणेच्या वैराने प्रत्यक्ष युद्धाचेंच स्वरूप घेतलें होतें. याला अमेरिकेच्या इतिहासांत यादवीयुद्ध असें संबोधिलें जातें. अमेरिकेचे अध्यक्ष या नात्याने, या युद्धाचें नेतृत्व करण्याची जबाबदारी श्री. लिंकन यांचेवर पडली. ती जबाबदारी त्यांनी मोठ्या धैर्याने व मुत्सद्देगिरीने पार पाडली. लिंकन दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर ११ एप्रिल १८६५ या दिवशीं व्हाइट हाऊससमोरील विराट सभेत त्यांनी एक भाषण केलें. या भाषणांत " अमेरिकेंतील निग्रोंनासुद्धा मताधिकार देण्यांत येईल, " अशी स्पष्ट घोषणा त्यांनी केली.

बूथला गुलामी मंजूर होती, एवढेंच नव्हे तर वर्णद्वेषहि त्याच्यांत पुरेपूर भरलेला होता. निग्रो हा गोऱ्या माणसाचा सेवकच असला पाहिजे, असा त्याचा अट्टाहास होता. त्यामुळे श्री. लिंकन यांच्या वर उल्लेखिलेल्या घोषणेमुळे तो चिडून गेला. लिंकनविषयींचे कागदपत्र चाळीत असतांना, एका संशोधकांना लिंकनच्या शपथविधीच्या प्रसंगाचा एक फोटो मिळाला. त्या फोटोंत बूथचा फोटोहि आहे. यावरून असें अनुमान काढण्यांत येतें की, श्री. लिंकन यांचा त्याच वेळीं खून करून पराभूत झालेल्या लोकांच्या भावना नाट्यपूर्ण पद्धतीने व्यक्तविण्याचा त्याचा बेत असावा, पण तें कांही असलें, तरी बूथचा तो बेत तडीस गेला नाही.

बूथने श्री. लिंकन यांच्याप्रमाणेच अमेरिकेचे उपाध्यक्ष श्री. अँड्र्यू जॉन्सन, सरसेनानी जनरल ग्रॅण्ट व परराष्ट्रमंत्री श्री. सेवॉर्ड या सर्वांना एकाच वेळीं ठार करण्याची एक योजना आखली, कारण या सर्वांना नाहीसें केलें म्हणजे अमेरिकन सरकार गडगडेल, अशी त्याची कल्पना होती. बूथने आपल्या

कटांत आणखी चार बंडखोर मित्रांना सामील करून घेतलें. श्री. लुइस पाईन, जॉन सुराट, डेव्हिड हेरॉल्ड आणि जॉर्ज अॅट्झेरॉट हे ते चार मित्र होत. या सर्वांना आपापलीं कामें वांटून देण्यांत आलीं होतीं. या सर्वांचे खून १४ एप्रिल १८६५ रोजीं रात्रीं बरोबर सव्वादहाला करावयाचे असें ठरविण्यांत आलें होतें.

त्यांचेपैकी श्री. लिंकन व जनरल ग्रॅण्ट यांना फोर्ड रंगमंदिरांत ठार करण्यांत यावें असें ठरलें होतें. कारण १४ एप्रिलच्या रात्रीं त्या रंगमंदिरांत "अवर अमेरिकन कझिन" या नांवाचें नाटक रंगभूमीवर यावयाचें होतें आणि या प्रयोगाला लिंकन व ग्रॅंट यांनी हजर राहावयाचें ठरविलें होतें. कुणालाहि कोणत्याहि प्रकारची पूर्वसूचना मिळूं नये, यासाठी सर्वप्रकारची काळजी घेण्यांत आली होती.

एवढी तयारी झाल्यावर बूथने एक पत्रक तयार केलें. त्या पत्रकांत त्याने आपण श्री. लिंकन यांचा खून कां करीत आहोंत, याचीं कारणें दिलेलीं होतीं. त्यांत त्याने असें स्पष्ट म्हटलें होतें की, "दक्षिणेंतील राज्यें आज अपेशी झालेलीं आहेत, त्यामुळे उत्तरेचें दास्य त्यांना पत्करावें लागलें आहे. या दास्यांतून तीं मुक्त व्हावीं यासाठी मी श्री. लिंकन यांचा वध करीत आहें. या माझ्या कृत्यामुळे आजची पिढी माझ्यावर चिडेल, मला प्रस्थापित कायद्यानुसार शिक्षा होईल, परंतु त्याची मला पर्वा नाही..."

जन्मभर नाटक आणि नाट्यगृह यांच्या परिसरांत वावरणाऱ्या व वाढलेल्या या नटाला या सर्व बनावांतील नाट्याने मोहिनी घातली असावी. सीझरला मारणारा ब्रूटस्, किंवा स्वीडिश् स्वातंत्र्यवीर विल्यम टेल या स्वातंत्र्यवीरांच्या मालिकेंत आपल्याला भावी पिढी नेऊन बसवील, अशी त्याची प्रामाणिक कल्पना होती.

हें पत्रक लिहून बूथने आपला परममित्र श्री. जॉन मॅथ्यूज या नटाकडे दिलें होतें. खून करून तो पळून जाणार होता, म्हणून हें पत्रक त्यानंतर लगेच "दि नॅशनल इंटेलिजेन्सर" या वर्तमानपत्राच्या संपादकाला द्यावयाचें होतें. कारण नुसताच खून करून त्याचें ईप्सित साधणें शक्य नव्हतें. एवढी सर्व व्यवस्था बूथने अगदी बिनबोभाट पार पाडली होती. एवढेंच नव्हे, तर अॅण्ड्र्यू जॉन्सन व सेवॉर्ड यांना कुणी व कसें ठार मारावयाचें याची शिस्तबद्ध योजना तयार करून ती त्याने आपल्या साथीदारांना पढविली होती.

परंतु हा त्याचा बेत पूर्वयोजनेनुसार तडीस गेला नाही, कारण १४ एप्रिलच्या सायंकाळी बूथला असें कळलें की, पूर्वी ठरल्याप्रमाणे जनरल ग्रँट कांही फोर्ड रंगमंदिरांतील नाटकाला हजर राहाणार नाहीत. त्यामुळें त्याला आपला बेत बदलावा लागला. त्याला असें कळलें की, जनरल ग्रँट त्याच रात्रीं, कांही महत्त्वाच्या कामासाठी, आगगाडीने फिलाडेल्फियाला रवाना होणार आहेत. बूथला ही वातमी मिळतांच त्याने जॉन सुराटला ही बातमी कळविली आणि त्याला त्याने त्याच गाडीने जनरल ग्रँटबरोबर प्रवास करून वाटेंत ठरलेल्या वेळीं म्हणजे बरोबर रात्रीं सव्वादहाला ठार मारावयास सांगितलें.

लुईस पाईन व हेरॉल्ड या दोघांनी परराष्ट्रमंत्री सेवॉर्ड यांना ठार करण्याची जबाबदारी उचलली होती. श्री. सेवॉर्ड यांच्याविषयी आवश्यक ती सर्व माहिती या दोघांनी आधीच काढून ठेविली होती. श्री. सेवॉर्ड हे खूप आजारी होते, त्यामुळे ते आपल्या घरींच अंथरुणांत पडून होते. एका अपघातांत त्यांच्या हनुवटीला जबर दुखापत झाली होती व त्यांना हालचाल करणेंहि बरेंच त्रासदायक होई. ही सर्व माहिती पाईन व हेरॉल्ड या जोडगोळीने आधीच मिळविली.

जॉर्ज अट्झेरॉट या नांवाच्या बूथच्या सहकाऱ्यावर, अमेरिकेचे उपाध्यक्ष श्री. अँड्र्यू जॉन्सन यांना ठार करण्याची कामगिरी सोपविण्यांत आली होती. खरें म्हणजे जॉर्ज हा फार भित्रा व पापभीरू माणूस होता. त्याला खून करण्याची कल्पना सहन होण्याजोगी नव्हती; पण सर्व मित्रांच्या आग्रहाला बळी पडून व त्यानंतर त्यांच्या धमक्यांना घाबरून त्याने ही कामगिरी पत्करली होती.

ठरल्याप्रमाणे बूथने आपली कामगिरी पार पाडिली, पण त्याच्या इतर मित्रांना या ना त्या कारणाने आपली जबाबदारी पार पाडतां आली नाही.

लुईस पाईन व हेरॉल्ड हे दोघेहि ठरल्याप्रमाणे नऊ साडेनऊच्या सुमारास परराष्ट्रमंत्री सेवॉर्ड यांचे घरीं गेले. आपल्याला अतिशय झपाट्याने पळून जातां आलें पाहिजे हें जाणून ते दोघेहि घोड्यावरून तेथे गेले होते. घोड्यांना दरवाजाबाहेर ठेवायचें तरी कठीण; नुसतेंच सोडून द्यायचें तरी कठीण. असा पेच त्यांना पडला. कारण नुसतेंच बांधून ठेविलें तर कुणालाहि संशय यायचा. तसेंच ऐनवेळीं बाहेरून कांही दगाफटका झाला, तर त्याची खबर आपल्याला आंत कळणार नाही. यावर तोड म्हणून हेरॉल्ड याने घोडे धरून वाड्याच्या

दरवाजाबाहेर उभे राहावें व पाईनने आंत जाऊन आपला बेत पार पाडावा, असा बेत त्यांनी आंखला. त्यानुसार हेरॉल्ड घोड्यांचे लगाम धरून दरवाज्यांत उभा राहिला

पाईनने दरवाजा ठोठावला. नोकराने दरवाजा उघडतांच त्याने अशी बतावणी केली की, त्यांच्या कौटुंबिक डॉक्टरांनी श्री. सेवॉर्ड यांच्यासाठी कांही औषधें दिलीं आहेत व तीं त्यांना प्रत्यक्षच द्यावयाचीं आहेत." परंतु सेवॉर्ड यांचा नोकर त्याला आंत जाऊं देईना, परंतु पाईनने त्याला जुमानलें नाही. तो तसाच आंत घुसला. एवढ्यांत सेवॉर्ड यांचा मुलगाहि मध्ये आला. सेवार्डचा नोकर व मुलगा यांनी पाईनला अडवून धरिलें. आता मात्र पाईनला दांडगाई केल्याशिवाय गत्यंतर राहिलें नाही. त्याने आपल्याजवळच्या काठीने त्या दोघांनाहि चांगलें बदडून काढिलें व तो वेगाने आंत घुसला. सेवॉर्ड यांच्या बिछान्यापाशी पोचतांच त्याने क्षणाचाहि विलंब न लावतां आपल्या जवळची कट्यार श्री. सेवॉर्ड यांच्या मानेवर चालविली. पण मौज अशी की, सेवॉर्ड यांच्या दुखावलेल्या हनुवटीला आधार मिळावा म्हणून डॉक्टरांनी त्यांच्या गळ्याभोवती एक पोलादी पट्टी बसविली होती. या गळपट्टीमुळे श्री. सेवॉर्ड यांना फारशी दुखापत झाली नाही. पण प्रसंगावधान राखून त्यांनी मेल्याचें सोंग वठविलें व ते पलंगावरून गडगडत खाली पडले. तेवढ्यांत घरांतील सर्व माणसें तेथे धावून आलीं. नोकरांनी आपापलीं हत्यारें सरसावलीं व घरांत एकच गोंधळ उडाला. त्यामुळे सेवॉर्ड खरोखरच मेले आहेत की नाहीत, याची पाईनला खात्री करून घेतां आली नाही. तो तसाच पळत सुटला.

श्री. सेवॉर्ड यांच्या घरांत झालेली गडबड ऐकून, बाहेर घोडे धरून उभा असलेला हेरॉल्ड भयंकर घाबरला आणि पळून गेला. पाईन बाहेर येऊन पाहातो तों हेरॉल्ड केव्हाच पळून गेला होता व त्याचा घोडा मात्र तेथे होता. त्याने घोड्यावर टांग मारली व तो तेथून भरधाव निघाला.

पूर्वी ठरल्याप्रमाणे जॉन सुराट श्री. ग्रँट यांच्याबरोबर त्याच गाडीने फिलाडेल्फियाला जायला निघाला, पण पोलिस-बंदोबस्त अतिशय कडक असल्यामुळे त्याला कांहीहि करतां आलें नाही, त्यामुळे ग्रँटला मारण्याचा बेतहि फसला.

जॉर्ज ॲटझेरॉटकडे अमेरिकेचे त्यावेळचे उपाध्यक्ष श्री. ॲण्ड्र्यू जॉन्सन

यांना मारण्याचें काम सोपविण्यांत आलें होतें. सायंकाळपासूनच तो मनांतून घाबरला होता. आपल्या हातून हें कृत्य कसें काय पार पडतें, अशी त्याला काळजी वाटत होती. वेळ जाईना म्हणून त्याने दारू प्यायला सुरवात केली व त्या गुंगींतच तो झोपून गेला. जेव्हा त्याला जाग आली, तेव्हा सव्वादहा वाजून गेलेले होते. हें पाहातांच त्याने विचार केला की, आता वेळ टळून गेली आहे. आता त्याला ठार मारण्यांत कांही हशील नाही. परंतु बूथने तरी आपलें काम केलें आहे की नाही तें पाहण्याची त्याला अनिवार इच्छा झाली. म्हणून त्याने आपला घोडा फोर्ड रंगमंदिराकडे वळविला.

बूथने आपली जबाबदारी पार पाडली होती. रंगमंदिराकडे जाणारे सर्व रस्ते माणसांनी नुसते भरून वाहात होते. "लिंकनचा खून झाला! लिंकनचा खून झाला!" असें सर्व लोक म्हणत होते. हळहळत होते. बंडखोरांना सहानुभूति दाखविणाऱ्या किंवा ज्यांच्याविषयीं असा संशय येई अशांना पकडण्याचें सत्र चालू होतें. तें पाहातांच अॅट्झेरॉटला घाम फुटला आणि आपला घोडा वळवून त्याने तेथून त्वरेने पळ काढिला. बूथ व्यतिरिक्त कुणालाहि आपली कामगिरी पार पाडतां आली नाही.

बूथ फोर्ड रंगमंदिरांतून बाहेर पडतांना त्याच्या पायाला दुखापत झाली होती. ती दुखापत साधी नव्हती. त्याचा पायच घोट्यांत मोडला होता. पण तो डगमगला नाही. बंडखोरांविषयी सहानुभूति असलेल्या एका डॉक्टरांकडून तो त्याने नीट बसवून घेतला व त्याला प्लास्टर करून तो तेथून दक्षिणेंत पळून गेला. थोड्याच दिवसांत श्री. सेवॉर्ड यांच्या घरापुढून पळून गेलेला श्री. डेव्हिड हेरॉल्ड हाहि त्याला येऊन मिळाला. या दोघांना पकडण्यासाठी पोलिसांनी शिकस्त चालविली होती. वॉशिंग्टनच्या युद्धखात्यामार्फत, बूथ व त्याचे सहकारी यांना पकडून देणाऱ्याला मोठें बक्षीस जाहीर करण्यांत आलें होतें. सर्व प्रकारची मदत पोलिसांना मिळत होती.

पण बूथ मोठा हुपार होता. पोलिसांनी आपले पाश त्याच्याभोवती आवळीत आणावेत व बूथने त्यांच्या हातावर तुरी देऊन त्यांतून निसटून जावें, असा पाठशिवणीचा खेळ कितीतरी दिवस चालू राहिला. बूथने दक्षिणेच्या स्वातंत्र्यासाठीच हें कृत्य केलें होतें, त्यामुळे दक्षिणेंतील लोकांची बूथला सहानुभूति होती, पण पोलिसांचा ससेमिरा व बूथला संपूर्ण कट यशस्वी

करण्यांत आलेलें अपयश, या गोष्टींमुळे लोकांची सहानुभूति हळू हळू कमी होऊं लागली. कित्येक ठिकाणीं तर लोक त्याला उघडपणे सांगत की, " आपला हा अघोरी मार्ग आम्हांस बिलकुल पसंत नाही." विशेषतः त्याचें हें कृत्य आपणांस पसंत नाही असें सांगणें दक्षिण अमेरिकेंतील लोकांना त्या वेळींतरी अधिक सोयीचें होतें.

या बदललेल्या वातावरणामुळे लोक बूथला जेवूं खाऊं घालीत, पण आपल्या घरीं थारा देत नसत. निघून जायला सांगत. सतत प्रवास व पोलिसां-कडून पकडला जाण्याची भीति यामुळे बूथ फार कंटाळला. त्याचा पाय प्लास्टरमध्येच होता. त्यामुळे त्याला हालचाली करतांना फार त्रास होई. अशा परिस्थितींतहि त्याने पुष्कळ दिवसपर्यंत पोलिसांशी टक्कर दिली. शेवटी तो कंटाळला. त्याच्याकडील पैसाहि संपुष्टांत आला आणि असें म्हणतात की, खऱ्या अर्थाने तो निराश झाला, कारण ज्या दक्षिणेंतील संस्थानांसाठी हें सर्व त्याने केलें होतें, त्या संस्थानांतील लोकहि त्याचा हळू हळू तिरस्कार करूं लागले होते.

प्रत्येक ठिकाणी आसरा मिळवितांना त्याला निराळ्या प्रकारची बतावणी करावी लागे. असाच पळतां पळतां शेवटी तो गॅरेट या नांवाच्या शेतकऱ्याचे घरीं पोचला. या शेतकऱ्याची बरीच मोठी शेती होती. ' गॅरेट फार्म ' म्हणून ती ओळखली जात होती. आपण युद्धांत जखमी झालेले सैनिक आहोंत, अशी बतावणी बूथने केली. त्याचा सहकारी हॅरॉल्ड हाहि त्याच्याबरोबर होता. मोठ्या मिनतवारीने बूथने त्या शेतकऱ्याकडे तीन दिवसांसाठी आसरा मिळविला.

गॅरेटच्या शेतीवाडींतील धान्याच्या कोठारावर एक छोटी खोली होती. तेथें गॅरेटचे नोकर, रखवालदार वगैरे झोपत असत. तेथे बूथ व त्याचा मित्र हॅरॉल्ड हे राहिले. दिवसभर त्या अंधाऱ्या खोलींत पडून राहायचें व रात्रीं आपले व्यवहार आटपायचे, असा त्यांचा कार्यक्रम असे. पुनः कुणाशी कांही बोलण्याची सोय नाही, एवढेंच काय, पण आपापसांतसुद्धा मोकळेपणी बोलण्याची चोरी.

या सर्व हालअपेष्टांना बूथ पूर्णपणे विटला होता. हॅरॉल्ड तर त्याला सारखा सांगत होता की, आता आपण पोलिसांच्या स्वाधीन होऊं. कारण तोपर्यंत त्यांचे सर्व सहकारी सरकारने पकडले होते. आज ना उद्या आपल्याला

पोलिस पकडणारच, अशी त्याची खात्री होती. तसेंच या सर्व बनावांत त्याने स्वतः कुणाचाहि खून केला नव्हता, त्यामुळे त्याला असें वाटे की, आपल्याला झाली तर थोडीफार शिक्षा होईल, पण बूथचें तसें नव्हतें.

बूथला पडकण्यासाठी सरकारने पन्नास हजार डॉलर्सचें बक्षीस जाहीर केलें, तेव्हापासून बूथला मनांत आत्महत्येचे विचार येऊं लागले. कारण आज ना उद्या आपल्याला पोलिस पकडल्याशिवाय राहणार नाहीत आणि आत्महत्या केल्याशिवाय आपल्याला अटक चुकवितां येणार नाही, अशी त्याची खात्री पटली होती.

दि, २६ एप्रिल १८६५ रोजी पहाटे दोनच्या सुमारास बूथला एकाएकी जाग आली. बाहेर आरडाओरडा चालू होता. पोलिसांनी त्या धान्य कोठाराला चारहि बाजूंनी वेढा दिला होता. आणि " निःशस्त्र होऊन बाहेर या " अशी आज्ञा पोलिस अधिकारी त्यांना देत होते. बूथचा सहकारी एव्हाना जागा झाला होता. त्यालाहि बाहेरील परिस्थितीची कल्पना आली. एवढ्यांत " निःशस्त्र होऊन शरण या " अशी आज्ञा त्याच्या कानावर पडली. त्याने मागचापुढचा विचार केला नाही. तो उठला आणि " माझ्यावर दया करा! माझ्यावर दया करा!! " असें ओरडत सरळ पोलिसांच्या स्वाधीन झाला.

बूथने आपल्यावर आलेला प्रसंग ओळखला. आता मरण अटळ आहे अशी त्याने खूणगाठ बांधली. पोलिसांनी " बाहेर ये नाहीतर कोठाराला आग लावून देऊं " अशी ओरड करायला सुरवात केली. हें सर्व बूथला ऐकूं येत होतें, पण त्याने हूं की चूं केलें नाही. पोलिसांनी चारहि बाजूंनी कोठार पेटवून दिलें. अग्निज्वाला धडधडूं लागल्या. आग लागतांच बूथ बाहेर पडेल अशी त्यांची अटकळ होती, पण ती खोटी ठरली. अग्निज्वाला भडकलेल्या दिसतांच बूथने आपल्याजवळच्या पिस्तुलाने आपल्या डोक्यावर गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली.

बूथचे सहकारी म्हणून एकुण आठ लोकांना पकडून आणण्यांत आलें. दोन महिने खटला चालला व त्यांपैकी चौघांना फाशी देण्यांत आलें व चौघांना जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली. बूथच्या प्रकरणामुळे सर्व दक्षिण अमेरिका पुनः भडकून उठेल की काय, अशी सरकारला शंका होती. त्यामुळे बूथचें शवसुद्धा दोन वर्षेपर्यंत बूथच्या नातेवाइकांच्या ताब्यांत देण्यांत आलें

नव्हतें. शेवटीं १८६७ सालीं बूथचें शव त्यांच्या ताब्यांत देण्यांत आलें. आगींत होरपळून निघाल्यामुळे तें बूथचेंच होतें की, अन्य कुणाचें होतें हें ओळखणेंसुद्धा शक्य नव्हतें.

बूथ-प्रकरणाचा सरकारीरीत्या अशाप्रकारे शेवट करण्यांत आला, परंतु या प्रकरणाबद्दल पुष्कळांच्या मनांत कुतूहल राहून गेलें होतें. त्यामुळे त्यानंतरसुद्धा याबद्दल तर्कवितर्क चालू राहिले. त्यांतून जी माहिती गोळा झाली, ती फारच आश्चर्यकारक आहे.

वॉशिंग्टनसारख्या शहरांतून अमेरिकेच्या अध्यक्षाचा खून करून हजारो प्रेक्षकांसमक्ष बूथला पळून जाणें कसें शक्य झालें, हा मोठा चमत्कारिक प्रश्न आहे. कांहींच्या मतें लिंकनचा खून करणें व पळून जाणें या दोन्ही गोष्टी घडवून आणणारा पडद्यामागील सूत्रधार कुणीतरी निराळाच असावा. लिंकनच्या मंत्रिमंडळापैकीच कुणाची ना कुणाची तरी फूस असल्याशिवाय हें घडून येणें शक्य नाही, कारण असें मानल्याशिवाय पुष्कळशा घटनांचा अर्थच लागत नाही.

श्री. लिंकन नाट्यप्रयोगाला हजर राहाणार होते म्हणून त्यांची खास व्यवस्था करण्यांत आली होती. नुकतेंच संपुष्टांत आलेलें युद्ध व उत्तर-दक्षिणेंतील लोकांच्या एकमेकांविषयींच्या तीव्रतम भावना या गोष्टी लक्षांत घेतां, त्यांच्या संरक्षणाची कडेकोट व्यवस्था करणें आवश्यक होतें, पण नेमकी त्याच दिवशीं फोर्ड रंगमंदिरांत संरक्षणव्यवस्था नव्हती किंवा निदान पुरेशी नव्हती, असें म्हटलें पाहिजे. कारण बूथला कोणत्याहि प्रकारचा अटकाव न होतां, अगदी श्री. लिंकन यांचेसाठी तयार केलेल्या खास बैठकीपर्यंत त्याला जातां आलें; एवढेंच नव्हे तर बॉक्समध्येहि त्याला प्रवेश मिळाला. लिंकन यांच्या सुरक्षिततेसाठी नेमलेल्या खास गुप्त पोलिसाने बूथला लिंकन यांच्या बॉक्समध्ये प्रवेश करतांना छेडलें, पण तें केवळ ओळखपत्र पाहाण्यासाठी. या व्यतिरिक्त त्याला कोणीहि हटकलें नाही. हें सहज की, बुद्धिपुरस्सर हें समजावयास कांही मार्ग नाही.

श्री. लिंकन यांचा खून झाल्यानंतर तावडतोब सुमारे दोन—अडीच तासपर्यंत वॉशिंग्टनभोवतीची "टेलिग्राफ-सर्व्हिस" पूर्णपणे बंद पडली होती. त्यामुळे बूथचा पाठलाग करणें पुष्कळच कठीण झालें. किंबहुना असें म्हणावयास हरकत नाही की बूथचा पाठलाग खऱ्या अर्थानें झालाच नाही. कारण

बूथ पळून जाणार म्हणजे दक्षिणेकडे हें सांगावयास कांही ज्योतिषाची आवश्यकता नव्हती. तें अगदी उघड होतें, कारण त्याला आसरा मिळण्याची शक्यता फक्त दक्षिणेकडील बंडखोर राज्यांतच होती; पण असें असतांना " ॲनाकॉस्टिया " या पुलावर कांही पहारा ठेवण्यांत आला नव्हता. कारण या पुलावर पहारा ठेविलेला असता, तर बूथला पळून जातां येणें झाले नसतें. एवढी साधी गोष्ट पोलिसांना कां करतां येऊं नये ?

या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या, म्हणजे लिंकनच्या खुनाचा सूत्रधार हा कुणीतरी बडा सरकारी अधिकारी असावा, याच प्रकारचा अंदाज पुष्कळ अमेरिकन इतिहास-संशोधकांनी व्यक्तविला आहे. ॲब्राहम लिंकन यांचा रॉबर्ट लिंकन या नांवाचा एक मुलगा होता. त्या मुलाने या कटाविषयीचे कांही कागदपत्र अमेरिकन कॉंग्रेसच्या वाचनालयांत ठेवून दिले होते. हे कागदपत्र १९४७ सालीं किंवा त्यानंतर प्रसिद्ध करावयाचे होते परंतु त्या कागदपत्रांतहि कांही महत्त्वाचे असे धागेदोरे सापडलेले नाहीत. त्यामुळे लिंकनचा खून करणाऱ्या बूथचें खरें पारिपत्य झालें किंवा नाही याबद्दल कांही निर्णायक असा निष्कर्ष काढितां येत नाही.

२६ एप्रिलला गॅरेट फार्मवरील धान्याच्या कोठाराला अमेरिकन पोलिसांनी आग लावून दिली. आणि बूथला तेथे आत्महत्या करणें भाग पडलें ही वस्तुस्थिति आहे, असें मानायला सर्व लोक तयार नाहीत. पुष्कळ अमेरिकन लोकांच्या मतें बूथ हा त्यानंतर पुष्कळ वर्षेपर्यंत जिवंत होता. त्यांचे मतें गॅरेट फार्मवर पोलिस पोचण्यापूर्वीच बूथ तेथून पळून गेला होता.

बूथचा सहकारी हेरॉल्ड याने जेव्हा आपलें अवसान गमावलें तेव्हाच बूथने ठरविलें की, आता याच्यावर विसंबण्यांत अर्थ नाही. म्हणून तो हेरॉल्डलासुद्धा न सांगतां तेथून निसटला. पळून जाण्यांत त्याला त्याच्या मित्रांनी मदत केली. जेव्हा पोलिसांनी त्या धान्याच्या कोठाराला आग लाविली, तेव्हा त्या फार्मवर काम करणारा एक नोकर तेथे झोपला होता. तो बिचारा जळून मेला. त्याचें शव इतकें विद्रूप झालें होतें की, तें नेमकें कुणाचें होतें हें सांगणेंसुद्धा शक्य नव्हतें. पोलिसांनी बक्षिसाच्या आशेनें या परिस्थितीचा फायदा घेतला. बूथचा सहकारी हेरॉल्ड हा पकडला गेला होता. त्यालाहि बूथ पळून गेला असेल ही कल्पना नव्हती, म्हणून त्याने आपल्याबरोबर फक्त

बूथच होता अशी साक्ष दिली. त्यामुळे पोलिसांना बक्षीस मिळालें व खऱ्या बूथच्या पाठीमागचा पोलिसांचा ससेमिरा चुकला.

बूथ जो गॅरेटफार्मवरून निसटला तो लपतछपत टेक्सास राज्यांत गेला. तो तेथे पोचेपर्यंत वातावरण पुष्कळच निवळलें होतें. तेथे त्याने एका शेतकऱ्याकडे आपला मुक्काम ठेविला. त्या शेतकऱ्याचा पेइंग गेस्ट ठेवून घेणें हा जोडधंदा होता. तेथे बूथ बरींच वर्षे राहिला. खून करून पळून जातांना त्याचा पाय मोडला होता तो पूर्णपणे बरा झाला. थोडें व्यंग राहिलेंच. त्यामुळे तो लंगडत चालत असे. त्याचें तेथील आयुष्य त्याच्या दृष्टीने अगदीच कंटाळवाणें होतें. कारण लोकप्रियतेच्या झगमगाटांत वावरण्याची सवय असल्यामुळे तेथील एकलकोंडें आयुष्य त्याला फार कंटाळवाणें वाटे. शिवाय ज्या ध्येयाने त्याने खुनासारखें कृत्य केलें तें ध्येयहि सिद्ध झालेंच नव्हतें, त्यामुळे ध्येयपूर्तीच्या आनंदालाहि तो मुकला.

हें सर्व खरें असलें, तरी त्याला शेवटपर्यंत आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप मात्र कधीहि झाला नाही. एकदा बूथ फार आजारी पडला, तेव्हा त्याला वाटलें की, आपला अंतसमय आता जवळ आला. त्याच्याबरोबर राहाणारा दुसरा एक वाटसरू केवळ भूतदयेने त्याची सेवाशुश्रूषा करी. जेव्हा बूथला आपण आता जगत नाही, अशी खात्री पटली, तेव्हा त्याने त्याची सेवा करणाऱ्या वाटसरूला विश्वासांत घेऊन आपण कोण तें सांगितलें. तसेंच आपण मरेपर्यंत हें कुणालाहि सांगणार नाही, असें त्याचेकडून वचन घेतलें.

परंतु दुर्दैवानें बूथ त्या आजारांतून बरा झाला. तो बरा झाल्याचें दिसून येतांच त्याच्या मित्राचें धाबें दणाणलें. बूथने तें ओळखलें व एके दिवशीं तो तेथून निघून गेला. बूथ तेथून निघून जातांच त्या प्रवाशाने पोलिसांना खबर दिली व बूथच्या पाठीमागे पुनः पोलिसांचा ससेमिरा सुरू झाला.

बूथचें सर्व घराणेंच नट म्हणून प्रसिद्ध होतें. सारी अमेरिका त्यांना नामांकित अभिनयपटु म्हणून ओळखत होती. या सुमारास त्यांच्या घराण्यांतील एक तरुणी अमेरिकन रंगभूमीवर अभिनेत्री म्हणून फार गाजली. ती बूथची पुतणी होती. स्वतः बूथने नट म्हणून फार नांव मिळविलें होतें, त्यामुळे त्यांच्या घराण्यांतील सर्व लोकांना, विशेषतः अभिनयपटु म्हणून नांव मिळविलेल्या लोकांना बूथबद्दल आदर व आत्मीयता वाटत होती.

टेक्सासमधील एका शहरांत या बूथ नाटक कंपनीचा मुक्काम पडला होता. एकदा नाटक संपल्यावर बूथ रंगपटाच्या दाराशी गेला व तेथील द्वारपालाला त्याने आपल्याला आपल्या पुतणीची भेट घ्यायची आहे, असें सांगितलें. प्रथम त्या द्वारपालानें त्याला धुडकावून लाविलें, पण बूथने चिकाटी सोडली नाही. शेवटी त्या द्वारपालाने मी तिला सांगून पाहातों, असें म्हणून तिच्या दासीकरवी तिला निरोप पाठविला की, "एक किंचित् लंगडत चालणारा वृद्ध गृहस्थ आपली भेट घेतलीच पाहिजे असें म्हणतो." पण त्या दिवशीं ती फारच दमली होती, म्हणून तिने बूथची भेट घ्यायचें नाकारलें.

हा 'नकार' कळविण्यासाठी जेव्हा ती दासी बाहेर आली, तेव्हा तिला बूथ म्हणाला की, "मग ही एवढी आंगठी तरी तिला द्या!" दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेव्हा ती उठली तेव्हा त्या दासीने तिला बूथने दिलेली आंगठी दिली. ती आंगठी पाहातांच तिला फार वाईट वाटलें; कारण त्या आंगठीवर जे. डब्ल्यू. बी. अशीं बूथच्या नांवाचीं आद्याक्षरें कोरलेलीं होतीं.

ती नटी त्याच शहरांत आणखी एक महिनाभर मुक्काम करून राहिली. तिला असें वाटे की, आपला चुलता आपल्याला पुनः भेटायला येईल. पण ती तिची अपेक्षा फोल ठरली. बूथ कांही परत आला नाही. त्या शहरांतील सर्व खाणावळी व अभ्यागतगृहें यांमधून तिने अगदी कसून चौकशी केली, पण बूथचा कांही पत्ता लागला नाही.

जॉन विल्किन्स बूथचा शेवट नेमका कसा झाला हें आजमितीसहि अज्ञातच आहे. बहुधा त्याने जीवनाला कंटाळून आत्महत्या केली असावी, पण काल-चक्राला या गोष्टीची दखल नाही. अगदी १९२० सालापर्यंत अमेरिकेंतील कित्येक सर्कशींतून अर्धवट जळलेलें व विद्रूप झालेलें एक शरीर, बूथचें शव म्हणून दाखविण्यांत येई, पण वस्तुस्थिति अगदी निराळीच होती. किंबहुना वस्तुस्थिति नेमकी काय होती हें खरोखरच अज्ञात राहिलें व अजूनहि अज्ञातच आहे.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि:........................
क्रमांक ........................ नों. दि.........................

# लिऑन ट्रॉट्स्की

लेनिननंतर रशियात जी सत्तास्पर्धा सुरू झाली तिचा ट्रॉट्स्की हा मोठा बळी होता.

स्टॅलिनने सर्व सूक्ता सूक्तमार्गांचा अवलंब करून सत्ता मिळविली. त्याच्या मार्गातील ट्रॉट्स्की हा फार मोठा अडथळा होता. ट्रॉट्स्कीची लोकप्रियता नष्ट करण्यासाठीं त्याने पद्धतशीरपणें प्रयत्न केले पण तरीहि त्यांत यश मिळविण्यास त्याला सात वर्षे लागलीं.

ट्रॉट्स्की देशोधडीला लागला तरी त्याचे अस्तित्वहि स्टॅलिनला बेचैन करूं लागलें.

कांही व्यक्तींचें व्यक्तिमत्त्व इतकें प्रभावी असतें की, कालौघाचा त्याच्यावर कांही परिणाम होत नाही. त्याचें महत्त्व, ताजेपणा व आकर्षण कायम राहातें. अर्थातच अशा व्यक्ति विरळाच! अशा विरळा व्यक्तींमध्ये श्री. ट्रॉट्स्की यांच्या व्यक्तिमत्त्वाची गणना होते.

श्री. ट्रॉट्स्की यांचें सारें जीवन अतिशय नाट्यमय व संघर्षमय आहे. त्यांचें खरें नांव लिऑन ब्रॉन्स्टेन असें होतें. २६ ऑक्टोबर १८७९ हा त्यांचा जन्मदिन. जातीने ते ज्यू होते. त्यांचे वडील अगदी निरक्षर होते; परंतु त्यांची आई सुशिक्षित होती. सगळ्या भावंडांत ते लहान असल्यामुळे त्यांचें लहानपणी फार कौतुक झालें. मॅट्रिकपर्यंतचें त्यांचें शिक्षण 'ओडिसा' या काळ्या समुद्रावरील बंदराच्या गांवीं झालें व तिथे असतांना ते मजूर-चळवळींत ओढले गेले. ॲलेक्झांड्रा सोकोलोव्हस्काया या तरुणीशी या चळवळींमुळेंच त्यांचा परिचय झाला. १८९७ सालीं त्यांना, मजुरांना चिथावणी देऊन संपास प्रवृत्त करण्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलें. नानाप्रकारें त्यांचा छळ करण्यांत आला. शेवटी त्यांना चार वर्षांची शिक्षा देऊन सैबेरियांत पाठविण्यांत आलें. १९०० साली त्यांनी ॲलेक्झांड्राशी विवाह केला. सैबेरियांत चार वर्षं घालविल्यावर आपल्या पत्नीच्या संमतीने ते सैबेरियांतून पळून गेले, तेव्हा जे खोटें नांव त्यांनी धारण केलें तें ट्रॉट्स्की असें होतें. त्यानंतर त्याच नांवाने ते प्रसिद्धीला आले.

इंग्लंडमध्ये त्यांचा व लेनिनचा परिचय झाला, तेव्हापासून ते दोघेहि एकाच ध्येयाने प्रेरित होऊन काम करीत. १९१७ साली रशियन राज्यक्रांति झाली. ती यशस्वी करण्यांत ट्रॉट्स्कींचा फार मोठा वांटा होता. या राज्यक्रांतीच्या द्रष्टेपणांत

ट्रॉट्स्कींचा भाग फार मोठा होता. १९२२ सालीं लेनिन व ट्रॉट्स्की यांच्यांत थोडी कुरबूर झाली, परंतु "पॉलिटब्यूरो"च्या इतर सभासदांपेक्षा लेनिनचा ट्रॉट्स्कींवर फार विश्वास होता. लेनिनचा स्टॅलिनवर तर अजिबात विश्वास नव्हता, परंतु सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करून लेनिननंतर स्टॅलिनने सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली.

स्टॅलिन हा कमालीचा धूर्त, मतलबी व स्वार्थासाठी वाटेल तें करण्याची तयारी असलेला असा नेता होता. १९२१ ते १९२७ या काळांत स्टॅलिनने पद्धतशीरपणे ट्रॉट्स्कींची लोकप्रियता नष्ट केली. कारण स्टॅलिनला ट्रॉट्स्कींच्या लोकप्रियतेची कल्पना होती. मर्मग्राही, विनोदप्रचुर, पण लोकांचीं अंतःकरणें गदगदवून हलविणारें असें त्यांचें वक्तृत्व होतें व त्याच्या जोरावर ते रशियन लोकांच्या गळ्यांतील कंठमणि बनून राहिले होते. ही त्यांची लोकप्रियता नष्ट करण्यास स्टॅलिनला सात वर्षें लागलीं. शेवटी स्टॅलिनला जेव्हा खात्री पटली कीं, ट्रॉट्स्कींची लोकप्रियता पूर्णपणे विलयाला गेली आहे, तेव्हा त्याने देशद्रोहाचा आरोप ठेवून ट्रॉट्स्कींना आल्मा आटा (Alma Ata) येथे हद्दपार केलें. कझगस्तानची राजधानी म्हणून पुढे प्रसिद्धीला आलेलें हें ठिकाण त्या वेळीं अगदी खेडें होतें. २२ जानेवारी १९२९ रोजी ट्रॉट्स्कींना तेथून हलविण्यांत आलें व फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत ट्रॉट्स्कींनी आपल्या मातृभूमीचा किनारा कायमचा सोडला, कारण त्यांना स्टॅलिनने त्या दिवशीं देशाबाहेर पाठवून दिलें होतें.

ट्रॉट्स्कींना स्टॅलिनने कॉन्स्टॅंटिनोपल येथील वकिलातींत ठेवून दिलें व आपली व्यवस्था पाहा असें सांगितलें. त्यांनी महत्प्रयासाने प्रिंकिपो या बेटावर एक छोटा बंगला भाड्याने मिळविला आणि तेथे राहावयास सुरवात केली.

ट्रॉटस्कींच्या बंगल्याबाहेर दोन तुर्की पोलिस ठेवण्यांत आले होते, परंतु त्यांच्या भरंवशावर राहाणें ट्रॉट्स्कींना पसंत नव्हतें. तेव्हापासून त्यांना असें वाटे

की, आज ना उद्या स्टॅलिन आपला काटा काढल्याशिवाय राहणार नाही, म्हणून तेथें आल्यापासून त्यांनी फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत आपल्याला राहतां यावें, यासाठी प्रयत्न केले, पण त्यांना आपल्या देशांत प्रवेश देण्यास कुणीच तयार नव्हतें. शेवटी फ्रेंच सरकारने पुष्कळशीं बंधनें घालून त्यांना फ्रान्समध्ये यावयास परवानगी दिली. त्यानंतर ३१ डिसेंबर १९३६ पर्यंत ट्रॉट्स्की युरोपांत होते. नंतर त्यांना तेथून निघावें लागलें व ९ जानेवारी १९३७ या दिवशीं ते मेक्सिकोच्या किनाऱ्यावर उतरले. डियेगो रिव्हेरा या ट्रॉट्स्कींच्या मित्राने त्यांच्यासाठी कोयोकन येथे 'ब्ल्यू हाऊस' या नांवाचा बंगला आधीच ठरवून ठेविला होता. रिव्हेरा स्वतः उत्तम चित्रकार होता. ट्रॉट्स्कींचीं राजकीय मतें त्याला मान्य होतीं व त्यामुळेच त्याची ट्रॉट्स्कींवर भक्ति होती. ९ जानेवारी १९३७ ते ११ जानेवारी १९३९ पर्यंत ट्रॉट्स्कींचें वास्तव्य 'ब्ल्यू हाऊस' मध्ये होतें. त्यानंतर मात्र त्यांचे व रिव्हेरा चे मतभेद झाले व ट्रॉट्स्कींनी तें ठिकाण सोडलें.

मार्च १९३९ च्या सुमारास ट्रॉट्स्कींनी कोयोकन शहरापासून दूर अव्हेनीद व्हियेना या नांवाचा एक जुना, पण चांगला भरभक्कम बंगला भाड्याने घेतला. हें वर्तमान स्टॅलिनच्या हस्तकांना समजतांच त्यांनी तें घर विकत घेण्याचाच घाट घातला. ट्रॉट्स्कींना हें समजतांच त्यांनीच तो बंगला विकत घेतला. हा बंगला फारसा सोईस्कर किंवा देखणा नव्हता, परंतु तो चांगला मजबूत होता. ट्रॉट्स्कींनी तो विकत घेतांच त्याची चांगली डागडुजी केली. निरीक्षण करणें सोपें जावें म्हणून एक उंच मनोरासुद्धा उभारला. ते तिथे राहायला गेल्यापासून त्या बंगल्याच्या आंत ट्रॉट्स्कींचे सात–आठ अनुयायी आलटून–पालटून जागता पहारा करीत. शिवाय या बंगल्याच्या बाहेर सरकारने सहा–सात पोलिसांचा अहोरात्र पहारा बसविला होता.

कोणत्याहि कामासाठी ट्रॉट्स्कींना शहरांत जावयाचें म्हणजे फार मोठा कार्यक्रम होई. ट्रॉट्स्की, त्यांच्याबरोबर त्यांची दुसरी पत्नी नटालया व एक

शरीरसंरक्षक, असे मोटारींतून जात. शहरांत प्रवेश करतांच ट्रॉट्स्कींना आपला चेहरा झाकून घ्यावा लागे. तसेंच केव्हा, कोठे व किती वेळ जावयाचें याविषयी पूर्ण गुप्तता ठेवावी लागे.

ॲव्हेनीद व्हियेना येथे राहावयास आल्यापासून ट्रॉट्स्कींना एक प्रकारची कैदच भोगावी लागे. फक्त फरक एवढाच की, त्यांच्यावर दुसऱ्या कुणाचींहि बंधनें नव्हतीं. पण स्वसंरक्षणासाठी त्यांना फार बंधनें पाळावीं लागत. आणि इतकें करूनहि सुरक्षिततेची त्यांना धाकधुक वाटतच राही.

त्या बंगल्याच्या आवारांत त्यांनी पुष्कळ ससे पाळले होते. शिवाय त्यांना आसपासच्या डोंगराळ भागांत आढळणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या निवडुंगांचे नमुने गोळा करण्याचा नाद लागला होता. त्यांचें वय झालें होतें, तरीहि त्यांची प्रकृति बरी असली म्हणजे त्यांचा उत्साह उतू जात असे आणि पुष्कळदा एक छोटी कुदळ खांद्यावर टाकून निवडुंगांचे नमुने गोळा करण्यासाठी स्वारी गुपचुप पसार होई. अशा स्वाऱ्यांतून डोंगरावरून चढ-उतार करीत असतांना त्यांच्या उत्साहाला उधाण येई. जुने मित्र, कार्यकर्ते, पुढारी, लेखक, संपादक वगैरे लोकांची सतत ये-जा चालू असे. त्यामुळे तेथील आयुष्यक्रम पुष्कळसा चांगला जाई. अन्यथा सर्व आयुष्य अतिशय घाईगर्दीत घालविलेल्या त्या जोडप्याला तेथील आयुष्यक्रम अगदीच सुना वाटला असता.

१९३९ च्या ऑक्टोबर महिन्यांत श्री. आल्फ्रेड व सौ. मार्गारिट, हें रोज्मर दांपत्य श्री. ट्रॉट्स्की यांना भेटायला आलें. पहिल्या महायुद्धापासून त्यांची व श्री. ट्रॉट्स्की यांची मैत्री होती. त्यामुळे त्यांच्या भेटीमुळे ट्रॉट्स्कींना विलक्षण आनंद वाटला. आल्फ्रेड व ट्रॉट्स्की या दोघांनी मिळून जुना पत्रव्यवहार पालथा घातला व पुनः एकदा जुनें आयुष्य उपभोगण्याचा आनंद लुटला. त्यांची ही भेट ट्रॉट्स्की दांपत्याला आनंददायक वाटली. याला आणखी एक कारण होतें. या रोज्मर ( Rosmer ) दांपत्याबरोबर ट्रॉट्स्कींचा एकुलता एक नातू सेवा ( Seva ) हाहि आला होता. ट्रॉट्स्कींचें सारें आयुष्यच एक

प्रकारे नाट्यपूर्ण व चमत्कारिक असें होतें. त्यांचें कौटुंबिक आयुष्यहि तसेंच नाट्यपूर्ण व शोकान्त होतें. ट्रॉट्स्कींना पहिल्या पत्नीपासून दोन मुली झाल्या. झिना व निना अशीं त्यांचीं नांवें होतीं. जेव्हा ट्रॉट्स्की सैबेरियांतून पळून आले, तेव्हा झिना दोन वर्षांची होती व निना अगदी लहान होती. झिनाला ट्रॉट्स्कींचा फार ळळा होता. रोज सकाळीं उठल्याबरोबर ती ट्रॉट्स्कींना 'गुडमॉर्निंग' करायला जायची ! ज्या रात्रीं ट्रॉट्स्की सैबेरियांतून पळून आले त्या रात्रीं ती शांतपणे झोपली होती. दुसऱ्या दिवशी सकाळीं नेहमीप्रमाणे ट्रॉट्स्कींना 'गुडमॉर्निंग' करायला ती गेली, पण–पण ! ट्रॉट्स्कींच्या अंथरुणांत नुसताच एक लाकडाचा ओंडका ठेविलेला होता. झिनाने नेहमीप्रमाणे टॉट्स्कींच्या पलंगावर झेप घेतली, पण तिला त्यांच्याऐवजी लाकडाचा स्पर्श झाला. झिनाने किंकाळी फोडली...परंतु तिच्या आईने तिला गप्प केलें, कारण तिला पोलिसांपासून ही बातमी गुप्त ठेवायची होती. टॉट्स्कींना सहीसलामत रशियापार व्हायचें होतें. बिचारी झिना ! तिला उघडपणे रडतासुद्धा आलें नाही.

निना व झिना या दोन्ही मुली व त्यांचे पति १९३९ सालापर्यंत मृत्युमुखीं पडले होते. त्यांच्या पतींना स्टॅलिनने आपल्या कराल हस्तकांमार्फत यमसदनास पाठविलें होतें, तर त्यांची खंत करून, दारिद्र्याने, उपासमारीने या दोन्ही मेल्या होत्या. पैकी निना ट्रॉट्स्की 'आल्मा आटा' येथे असतांनाच वारली व दुःखातिरेकाने, निनाची चाकरी करून व मनःस्ताप सहन करून झिना अगदी वेडीपिशी झाली आणि या वेडाच्या भरांत संतापाने एक दिवस तिने बर्लिनमध्ये आत्महत्या केली.

या झिनाचा मुलगा सेवा ! श्री. ट्रॉट्स्की यांचेकडे येण्यापूर्वी सेवा कांही दिवस आपल्या मामाकडे म्हणजे ट्रॉट्स्कींच्या लायोव्हा नांवाच्या मुलाकडे होता. या लायोव्हालाहि स्टॅलिनच्या हस्तकांनी ठार केलें. त्यानंतर त्याच्या मामीने सेवाला सांभाळलें. ट्रॉट्स्कींच्या वंशाचा तो एकुलता एक आप्ततंतु होता. म्हणूनच तो आपल्याकडे राहावा, वाढावा, असें ट्रॉटस्कींना वाटे.

श्री. आल्फ्रेड व मार्गारेट रोज्मर यांच्याबरोबर आलेल्या सेवाला पाहून ट्रॉट्स्कींना फारच आनंद झाला. नटालयाने तर त्याला कवटाळून त्याच्या माथीं अश्रूंचा वर्षाव केला. हें पाहून व अनुभवून श्री. ट्रॉट्स्कींसारखा विचारवंतसुद्धा बर्फासारखा विरघळला. रोज्मर दांपत्यालाहि भडभडून आलें. ॲव्हेनीद व्हियेना या किल्लेवजा घरांतील हा प्रसंग त्यांच्या चिरकाल स्मरणांत राहील असाच होता. सेवाच्या अस्तित्वामुळे वार्धक्याची छाया पडलेल्या घरांत बालपणाचा शिरकाव झाला.

ट्रॉट्स्कींना कोणत्याहि प्रकारचा निर्भेळ आनंद कधीहि मिळूं द्यावयाचा नाही, असा त्यांच्या दैवाने जणू विडाच उचलला होता. कारण या रोज्मर दांपत्याबरोबरच दुसऱ्या एका व्यक्तीचें आगमन झालें. ती व्यक्ति म्हणजे रेमन मेर्काडर ( Ramon Mercader ) ऊर्फ जॅक्सन ही होय !

रोज्मर यांचे घरीं अमेरिकेंत जी चौथी इंटरनॅशनलची बैठक झाली त्या बैठकीच्या वेळीं या जॅक्सनची व रोज्मरची प्रथम ओळख झाली. ‘ सिल्व्हिया एजलोफ ’ या नांवाची एक अमेरिकन तरुणीहि त्या बैठकीला हजर होती. या तरुणीला ट्रॉट्स्की यांचें राजकीय तत्त्वज्ञान व विचार पटत होते. या तरुणीचा हा ‘ मित्र ’ होता. अर्थात रोज्मर मात्र स्वतः जॅक्सनची व त्यांची ओळख प्रथम मेक्सिकोंतच झाली असें स्पष्टपणे सांगतात. पण तें कांही असो, तेव्हापासून जॅक्सनने सिल्व्हियाचा ‘ मित्र ’ म्हणून रोज्मर कुटुंबाची मैत्री वाढविली. स्वतःला तो व्यापारी कंपनीचा फिरता प्रतिनिधि, खेळाडू व अपक्षीय म्हणवून घेत होता. रोज्मर कुटुंबाला नाना प्रकारे वेळीअवेळी निःस्वार्थीपणे उपयोगी पडून त्याने आपलेंसें करून घेतलें होतें. जॅक्सनने अत्यंत सावधगिरीने, कोणत्याहि प्रकारची घाई न करतां आपल्या उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल करावयास सुरवात केली होती.

दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागल्यामुळे जागतिक परिस्थितीहि झपाट्याने बदलत होती. विशेषतः हिटलरने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत करून जेव्हा

फ्रान्सवर धडक मारली, तेव्हा स्टॅलिनचा धीर खचला. ट्रॉट्स्की स्वत: व ट्रॉट्स्कीवादी, स्टॅलिनविरुद्ध लोकमत तयार करीतच होते. भरीस भर म्हणून जेव्हा ट्रॉट्स्कींनी अमेरिकेंत जाऊन सिनेटर डाइस समितीपुढे साक्ष द्यावयाचें कबूल केलें तेव्हा स्टॅलिनचा धीर सुटला. कारण अमेरिकेंत साम्यवादी पक्ष अमेरिकेच्या विरुद्ध कोणत्या प्रकारच्या कारवाया करतो तें या समितीला शोधून काढावयाचें होतें. हें सर्व लक्षांत घेऊन स्टॅलिनने ट्रॉट्स्कींचा कायमचा बंदोबस्त करून टाकायचा निश्चय केला.

स्टॅलिनच्या प्रचारकांनी मेक्सिकोंतील तेलखाणींचे मालक व सिनेटर डाइस यांच्याशी संगनमत करून मेक्सिकन जनतेच्या विरोधी अशा कारवाया ट्रॉट्स्की करीत आहेत असा प्रचार करावयास सुरवात केली. एक मे १९४० रोजी मेक्सिकोंतील स्टॅलिनच्या पक्षपाती मजुरांनी, ट्रॉट्स्कींच्या निषेधार्थ एक मोठी मिरवणूक काढली. या मिरवणुकींत सुमारे वीस हजार कामगारांनी भाग घेतला. हे कामगार साध्याच पोशाखांत होते व सर्वांनी "ट्रॉट्स्कीला हाकून द्या" अशा आशयाचे फलक आपल्या हातीं घेतले होते. त्यामुळे मेक्सिकोंत विचित्र वातावरण तयार व्हायला मदत झाली.

ट्रॉट्स्कींनी थोड्या आतताईपणे वागून आपलें फार नुकसान करून घेतलें. सिनेटर डाइस समितीने ट्रॉट्स्कींची साक्ष काढावयाचें ठरवितांच साक्ष द्यावयाचें कबूल करून गप्प बसण्याऐवजी त्या साक्षींत आपण कोणत्या प्रकारची भूमिका मांडणार आहोंत हेंहि ट्रॉट्स्कींनी जाहीर करून टाकलें. त्यामुळे अमेरिकन सरकारने ट्रॉट्स्कींना अमेरिकेंत प्रवेश द्यावयाचें नाकारलें व त्यामुळे डाइस समितीपुढे त्यांची साक्ष झालीच नाही.

मेक्सिकोंत ट्रॉट्स्कीविरोधी निदर्शनें होतांच ट्रॉट्स्कींनी आपण डाइस समितीपुढे साक्ष देणार नसल्याचें जाहीर केलें. तसेच आपण कोणत्याहि प्रकारे मेक्सिकन जनतेविरुद्ध कारवाया करीत नाही, अशा प्रकारचें निवेदन प्रसिद्ध केलें. परंतु तरीहि या निदर्शनांचा मेक्सिकन लोकमतावर परिणाम झालाच.

मेक्सिकोचे त्या वेळचे प्रेसिडेंट श्री. कार्डेनस यांनी ट्रॉट्स्कींचें म्हणणें मान्य करून स्टॅलिनवाद्यांनी केलेले आरोप आपल्याला मान्य नाहीत असें जाहीर केलें. परंतु तरीहि या निदर्शनांमुळे ट्रॉट्स्कींच्या पत्नीला मेक्सिकोंत धक्का बसला हें मान्य करावयास हवें.

एवढें सर्व होईपर्यंत ट्रॉट्स्कींचा मारेकरी तयार झाला होता. पूर्वनियोजित पद्धतीने अत्यंत सावधगिरीने त्याने ट्रॉट्स्कींच्या किल्लेवजा घरांत प्रवेश मिळविला होता. सिल्व्हिया एजलोफची त्याने १९३८ सालींच ओळख करून घेतली होती. त्या वेळीं त्याने आपलें नांव जॅक मोर्नार्ड असें सांगितलें होतें. पॅरिसमध्ये त्याची व सिल्व्हियाची ओळख झाली ती केवळ योगायोगाने नव्हती. सिल्व्हिया व तिची बहीण यांच्यावर रशियन गुप्तचरांचें बारीक लक्ष होतें. या दोघी बहिणी ट्रॉट्स्कीवादी होत्या. सिल्व्हियाची बहीण ट्रॉट्स्कींची गुप्त बातमीदार म्हणूनहि पुष्कळदा काम करी. सिल्व्हियाने तत्त्वज्ञान व मानस-शास्त्र या विषयाची कोलंबिया विद्यापीठाची पदवी मिळविली होती. शिवाय तिला रशियन, फ्रेंच, स्पॅनिश वगैरे भाषा उत्तम येत. त्यामुळे ट्रॉट्स्कींना तिची आपल्या कामांत पुष्कळच मदत होई.

सिल्व्हिया तरुण होती व दिसायला अगदी बेताची होती. जॅक्सनने तिच्यावर प्रेम केल्याचा बहाणा केला व सिल्व्हिया त्याच्या प्रेमाला बळी पडली. तिने जॅक्सनच्या सहवासांत कित्येक महिने फ्रान्समध्ये घालविले. तारुण्याच्या व पहिल्या प्रेमाच्या उन्मादांत तिने कांही महिने तर अगदी स्वप्नांत वावरल्याप्रमाणे घालविले...अत्यंत घनिष्ट संबंध आल्यामुळे सिल्व्हियाला पुष्कळदा त्याची वागणूक विचित्र वाटे. त्याबद्दल तिने त्याला छेडलेहि होतें. पण प्रणयाच्या गुलाबी वातावरणांत गुंगल्यामुळे तिला त्याच्यापासून आपल्याला किंवा ट्रॉट्स्कींना कोणताहि धोका असल्याचा संशयसुद्धा आला नाही. पण तरीहि तो करीत असलेला बारेमाप खर्च व निरनिराळ्या लोकांशी असलेले त्याचे संबंध सिल्व्हियाला अस्वस्थ करीत.

रोज्मर दांपत्याबरोबर जॅक्सन ऑक्टोबर १९३९ मध्ये मेक्सिकोला आला. त्यानंतर जानेवारी १९४० मध्ये सिल्व्हिया आली व ट्रॉट्स्कींच्या घरी जाऊन त्यांची सेक्रेटरी म्हणून काम करूं लागली. जॅक्सन रोज आपल्या आलीशान मोटारींतून सिल्व्हियाला " अॅव्हेनीदा व्हियेना " या ट्रॉट्स्कींच्या निवासस्थानीं आणून सोडी व पुनः तिचें काम संपायच्या वेळीं अॅव्हेनीदा व्हियेनाच्या दरवाजापाशी हजर होई. त्याचा हा क्रम रोज चालू होता. त्यामुळें दरवाजा-वर असलेले पहारेकरी व इतर लोक यांच्याशी त्याची ओळख झाली. पुढे तर त्यांची चांगलीच दोस्ती जमली. पण तरीहि त्याने त्यानंतरहि कित्येक महिनेपर्यंत ट्रॉट्स्कींच्या त्या किल्लेवजा घरांत नुसतें डोकावूनसुद्धा पाहिलें नाही. रोज्मर दांपत्याची तर त्याने चांगलीच मर्जी संपादन केली होती. तो त्यांना नेहमी जेवायला बोलावी व कुठेहि जायचें असलें तर आपल्या मोटारीतून घेऊन जाई व आणून पोचवी. त्यामुळे व सिल्व्हियाचा भावी पति म्हणून त्याच्याविषयी सर्वांना एक प्रकारचें कुतुहल व आपुलकी वाटे.

परंतु असें असलें तरी त्याच्या कांही वागणुकीचा सिल्व्हियाला संशय येई. त्याची नोकरी नेमकी कोणती आहे, कोठे आहे याविषयी त्याने तिला दाद लागूं दिली नव्हती. त्यामुळे सिल्व्हिया अतिशय सावधानतेने वागे. तिने जॅक्सनला अॅव्हेनीदा व्हियेनाचा दरवाजा ओलांडून आपल्याबरोबर केव्हाहि आंत येऊ दिलें नव्हतें. ट्रॉट्स्कींचें तर त्याला तिने दर्शनसुद्धा घडूं दिलें नव्हतें. म्हणूनच ती जेव्हा १९४० च्या मार्च महिन्यांत पुनः अमेरिकेला गेली, तेव्हा तिने त्याला आपल्या गैरहजेरीत ट्रॉट्स्कींच्या निवासस्थानीं केव्हाहि जाऊं नकोस असें बजाविलें होतें. एवढेच नव्हे तर तिने त्याच्याकडून तसें अभिवचन घेतलें होतें.

पण ते अभिवचन त्याला पाळतां आलें नाही. कारण त्यानंतर थोड्याच दिवसांत श्री. रोज्मर आजारी पडले व त्यांना मेक्सिकोमधील दवाखान्यांत नेण्यासाठी जॅक्सनला बोलावण्यांत आलें. आणि त्यानंतर औषधें आणणें,

इतर कांही चीजवस्तु लागल्यास ती आणून देणे वगैरे कामांसाठी जॅक्सन "अॅव्हेनीदा व्हियेना"मध्ये जात-येत राहिला. जॅक्सन अशा तऱ्हेनें जरी ट्रॉट्स्कींच्या घराची व त्यांच्या जीवन पद्धतीची माहिती मिळवीत होता तरी त्याची व श्री. ट्रॉट्स्की यांची प्रत्यक्ष भेट मात्र त्यानंतर तीन महिन्यांनी झाली.

या सर्व गोष्टी तो अगदी न चुकतां सिल्व्हियाला पत्राने कळवीत होता. या सर्व वागणुकीवरून असें दिसतें कीं, तोंपर्यंत ट्रॉट्स्कींना ठार कारण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविण्यांत आली नव्हती. त्याला फक्त ट्रॉट्स्कींसंबंधीची अगदी बारीक सारीक माहिती गोळा करण्याची कामगिरी सांगण्यांत आली होती.

ट्रॉट्स्कींना, सशस्त्र हल्ला करून ठार मारण्याची, कामगिरी श्री. डेव्हिड आल्फारो सिकैर ( David Alfaro Siqueior ) या कम्युनिस्ट नेत्याकडे सोपविण्यांत आली होती. हा चित्रकार रिव्हेराचा मित्र असून स्वतः उत्तम चित्रकार होता. स्पेनमधील यादवीयुद्धांत त्याने पुष्कळ मोठी कामगिरी पार पाडली होती; तसेंच त्याने पुष्कळ पल्टणींचें नेतृत्वहि केलें होतें. नुकताच तो मेक्सिकोंत येऊन दाखल झाला होता आणि तेथील खाण कामगारांचा नेता म्हणून वावरूं लागला होता. त्याच्यावर कम्युनिस्ट पक्षाच्या पैशाचा गैरवापर केल्याचा आरोप नुकताच सिद्ध झाला होता व त्यामुळे त्याला कम्युनिस्ट पुढाऱ्यांची मर्जी पुनः संपादन करण्यासाठी कांही तरी अचाट धाडस करून दाखविणें आवश्यक होतें. म्हणूनच त्याने ही कामगिरी आपल्या शिरावर घेतली होती. जॅक्सनने पुरविलेल्या माहितीचा उपयोग करून सिकैराने सर्व आराखडा तयार केला व निवडक लोकांसह तो आपली कामगिरी पार पाडण्यासाठी मुक्रर करण्यांत आलेल्या दिवसाची प्रतीक्षा करीत बसला.

दरम्यानच्या काळांत अॅव्हेनीदा व्हियेनामधील लोकसुद्धा हे जाणूनच होते; तेव्हा ज्या प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत त्या वाचून ट्रॉट्स्की तर एकदा म्हणालेसुद्धा म्हणजे की, "अशा प्रकारचें लिखाण प्रसिद्ध होऊं लागलें म्हणजे थोडयाच काळांत लोक लेखणी सोडून तरवार हातांत घेतात." अॅव्हेनीदा

व्हियेनाला एखाद्या तुरुंगाचें स्वरूप आलें होतें. विजेच्या तारांचें जाळें त्याच्या भोंवतीं पसण्यांत आलें होतें. भयसूचक घंटा बसविण्यांत आल्या होत्या. पहारा करणाऱ्यांच्या संख्येंत वाढ करण्यांत आली होती. शक्य ती सर्व काळजी घेण्यांत आली होती.

ट्रॉट्स्कीवाद्यांनी ट्रॉट्स्कींचें संरक्षण करण्याचा चंग बांधला होता. अमेरिकेंतून स्वयंसेवकांच्या संरक्षक तुकड्या येत. तीन–चार आठवडे काम केल्यावर परत जात. कारण तेथील दिनक्रम अत्यंत कंटाळवाणा असे. सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत नुसता पहारा करीत उभें राहायचें ! साहजिकच स्वयंसेवकसुद्धा कंटाळून जात आणि तसें होणें अगदी अपरिहार्य होतें. सारांश एवढी सर्व काळजी घेऊनसुद्धा ट्रॉट्स्कींचें संरक्षण होणें न होणें हें केवळ दैवयोगावरच अवलंबून होतें. कारण ट्रॉट्स्कींचे प्रतिस्पर्धी फार सामर्थ्यशाली होते. पण या परिस्थितींत बदल करणें ट्रॉट्स्कींना शक्य नव्हतें.

तेवीस मे १९४० या दिवशी शेवटी ट्रॉट्स्कींवर हल्ला झाला. त्या दिवशीं नेहमीप्रमाणे ट्रॉट्स्कींनी बरीच रात्र होईपर्यंत काम केलें व नंतर दिवा मालवून ते झोपी गेले. बराच वेळपर्यंत अंथरुणावर तसेच पडून राहिले तरी त्यांना झोप येईना. शेवटी त्यांनी झोप येण्यासाठी एक गोळी घेतली व थोड्या वेळाने त्यांना झांपड आली. एवढ्यांत त्यांच्या कानावर " मशीन गन "च्या गोळीबाराचा आवाज ऐकूं आला. प्रथम त्यांना वाटलें की, मेक्सिकन लोकांचा शिमग्यासारखा एक सण असतो. तो सण साजरा करण्यासाठीच ते गोळीबार करीत असावेत. परंतु अगदी दुसऱ्या क्षणाला त्यांना जाणीव झाली की, गोळीचा आवाज आपल्या खोलींतच — या इथे — अगदी — जवळ आला असावा.

एवढा विचार त्यांच्या मनांत येतो न येतो तोच त्यांच्या नाकाला जळालेल्या दारूचा वास झोंबला परंतु ते तसेच पडून होते. मात्र नटालयाने आपल्या अंथरुणांतून उडी मारून स्वत:ला ट्रॉट्स्कींच्या अंगावर झोकून दिलें होतें. क्षण

दोन क्षण असे गेले. अगदी निमिषार्धात नटाल्याने ट्रॉट्स्कींना पलंगावरून खाली ढकलून दिलें. काय होतें तें समजण्याच्या आंत ट्रॉट्स्की पलंग व भिंत यांच्या मधील फटींत पडले. त्यांच्या अंगावर नटाल्या आपण स्वतः पडून राहिली. एवढें होतें न होतें तेवढयांत ट्रॉट्स्की ज्या पलंगावर झोपले होते, त्या पलंगावर बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव सुरू झाला. मशीन गनमधून निदान दोनशे तरी गोळ्या झाडल्या गेल्या असाव्यात. भिंतीवर सुमारे सत्तर गोळ्यांनी भोकें पाडलीं होतीं. सर्व खोलींत बंदुकीच्या दारूचा वास भरून राहिला होता. पांच सहा मिनिटें नटाल्या व ट्रॉट्स्की मुडद्यासारखीं पडून होतीं. नुसत्या श्वासांचा आवाजसुद्धा केवढा तरी वाटत होता.

बाहेरचे पहारेकरी व पोलिस यांचें काय झालें असेल, असा विचार त्यांच्या मनांत येऊन गेला. एवढयांत "आजोबा!" अशी आर्त भेदरलेली केविलवाणी किंकाळी त्यांच्या कानावर आली. नटाल्या व ट्रॉट्स्की यांचें रक्त गोठलें. त्या किंकाळीने ट्रॉट्स्कींचें काळीज चिरलें. नटाल्या तर पडल्या पडल्याच थिजली! पण एकच क्षण. दुसऱ्या क्षणीं ती वर उठण्याचा प्रयत्न करूं लागली. पण ट्रॉट्स्कीने तिला उठूं दिलें नाही–ते एवढेच म्हणाले की त्यांनी सेवाला ठार केलें असें वाटतें...किंवा त्यांनी त्याला पळवून नेलें असावें...त्या रात्रीची महाभयंकर आठवण म्हणून ती किंकाळी नटालयाच्या कानांत भेदून राहिली होती. नुसतें स्मरण झालें तरी त्या आठवणीने नटाल्याला हुडहुडी भरे.

नंतर सर्वत्र शांतता पसरली. भयाण भेसूर! नटाल्या व ट्रॉट्स्की यांचे नुसते श्वास चालू होते. पण तेसुद्धा थिजल्यासारखे वाटत! ट्रॉट्स्की कुजबुजले- त्यांनी सेवाला पळवून नेलें–एवढ्यांत सेवाच्या खोलींत एक हात बॉंब फुटल्याचा आवाज ऐकूं आला. त्या प्रकाशांत नटाल्या व ट्रॉट्स्की यांना त्यांच्या खोलीच्या दरवाजापाशी एक बंदुकधारी व्यक्ति उभी असलेली दिसली. त्या व्यक्तीने पुनः एकदां ट्रॉटस्कीच्या पलंगाकडे पाहिलें आणि पुनः जणु खात्री करून घेण्यासाठी त्याने आणखी एक फेर त्या अंथरुणावर झाडली. त्याच्या

प्रकाशांत पुनः त्या व्यक्तीचा चेहरा व चकचकणारें पितळेचें बटन नटालयाला दिसलें व नंतर ती व्यक्ति झपाट्याने निघून गेली.

नटालयाला सारखें वाटत होतें की आता मी ट्रॉट्स्कीला कसें वांचविणार! कुठे ठेवणार त्याला! हे मारेकरी आत्ता क्षणार्धांत परत येतील आणि ट्रॉट्स्कीला ठार करतील! संपली! माझी ताकद संपली...आणि मग शेवटी तिच्या मनांत आलें, ट्रॉट्स्की जिवंत तर आहे ना? रोज्मरचें काय झालें? सर्व पहारेकऱ्यांना तर त्यांनी ठार केलें नाही ना?

एवढ्यांत तिच्या कानांवर पुनः सेवाचा आवाज आला. मार्गारेट-आल्फ्रेड-पण या खेपेचा त्याचा आवाज चांगला होता. उत्साही वाटत होता. जणुं तो त्यांना फसवून पळत पळत परत आला होता. तो आवाज ऐकतांच ट्रॉट्स्कींना प्राण आले. सेवानेसुद्धा स्वतःचे प्राण वांचविले होते. पहिलीच गोळी त्याच्या पायाच्या घोट्याला लागली होती. त्यासरशीं त्याच्या तोंडून ती किंकाळी बाहेर पडली. त्यानेहि ट्रॉट्स्कीप्रमाणेच अंथरुणाखाली पडून राहून आपला जीव वांचविला होता. गोळीबार थांबला असें वाटतांच तो तेथून बाहेर पडला होता. ट्रॉट्स्कींच्या खोलींतून आलेल्या गोळीबाराच्या आवाजावरून ते दोघेहि ठार झाले असावेत असें मानून सेवाने रोज्मर दांपत्याच्या नांवाने हाका मारावयास सुरवात केली.

एवढें घडल्यानंतर निमिषार्धांत घरांतील सारीं माणसें अंगणांत गोळा झालीं. तेथे जमलेल्यांपैकीं कुणालाहि फारशी इजा झालेली नव्हती. घरांतील सगळीं माणसें तेथे गोळा झाली होतीं. त्यावरून कुणीहि मारलें गेलें नव्हतें हें स्पष्टच होतें. या सर्व गोंधळामुळे संरक्षक स्वयंसेवक इतके गांगरून गेले होते की दरवाजाबाहेरील पोलिसांचें काय झालें आहे हें पहाण्याचेंसुद्धा त्यांना भान राहिलें नाही. सर्वजण एकमेकांकडे नुसते पहात उभे होते.

एवढ्यांत ट्रॉट्स्की स्वतःच दरवाजाबाहेर आले. तेथील संरक्षक पोलिसांचीं हत्यारें काढून घेण्यांत आलीं होतीं व त्यांच्या मुसक्या बांधण्यांत आल्या

होत्या. त्यांना ट्रॉट्स्कींनी सोडविलें आणि मग त्यांच्या तोंडून सर्व हकीकत कळाली.

पहाटे चार वाजण्याच्या सुमारास वीस पंचवीस माणसें आलीं. त्यांनी बाहेरच्या पोलिसांचीं हत्यारें काढून घेतलीं व त्यांच्या मुसक्या बांधिल्या. हें सर्व निमिषार्धांत झालें. सर्व माणसें पोलिसांच्या व सैनिकांच्या गणवेषांत होतीं. त्यांचें नेतृत्व मेजरचा हुद्दा धारण करणाऱ्या एका व्यक्तीपाशी होतें. नंतर त्यांचें व रॉबर्ट शेल्डन हार्ट या स्वयंसेवकाशी कांहीं बोलणें झालें. त्याचेपाशीं बाहेरच्या दरवाजाच्या किल्ल्या होता. हें बोलणें संपतांच रॉबर्टने किल्ल्या घेऊन दरवाजा उघडला. दरवाजा उघडतांच ते आंत शिरले. झाडांच्या आडोशानें त्यांनी आपल्या मशीनगन उभारल्या व ट्रॉट्स्कींच्या खोलीवर धडाक्यानें गोळीबार करावयास सुरवात केली. हा गोळीबार करण्यांत ट्रॉट्स्की कुटुंबाला ठार करणें हाच त्यांचा हेतु होता हें उघडच होतें.

एवढे झाल्यावर त्यांनी सेवाच्या खोलींत एक हातबॉंब टाकला. घराच्या अंगणांत असलेल्या ट्रॉट्स्कींच्याच मालकीच्या दोन्ही मोटारींत हे सर्व लोक बसले व पळून गेले. जातांना त्यांनी बाहेरून अंगणांत एक बॉंब टाकला आणि रॉबर्ट शेल्डन हार्ट याला जबरदस्तीने पळवून नेलें. रॉबर्ट कांही प्रतिकार करीत नव्हता. अंगणांत टाकलेला बॉंब उडाला नाही. त्यामुळे कुणाला कांही इजा झाली नाही.

अगदी अचानकपणे सर्वांची सुटका झालेली पाहून सर्वांनाच एकप्रकारें आनंद वाटत होता. जिवावर बेतलेलें कसेंबसें निभावून गेलें असें सर्वांनाच वाटत होतें. हें सर्व पाहात असतांना ट्रॉट्स्कींना वाटूं लागलें की, पाहा किती नाट्यपूर्ण पद्धतीने आपली सुटका झाली ! आता स्टॅलिनच्या कारवाया जग-जाहीर होतील. जग त्याच्या तोंडांत शेण घालील ! स्टॅलिनच्या मारेकऱ्यांच्या तावडींतून आपण केवळ दैवयोगानेच वाचलों. पण रॉबर्ट त्यांना कसा सामील झाला ! त्याला त्यांनी कां पळवून नेलें ? मारेकऱ्यांना आपल्या निवासस्थानाची

किती अचूक माहिती होती! आपल्याच मोटारींतून त्यांना पळून जातां येईल हेंसुद्धा त्यांच्या योजनेंत होतें! रॉबर्टला ते नक्कीच ठार करतील! असल्या विचारांनी ट्रॉट्स्कीच्या मनांत गोंधळ उडवून दिला होता.

एवढ्यांत मेक्सिकोमधील गुप्त पोलिसांचा कर्नल प्रमुख सालाझार तेथे जातीने हजर झाला. त्याने तावडतोब ट्रॉट्स्कींना हांका मारावयास सुरवात केली. ट्रॉट्स्की व नटाल्या दोघेहि बाहेर आले. ट्रॉट्स्कींनी नुसताच पायजमा घातला होता व घाईघाईने आपला गाऊन अंगांत सरकाविला होता. ते दोघेहि अगदी शांत दिसत होते. जणुं कांही घडलेंच नाही अशा पद्धतीने ट्रॉट्स्कींनी सालाझारचें स्वागत केलें. सालाझारने ट्रॉट्स्कींना काय काय घडलें तें विचारलें. ट्रॉट्स्कींनी अगदी बारीक सारीक तपशिलासह सर्व प्रसंगाचें बिनचूक वर्णन केलें. हें सर्व करीत असतांना अशा प्रकारचा खुनी हल्ला ट्रॉट्स्कींवर झाला असावा असा संशयसुद्धा त्यांच्या सांगण्यावरून किंवा चर्येवरून कुणालाहि आला नसता.

हें सर्व ऐकून सालाझारला अशी शंका आली की हें सारें बनावट तर नसावें ना? कारण एवढ्या मोठ्या प्रमाणावर हल्ला झालेला असतांना कुणालाहि कोणत्याहि प्रकारची इजा कशी झाली नाही? अशा शंका मनांत येत असतांनाच सालाझार सर्व परिस्थिति पाहात होता. ट्रॉट्स्की त्याच्याबरोबर हिंडत होते. आणि तरीहि त्याच्या चेहऱ्यावर भीति, उत्कंठा किंवा आश्चर्य यांचा मागमूससुद्धा दिसत नव्हता. त्यामुळे सालाझारची अधिकाधिक खात्री पटत होती की हें सारें बनावट आहे. हे विचार मनांत घोळत असतांनाच त्याने ट्रॉट्स्कींना विचारलें, "तुमचा कुणावर संशय तर नाही ना? हें सारें कारस्थान कुणी रचलें असावें?"

ट्रॉट्स्की क्षणभर गंभीर झाले व उद्गारले, "होय! या सर्व कटाचा सूत्रधार एकच! तो म्हणजे जोसेफ स्टॅलिन!"

हें ऐकतांच सालाझारची खात्रीच पटली की स्टॅलिनला बदनाम करण्यासाठी ट्रॉट्स्कीनेच हा बनाव रचला आहे. चौकशी करणें भाग होतें म्हणून त्याने

ट्रॉट्स्कींचे दोन सेक्रेटरी, एक मोलकरीण वगैरे तीन-चार लोकांना अटक करून ताब्यांत घेतलें. चौकशी चालू होतांच या हल्ल्याविषयींच्या निरनिराळ्या अफवा ऐकूं येऊं लागल्या. विशेषतः ट्रॉट्स्कींचें जें म्हणणें होतें कीं स्टॅलिनच्या हस्तकांनीच हा हल्ला केलेला आहे हें तर सालाझारला बिलकुल पटेना. ट्रॉट्स्कींनी पुनः पुनः विनंति करूनहि सालाझारने स्थानिक कम्युनिस्ट पुढाऱ्यांची चौकशी करण्याचें नाकारलें.

ट्रॉट्स्कींचें असें म्हणणें होतें की रॉबर्टला त्यांनी ठार केलें असलें पाहिजे. पण सालाझारला हें बिल्कूल मान्य नव्हतें. त्यांचें म्हणणें असें कीं मारेकऱ्यांशी संगनमत करून तो पळून गेला आहे. कारण त्याच्या सहकार्याशिवाय या लोकांना आंत प्रवेश तरी कसा मिळाला असता ?

जवळ जवळ एक महिना विशेष कांही न घडतांच गेला. या हल्ल्याचा सूत्रधार कोण हें समजण्यासाठी आवश्यक अशी कोणतीहि नवीन माहिती हातीं आली नाही. परंतु "हा सर्व बनाव ट्रॉट्स्कींनीच घडवून आणला असावा, ट्रॉट्स्कींना मेक्सिकन सरकारला बदनाम करावयाचें आहे," वगैरे कंड्या मेक्सिकोंत उठूं लागल्या. त्यामुळे ट्रॉट्स्कींना फक्त मनस्ताप झाला एवढेच !

शेवटीं एक महिन्यानंतर पहाटें चार वाजतां सालाझार ट्रॉट्स्कींच्या घरीं गेला. त्यांनी पहारेकऱ्यांना सांगितलें कीं, रॉबर्टचें प्रेत सांपडलें आहे. पण पहारेकऱ्यांनी ट्रॉट्स्कींना उठावावयाचें नाकारलें. त्यामुळे तो परत गेला. जातांना त्याने एका पहारेकऱ्यालाहि आपल्याबरोबर नेलें. कारण रॉबर्टला ओळखणारा कुणीतरी हवा होता.

ट्रॉट्स्कींच्या निवासस्थानापासून सुमारें एका मैलाच्या अंतरावरील एका शेतांत रॉबर्टचें प्रेत उकरून काढून ठेवण्यांत आलें होतें. कायदेशीर पंचनामा व तपासणी होईपर्यंत सकाळचे दहा वाजायला आले. रॉबर्टचें प्रेत सांपडल्याची बातमी शहरांत पसरली होती व लोकांचे लोंढे तें पहाण्यास लोटत होते. प्रेता-

भोवती पोलिस बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. एवढ्यांत सभोंवताली जमलेल्या गर्दीतून वाट काढीत स्वत: ट्रॉट्स्कीच तेथे हजर झाले.

ट्रॉट्स्कींनी त्या प्रेताकडे एकदां अनिमिष नेत्रांनी पाहिलें. पुतळ्यासारखे ते क्षणभर निश्चल झाले. विशाल कपाळावर विखुरलेले पांढरे केंस व चष्म्यांतून रोखून पाहणारे त्यांचे डोळे. क्षणभर त्यांची दृष्टि शिजल्यासारखी झाली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. जणुं त्यांना रॉबर्टच्या जागीं आपलेंच शरीर दिसत होतें. १९१७ च्या क्रांतीचा नेता, हजारों क्रांतिकारकांचें स्फूर्ति-स्थान ठरलेला हा युगप्रवर्तक पुरुष, आपल्या एका सेक्रेटरीचें, स्वयंसेवकाचें शव पाहून अश्रु ढाळीत होता.

ट्रॉट्स्कींनी सालाझारला पुन: सांगितलें की स्टॅलिनचे हस्तकच त्याच्या मृत्यूला कारणीभूत आहेत. परंतु सालाझारला तें पटत नव्हतें. शेवटीं ट्रॉट्स्कींनी सांगितलें की माझे सेक्रेटरी नाहींसे होण्याचा हा पहिलाच प्रसंग नाहीं. आतापर्यंत माझ्या आठ सेक्रेटरींचा स्टॅलिनने बळी घेतलेला आहे. हा नववा बळी आहे. तुम्हांला तें पटणार नसेल तर माझा नाइलाज आहे...

दिवस जात होते पण अव्हेनीदा व्हियेना या ट्रॉट्स्कींच्या निवासस्थानावरील मृत्यूची छाया कायम होती. रोज सकाळीं उठतांच ट्रॉट्स्की आपल्या पत्नीला म्हणत, अजून आपण जिवंत आहोंत. आपल्याला ठार करण्याची तारीख पुढें ढकललेली दिसते. मृत्यु आपल्याभोवती आपले पाश आवळीत आहे याची जाणीव ट्रॉट्स्कींना सदैव होतीच परंतु ते आपले सर्व व्यवहार अगदीं चोखपणे करीत होते. चौकशींत भाग घेत आपल्यावरील आरोपांचें खंडन करीत. दिवसभर शांतपणें काम करीत. सर्व कांही व्यवस्थित चालू होतें.

जवळ जवळ २८ मे १९४० पर्यंत ट्रॉट्स्कींच्या मारेकऱ्यांची व ट्रॉट्स्कींची दृष्टभेटसुद्धा झाली नव्हती. तो योग शेवटी त्या दिवशीं आला. रोज्मर कुटुंबाने त्या दिवशीं परत जावयाचें ठरविलें होतें. त्यांना ॲव्हेनीदा व्हियेनापासून व्हेरा क्रूझ या बंदरापर्यंत आपल्या गाडींतून पोंचतें करण्याचें जॅक्सनने

कबूल केलं होतें. नाहीतरी स्वतःच्या कामासाठी त्याला व्हेराक्रूझ बंदरी जायचेंच होतें, अशी बतावणी त्याने केली होती. त्यांना पोचवून देण्यासाठी तो सकाळींच गाडी घेऊन आला. ट्रॉट्स्की आपल्या ससांना खाऊं घालण्यांत गुंतले होते. रोज्मर दांपत्याची तयारी होईपर्यंत त्याला अंगणांतच थांबावयास सांगण्यांत आलें. या वेळींसुद्धा जॅक्सन अतिशय धूर्तपणें वागला. अंगणांत प्रवेश करतांच तो ट्रॉट्स्कींच्या जवळ गेला त्याने त्यांच्याशीं हस्तांदोलन केलें. आणि त्यांच्याशीं कोणत्याहि प्रकारें फालत् गप्पा मारण्याचा प्रयत्न न करतां तो लगेच आंतल्या खोलींत सेवापाशीं गेला. त्याला त्याने एक विमान खेळणें म्हणून दिलें व तें कसें उडवावें वगैरे गोष्टी तो त्याला समजून सांगूं लागला.

एवढें झाल्यावर ट्रॉट्स्कींच्या सूचनेवरूनच नटाल्याने जॅक्सनला त्यांच्याबरोबर चहा घेण्याची विनंति केली व नंतर त्याने रोज्मर कुटुंबाला व्हेराक्रूझ बंदरावर पोचतें केलें. त्यानंतर दहा–पंधरा दिवसांत तो ट्रॉट्स्कींच्या निवास-स्थानाकडे फिरकलासुद्धा नाही. त्यानंतर पुनः एकदा तो आला आणि फक्त एवढेंच सांगून गेला की, आपण अमेरिकेंत जात आहों व आपली गाडी ट्रॉट्स्कींच्या स्वयंसेवकांसाठी ठेवून जात आहों. त्यानंतर महिनाभराने तो परत आला पण ट्रॉट्स्कींच्या निवासस्थानाकडे फिरकलासुद्धा नाही. शेवटीं ट्रॉट्स्कींनीच त्याला व सिल्व्हियाला आपल्याकडे चहाला निमंत्रण पाठविलें, तेव्हाच तो आला.

ट्रॉट्स्कींची व त्याची ही भेट सर्वांत दीर्घ अशी होती. त्यानंतरसुद्धा तो फारच कमी वेळा ट्रॉट्स्कींच्या घरीं आला. त्याची वागणूक तर अशी असे की, कुणालाहि शंका येणें शक्य नव्हतें. नेहमीं येतांना तो एखादा फुलांचा गुच्छ किंवा एखादी खाऊची पुडी घेऊन येई व "हें सिल्व्हियाने पाठविलें आहे," असें सांगे. एवढेंच काय पण ट्रॉट्स्कींच्याबरोबर निरनिराळ्या निवडुंगांच्या जाती हुडकण्यासाठी डोंगर दऱ्यांतून त्यांच्याबरोबर जाण्याची त्याची इच्छा त्याने कित्येकदां बोलून दाखविली होती–परंतु प्रत्यक्षांत तो केव्हाहि त्यांचे बरोबर गेला नाही. ट्रॉट्स्की व नटाल्या यांच्या सान्निध्यांत असतांना तो फारसें बोलत नसे; पण पहारेकरी व इतर लोक यांच्याशीं गप्पा मारतांना तो रंगांत येऊन गप्पा मारी.

दरम्यानच्या कालांत अमेरिकन ट्रॉट्स्कीवाद्यांत दोन तट पडले होते आणि

सिल्व्हिया, बर्नहॅम व शॅचमनच्या पंथाला जाऊन मिळाली होती. परंतु तरीहि ट्रॉट्स्कींच्या घरीं तिला मुक्तद्वार होतें.

या वेळी जेव्हा जॅक्सन अमेरिकेला जाऊन आला, तेव्हाच त्याला ट्रॉट्स्कींचा खून करण्याचा आदेश मिळाला असावा; कारण त्यानंतर सिल्व्हियाला त्याच्या वागणुकींत अतिशय बदल घडून आलेला दिसला. उत्साही व एकाच ठिकाणीं कधीहि पडून न राहणारा जॅक्सन कित्येक दिवस अंथरुणांतून बाहेरहि पडत नसे. अधूनमधून मात्र त्याच्या उत्साहाला उधाण येई.

नटालया व ट्रॉट्स्की यांनासुद्धा अधूनमधून त्याच्या वागणुकीचा अचंबा वाटे--कधी कधी संशयसुद्धा येई. पण म्हणतात ना, मृत्यु पुढे आला म्हणजे सर्वांची मति कुंठित होते. तसेंच ट्रॉट्स्कींचें झालें असें म्हटलें पाहिजे. अन्यथा कित्येक लोकांना दाद न देणारे, प्रतिस्पर्ध्यांचा कावा सर्वांआधी ओळखणारे ट्रॉट्स्कीसुद्धा जॅक्सनच्या बाबतींत का गाफील राहावेत? एकदा तर ट्रॉट्स्की आणि श्री. हॅन्सेन यांच्यासह ट्रॉट्स्कींच्या घराची चाललेली डागडुजी पाहतांना जॅक्सन म्हणालासुद्धा की, या डागडुजीचा काय उपयोग! स्टॅलिन दुसऱ्या वेळीं कदाचित दुसरेंच शस्त्र वापरील. ट्रॉट्स्कींनी त्याला विचारलें की, तुमच्या मतें स्टॅलिन कोणत्या प्रकारचें शस्त्र वापरील? त्यावर तो खांदे उडवून गप्प बसला.

परंतु कां कुणास ठाऊक ट्रॉट्स्कींना मात्र त्या दिवसापासून असें वाटूं लागलें की, हा तरुण कांही विश्वासार्ह नाही. एवढेंच काय पण नटालयाशीं बोलतांना ते म्हणालेसुद्धा की, जॅक्सनपासून आपल्याला सांभाळून राहिलें पाहिजे. परंतु तरीहि ट्रॉट्स्कींची न्यायबुद्धि या प्रकरणाचा पूर्ण छडा लावल्या-शिवाय जॅक्सनला दोषी ठरवावयास तयार नव्हती.

सतरा ऑगस्ट १९४० या दिवशीं जॅक्सन पुन: ट्रॉट्स्कींच्या घरीं आला. त्या दिवशीं त्याने एक लेख लिहून आणिला होता. बर्नहॅम व शॅचमन यांच्या भूमिका कशा चुकीच्या आहेत, तें त्या लेखांत त्याने दाखवून दिलें आहे असें त्याचें म्हणणें होतें. ट्रॉट्स्कींना त्याने तो वाचून पाहून त्यांत आवश्यक तर सुधारणा सुचविण्याची विनंति केली. मोठ्या धूर्तपणें जॅक्सनने आपलें जाळें टाकलें होतें. आपल्या अनुयायांना शिकविण्याची, मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आपलीच आहे असें वाटून, अनिच्छेने का होईना ट्रॉट्स्कींनी

१०८८७

त्याला आपल्या अभ्यासाच्या खोलीत बोलाविलें. तेथे ट्रॉट्स्कींच्या समोरच्या खुर्चीवर बसून त्याने ट्रॉट्स्कींना वाचीत असतांना पाहिलें.

नंतर दोन–तीन दिवस असेच गेले. ट्रॉट्स्कींनी स्टॅलिन चरित्र लिहावयास सुरवात केली होती. तें पुरे करावयाचें होतें. शिवाय अनेक ठिकाणीं लेख लिहावयाचे होते.

दिनांक २० ऑगस्ट १९४० हा तो शेवटचा दिवस ! त्या दिवशीं सकाळीं सातच्या सुमारास ट्रॉट्स्की उठले. त्यांनी आपला नित्यक्रम संपविला. मग त्यांनी डिक्टा–फोनवर एक लेख मुद्रित केला. नंतर संपूर्ण दिवसभर अतिशय शांत मनाने आपलें काम केलें व सायंकाळीं पांचच्या सुमारास अंगणांतील सशांच्या पिंजऱ्याकडे ते गेले. पिंजऱ्यांचें दार उघडून सशांना त्यांनी मोकळें केलें व त्यांना खाऊं घातलें. एवढ्यांत हॅट व कोट घातलेली एक व्यक्ति त्यांच्याशीं बोलत उभी असलेली नटालयाला दिसली. पाहते तर जॅक्सन !

त्याला पाहतांच तिच्या मनांत अनेक शंकाकुशंका येऊन गेल्या. हा वरचेवर कां येतो ? आणि नेहमी थंडींतसुद्धा कोट न घालणारा हा जॅक्सन आज इतके उकडत असतांना कोट घालून कां आला आहे ? तिने त्याला खरं म्हणजे तसें विचारलेंसुद्धा ! पण जॅक्सन म्हणाला की, “ कदाचित् पाऊस पडेल असें वाटलें म्हणून कोट घातला ” एवढें बोलून त्याने तहान लागली आहे–थोडं पाणी द्या असें सांगितलें.

ट्रॉट्स्की त्याच्याकडे पाहात म्हणाले, “ काय दुरुस्त्या केल्यात का ? ” त्याने होय म्हणत ‘ टाइप ’ केलेले कागद पुढे केले. एका हाताने त्याने आपला कोट मात्र घट्ट आंवळून धरला होता. त्याच्याशीं बोलत बोलत ट्रॉट्स्की आपल्या अभ्यासाच्या खोलीकडे गेले. खरं म्हणजे दिवसभर काम केल्यामुळे ट्रॉट्स्कींना आणखी काम करावेंसें मुळीच वाटत नव्हतें. पण आपण सुचविलेल्या दुरुस्त्या करून आणल्यानंतर पुनः तो लेख वाचून पाहण्याची आपली नैतिक जबाबदारी पार पाडण्यासाठीच ते आंत गेले.

ट्रॉट्स्की आपल्या खुर्चीवर बसले व जॅक्सन त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसला. त्याची बसण्याची पद्धति ट्रॉट्स्कींना मुळीच आवडली नाही. पण उगाच दुसऱ्याला वागणुकीचे धडे कशाला द्या, म्हणून ते गप्प बसले.

त्यांनी पहिलें पान वाचून संपविलें असेल–नसेल तोंच त्यांच्या डोक्यावर

जोराने आघात झाला. जॅक्सनने आपल्या कोटांत लपविलेली बर्फ फोडण्याची कुदळ घेऊन सर्व शक्तीनिशी तिचा प्रहार ट्रॉट्स्कींच्या डोक्यावर केला होता. प्रहार होतांच ट्रॉट्स्की जोराने ओरडले. जॅक्सनने नंतर आपल्या जबानींत सांगितलें की ती किंकाळी अजूनहि माझ्या कानांत भरून राहिली आहे.

जॅक्सनची अशी अपेक्षा होती की, एकाच प्रहाराने ट्रॉट्स्की मरून पडतील. त्यांच्या तोंडून शब्दसुद्धा फुटणार नाही. पण घडलें भलतेंच! प्रहार होतांच ट्रॉट्स्की जोराने ओरडले व क्षणाचाहि विलंब न लावितां त्यांनी हाताला येईल ती वस्तु जॅक्सनवर फेकून मारायला सुरवात केली–कागद–पुस्तकें–दौत–डिक्टाफोन यांचा वर्षाव जॅक्सनवर झाला. आणि नंतर मात्र चित्याच्या चपळाईने, सारें बळ एकवटून, केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी जॅक्सनशीं दोन हात करावयास सुरवात केली आयुष्यांतील शेवटची लढाई ते लढत होते! हरण्यासाठी! पण तरीहि प्राणपणाने, सर्व सामर्थ्यानिशी, जिद्दीने! जणूं मरतां मरतांसुद्धा झगडलेंच पाहिजे, अपयश आलें, पराभव पत्करावा लागला तरीहि जीवनांत झगडण्याशिवाय गत्यंतर नाही, हेंच त्यांना आपल्या उदाहरणाने सिद्ध करावयाचें होतें.

त्यांच्या किंकाळीने नटाल्या, व संरक्षक स्वयंसेवक गोंधळून गेले. तीन–चार मिनिटें कुठे कुणाला काय झालें आहे तेंच उमगेना. तेवढ्यांत नटाल्या ट्रॉट्स्कींच्या अभ्यासिकेंत शिरली. जॅक्सनच्या अंगाशीं झोंबतांना रक्तस्रावामुळे त्यांचे अवयव लुळे पडत होते. अवयवांतील त्राण संपत होते. नटाल्याने दरवाजा उघडून आंत प्रवेश करायला व ट्रॉट्स्की जॅक्सनच्या समोर कोसळायला एकच गाठ पडली. नटाल्याने पुढे होऊन त्यांना आधार दिला. त्यांच्या साऱ्या अंगावर रक्त सांडलें होतें. त्यांचा चेहरा रक्ताने माखला होता. नटाल्याने विचारलें, "काय? झालें तरी काय तुम्हांला?"

क्षणभर ते गप्प राहिले आणि मग म्हणाले, "जॅक्सन! जॅक्सनने हें केलें!" त्यांच्या बोलण्यांत राग किंवा चीड नव्हती! जणूं त्यांना हें तेव्हाच पटलें होतें की जॅक्सन केवळ निमित्तमात्र आहे. या साऱ्याचा सूत्रधार दुसराच आहे...

जॅक्सनने हें केलें एवढें बोलून ते क्षण-दोन क्षण गप्प झाले आणि मग ते एकाएकी नटाल्याला म्हणाले, "नटाल्या! माझं तुझ्यावर फार प्रेम आहे–

फार फार प्रेम आहे !" हें ऐकतांच नटालयाला गहिवरून आलें. ती त्यांच्या जवळ सरकली व त्यांना आधार देऊन चालू लागली. चालतां चालतां म्हणाली, "कुणाचीहि झडती घेतल्याशिवाय तुम्हांला भेटूं देतां कामा नये."

एवढ्यांत ते एका चटईवर कोसळले. नटालयाने त्यांच्या डोक्याखाली उशी ठेवली व त्यांच्या जखमेवर एक बर्फाचा खडा ठेवला.

सारे संरक्षक व त्यांचा सेक्रेटरी यांनी 'जॅक्सन'ला बदडायला सुरवात केली. तें ऐकून 'ट्रॉट्स्की' म्हणाले की, "त्याला मारूं नका—त्याला मारतां कामा नये. त्याला बोलायला लावलें पाहिजे–त्याच्यामागे फार मोठे लोक असले पाहिजेत ! स्टॅलिनच्या हस्तकांचेंच हें काम आहे...त्याला मला ठार मारायचं होतं. पण तें जमलं नाही. मींच त्याला नामोहरम केलें."

नटालया व हॅन्सेन त्यांच्या दोन्ही बाजूला बसले. तें पाहून हॅन्सेनकडे वळून ते म्हणाले, "हा शेवटचा अंक आहे ! आतां यांतून जगत नाही मी !"

हॅन्सेनने त्यांना सांगितलें की, त्यांच्या डोक्यावर बर्फ फोडण्याच्या कुदळीने प्रहार करण्यांत आला आहे. जखम कांही गंभीर स्वरूपाची नाही. तुम्हांला कांही भीति नाही.

हें ऐकतांच ट्रॉट्स्की ताबडतोब म्हणाले, "नाही, नाही ! या इथे वार झाला आहे." त्यांनी आपल्या हृदयाकडे बोट दाखविलें "शेवटीं त्यांना यश आलें. या खेपेला त्याचं काम फत्ते झालं ! माझं म्हणून जें जें आहे तें सारें माझ्या नटालयाला मिळालें पाहिजे ! माझ्या पश्चात् सर्व हक्क तिच्याकडे आले पाहिजेत ! तिने खूप भोगलें आहे ! आयुष्य...कसलं ! यातना... यातना—कैद निराशा...तिची काळजी घ्या !"

सर्व प्रकारची काळजी घेऊन त्यांना ऑपरेशनसाठी हॉस्पिटलमध्ये नेण्यांत आलें. तेथे त्याच दिवशीं सायंकाळीं सात वाजून वीस मिनिटांनी त्यांना ऑपरेशनसाठी तयार करण्यांत आलें. त्यांनी नटालयाला जवळ बोलावलें. नटालयाने त्यांच्या ओठावर ओंठ टेकले. त्यांनीहि थरथरत्या ओठांनी नटालयाचें चुंबन घेतलें. तेंच शेवटचें ! जणूं ते सर्व शक्तिनिशी आपल्या पत्नीचा-प्रेयसीचा-निरोप घेत होते.

नटालया—धीराने परिस्थितीला तोंड देत होती. जाणूनबुजून निखाऱ्याला ती कुशींत वागवीत होती. त्याचे चटके आणि ऊब भोगीत होती. मात्र आता

ती अवाक् झाली होती. जणुं तिलाहि हें कळत होतें की, आता संपलं ! हें चुंबन शेवटचं ! मागे हात धरून ती अगदी स्तब्धपणें उभी होती. ट्रॉट्स्कींच्या डोळ्यांवर झांपड येत होती. सारेंच संपलें होतें. जीवनाचा झगडा संपुष्टांत आला होता.

ट्रॉट्स्कींना भूल देण्यांत आली. पांच डॉक्टर सतत चार तासपर्यंत ऑपरेशन करण्यांत गुंतले होते. कवटी फोडून कुदळीचें पातें सुमारे तीन इंच आंत गेलें होतें. कवटीच्या हाडाचे तुकडे मेंदूंत घुसले होते. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ऑपरेशन यशस्वी झालें पण ट्रॉट्स्कींना शुद्ध आली नाही. दुसऱ्या दिवशीं म्हणजे २१ ऑगस्ट १९४० रोजीं सायंकाळीं साडेसात वाजतां त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. उत्तरीय तपासणींत असें आढळून आलें की, त्यांचा मेंदू व हृदय सामान्य माणसाच्या दीडपट आकाराचें होतें.

मेक्सिकन पद्धतीनुसार फार मोठ्या इतमामाने त्यांची प्रेतयात्रा काढण्यांत आली. अंत्यदर्शनासाठी पांच दिवस त्यांचा देह ठेवून देण्यांत आला होता. सुमारे वीस हजार लोकांनी अंत्यदर्शन घेतलें. या कालांत अमेरिकेंतील ट्रॉट्स्कीवादी लोकांनी ट्रॉट्स्कींच्या देहावर अमेरिकेंत अंत्यसंस्कार करण्यांत यावेत अशी खटपट केली. पण अमेरिकन सरकारने ट्रॉट्स्कींच्या मृत देहालासुद्धा अमेरिकेंत न्यावयास परवानगी दिली नाही.

त्यांच्या अस्थि त्यांच्या किल्लेवजा घराच्या अंगणांत पुरण्यांत आल्या. त्यानंतर त्याच घरांत जवळजवळ वीस वर्षेपर्यंत नटालयाचें वास्तव्य होतें. दररोज सकाळीं ट्रॉट्स्कींच्या अस्थींवर उभारण्यांत आलेल्या दगडाचें तिला दर्शन घडे.

"प्रावदा" या रशियन मुखपत्रांत ट्रॉट्स्कींच्या मृत्यूविषयी फक्त एकच ओळ प्रसिद्ध करण्यांत आली होती. "भ्रमनिरास झालेल्या एका ट्रॉट्स्कीवाद्यानेच ट्रॉट्स्कीचा खून केला." ट्रॉट्स्की वारले पण त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या स्वरूपांत ते जिवंत आहेत. अजरामर आहेत.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों. दि: ................

# यु ऑंग सॉन

मंत्रालयाच्या दरवाज्यापुढे येऊन एक जीप थांबली. पांच व्यक्ति त्यांतून खाली उतरल्या आणि अतिशय झपाट्याने जिना चढून वरच्या मजल्यावर गेल्या. अजीबात वेळ न न दवडतां त्यांनी खिडकींतून आंत प्रवेश करून स्वयंचलित बंदुकीने यु ऑंग सॉन व त्याचे सहकारी यांच्यावर गोळ्या झाडल्या.

मे १९४७ पासून ब्रह्मदेशांत उत्साहाचें व आनंदाचें वातावरण पसरलें होतें. दीर्घकालीन पारतंत्र्यानंतर ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळणार होतें. त्याची तयारी चालू होती. ए. एफ्. पी. एल्. Anti-Fascist People's Freedom League या लोकप्रिय पक्षाच्या हातीं सर्व राजकारणाचीं सूत्रें येणार अशीं चिन्हें दिसत होतीं. या पक्षाचें नेतृत्व यु ऑंग सॉन या निग्रही व कर्तृत्ववान् नेत्याकडे होतें. ए. एफ्. पी. एल पक्षाची खास बैठक भरवून यु ऑंग सॉन यांनी कोणत्या तत्त्वांनुसार राज्यकारभार करावयाचा, त्या चौदा तत्त्वांचा एक आराखडा प्रसिद्ध केला होता, त्यानुसार निवडणुका लढविल्या होत्या व बहुमत मिळविलें होतें.

दि. १९ जुलै १९४७ या दिवशीं यु ऑंग सॉन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाची बैठक भरली होती. दुपारचा तीनचा सुमार! बाहेर धो धो पाऊस पडत होता व आंत ब्रह्मदेशाच्या भावी राज्यघटनेबाबत जोरदार चर्चा चालू होती. एवढ्यांत ब्रह्मी मंत्रालयाच्या आवारांत एक हिरव्या रंगाची जीप शिरली. त्या जीपला नंबर नव्हता.

मंत्रालयाच्या दरवाजापुढे येऊन ती जीप थांबली. ड्रायव्हर जीपमध्ये बसून राहिला व इतर पांचहि व्यक्ति झपाट्याने खाली उतरल्या आणि अतिशय झपाट्याने जिना चढून वरच्या मजल्यावर गेल्या. दरवाजांतून आंत प्रवेश करण्याइतका वेळ या सर्व लोकांना नव्हता. त्यांच्यापैकी एकाने तेथील पहारेकऱ्याला ठार केलें. त्यांपैकी दोघांच्या पाशीं दोन स्वयंचलित बंदुका होत्या. इतरांपाशीं साध्या बंदुका होत्या. अजीबात वेळ न दवडतां त्यांनी खिडकीतून आंत प्रवेश करून स्वयंचलित बंदुकीने यु ऑंग सॉन व त्यांचे सहकारी यांच्यावर गोळ्या

झाडल्या. निमिषार्धांत यु ऑंग सॉन व त्यांचे सहा सहकारी गतप्राण होऊन कोसळले. थाकिना, अब्दुल रझाक, महाबा खैंग, यु बा विन्, यु बा चो व मॉंग पॉ या लोकांना ठार करण्यांत आलें. यांचेपैकी थाकिन मा हे अर्थमंत्री होते. अब्दुल रझाक शिक्षण व नियोजन, महा बा खैंग उद्योग व मजूर, यु बा चो प्रसिद्धि व मॉंग पॉ हे सरहद्द प्रांत या खात्यांचे मंत्री होते. पैकी शेवटचे दोघेजण नंतर रुग्णालयांत दगावले. एवढें काम करून ते जिन्यावरून धडधडत खाली उतरले. तोंपर्यंत जीपच्या ड्रायव्हरने जीपचें तोंड वळवून ठेवलें होतें. सर्वजण जीपमध्ये बसून पसार झाले.

सारा ब्रह्मदेश दुःखाने हळहळला. यु ऑंग सॉन हा ब्रह्मी जनतेचा अत्यंत लाडका पुढारी होता. अवघ्या तेहतिसाव्या वर्षी त्यांची हत्या करण्यांत आली. निवडणुकांत त्यांच्या पक्षाला बहुमत मिळाल्यामुळे स्वतंत्र ब्रह्मदेशाचे ते पाहिले पंतप्रधान झाले असते.

यु ऑंग सॉन यांचें सारें आयुष्य एकाद्या कादंबरीप्रमाणे आहे. सॉन यांचा जन्म तेरा फेब्रुवारी १९१५ या दिवशीं झाला. त्यांचें नाटमाक हें गांव एक लहानसें शहर होतें. शालान्त परीक्षेपर्यंतचें त्यांचें शिक्षण तेथेच झालें. पण त्यांच्या मोठेपणाचीं पदचिन्हें त्यांनी रंगून विद्यापीठांत प्रवेश केल्यानंतर दिसून येऊं लागलीं. १९३२ सालीं त्यांनी रंगून विद्यापीठांत प्रवेश केला.

विद्यापीठांत प्रवेश केल्यापासून त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक दिसून येऊं लागली. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी भांडण्यांत ते नेहमीच आघाडीवर असत, त्यामुळे विद्यार्थी चळवळीचें नेतृत्व आपोआपच त्यांचेकडे आलें. अभ्यासांत त्यांची उत्तम प्रगति होती. राज्यशास्त्र, आधुनिक इतिहास व अर्थशास्त्र हे त्यांचे विषय होते. नंतर त्यांनी कायद्याचाहि अभ्यास केला होता. हें सर्व करीत असतांना विद्यापीठाकडून त्यांना अनेक शिष्यवृत्त्या व बक्षिसें मिळालीं होतीं.

परंतु विद्यार्थ्यांचें नेतृत्व घेतल्याबद्दल व १९३६ सालीं विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा मोठा संप घडवून आणल्याबद्दल त्यांना दोनदा विद्यापीठांतून घालवून देण्याची धमकी देण्यांत आली होती. शेवटीं १९३८ सालीं त्यांनी कायद्याचा अभ्यास करीत असतांनाच विद्यापीठाला रामराम ठोकला व ते पूर्ण वेळ राजकारणासाठीच देऊं लागले. त्यांनी दोभामा असी – अयोन (Dohbama Asi (Ayone)– या गांवाच्या राजकीय पक्षाचें सभासदत्व स्वीकारलें.

थु ऑंग सॉन यांचीं राजकीय मतें व दूरदृष्टि कशी पुरोगामी होती हें समजण्यासाठी ब्रह्मदेशाची राजकीय व शासकीय पार्श्वभूमि पाहाणें आवश्यक आहे.

विसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत ब्रिटिशांनी सर्व ब्रह्मदेशावर, तरवारीच्या जोरावर का होईना, पण कायद्याचें राज्य स्थापन केलें होतें. १८२६ सालापासून १९०० सालपर्यंत म्हणजे सुमारें पाऊणशे वर्षांनंतर हें साध्य झालें. कारण त्या कालीं ब्रह्मदेश हा पूर्णपणे मागासलेला होता. रस्ते नव्हते, रेल्वे नव्हत्या, बंदरें बांधलेलीं नव्हतीं व त्यामुळे राज्यकर्त्यांचा सर्व ब्रह्मदेशावर खऱ्या अर्थाने अंमलच नव्हता. कारण तें शक्यच नव्हतें.

ब्रिटिशांनी ब्रह्मदेश जिंकल्यानंतर तेथील राजघराण्यांतील लोकांना देशाबाहेर पाठवून दिलें व सैन्य वगैरे बरखास्त केलें. सैन्यांतून ज्यांना घरीं जावें लागलें अशा लोकांनी लुटालूट करणें, दरोडे घालणें, छोट्या-मोठ्या चोऱ्या करणें अशा प्रकारचे उद्योग आरंभले व त्यांचा प्रसार सर्व ब्रह्मदेशांत झाला. या सर्वांचा बंदोबस्त करावयास ब्रिटिशांना एवढा काल लागला.

१९१० सालपर्यंत ब्रह्मदेश शांत होता असें म्हणावयास हरकत नाही. परंतु त्यानंतर मात्र ब्रह्मदेशाला जाग यायला सुरवात झाली. भारतांत कॉंग्रेस स्थापन होऊन तिच्या सर्व देशभर शाखा स्थापन करण्यांत आल्या होत्या, तशाच त्या ब्रह्मदेशातहि स्थापन करण्यांत आल्या. विशेषतः भारताला मोर्ले-मिंटो सुधारणा देण्याचें जाहीर झाल्यापासून ब्रह्मी जनता अस्वस्थ झाली. आपल्यालाहि ' स्वराज्य ' मिळालें पाहिजे अशी जाणीव त्यांना झाली.

पहिल्या महायुद्धाचे कालांत या राष्ट्रीयतेच्या जाणीवेला पुष्कळ खतपाणी मिळालें. ब्रिटिशांनी भारत व ब्रह्मदेश अलग करण्याचा विचारहि याच काळांत बोलून दाखविला. त्यामुळे राष्ट्रीयतेच्या भावनेला आवाहन करावयास एक नवीन कारण मिळालें. आणि याचा परिणाम होऊन राजकीय जागृति व्हायला सुरवात झाली. १९२० सालीं ब्रह्मदेशांत रेल्वे, ट्रॅम, बंदरें व गोद्या वगैरे ठिकाणच्या मजुरांनी मोठे संप घडवून आणले, इतकेंच काय पण शाळा-कॉलेजांतील मुलेंसुद्धा संपावर गेलीं. खऱ्या अर्थाने राजकीय जागृतीला सुरवात झाली ती त्यानंतरच !

१९०८ साली वाय्. एम्. सी. ए. ( Young Men's Christian

Association ) च्या धर्तीवर एक वाय्. एम्. बी. ए. ( Young Men's Buddhist Association ) स्थापन करण्यांत आलें. राजकीय स्वरूपाचें कार्य करण्याचें उद्दिष्ट समोर ठेवून ही संघटना सुरू करण्यांत आली नव्हती. पण नंतर मात्र ती राजकीय संघटनाच ठरली. त्यानंतरच्या पंचवीस-तीस वर्षांच्या काळांत ब्रह्मदेशांत अनेक राजकीय संघटना निर्माण झाल्या. त्यांपैकी जी. सी. बी. ए. ( General Council of Buddhist Association ), एम्. पी. पी. (Moderate Peoples Party), जी. व्ही. पी. ( Golden Valy Party ) वगैरे पक्ष नंतर प्रसिद्धीला आले व कालांतराने विलय पावले.

१९३६ सालीं झालेल्या रंगून विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या संपाचें नेतृत्व यु ऑंग सॉन यांचेकडे होतें. ब्रह्मदेश भारतापासून अलग केल्यानंतर ब्रह्मी लोकसभेच्या ( House of Representatives ) त्याच सालीं निवडणुका घेण्यांत आल्या होता. व त्यांत कोणत्याहि एका पक्षाला निर्णायक बहुमत मिळालें नाही. बा मॉ ( Ba Maw ) यांनी 'सिनमेथा पार्टी' या नांवाचा पक्ष स्थापन केला होता. या पक्षालाहि कांही जागा मिळाल्या होत्या. त्यांनी इतर कांही पक्षांशीं संगनमत करून प्रथम पंतप्रधान होण्याचा मान मिळविला.

बा मॉ यांच्या सरकारने ब्रह्मी शेतकऱ्यांच्या कल्याणाची कळकळ दाखविली. पण इतर विरोधी पक्षांनी त्यांच्या पक्षाला कसून विरोध करावयास सुरवात केली. विशेषत: दोभामा असी-अयोन या पक्षाने फारच जोर धरला. हा थाकिन् पक्ष होता. शिवाय या पक्षाला यु ऑंग सॉन येऊन मिळाले होते. या पक्षाच्या चिथावणीमुळे सर्वत्र संप घडून येऊं लागले.

ब्रह्मदेशाच्या इतिहासांत १९३८ साल हें अतिशय उलाढालीचें ठरलें. जुलै-ऑगस्टमध्ये बौद्धधर्मीय लोक व इस्लामधर्मीय लोक यांच्यांत दंगली सुरू झाल्या. रंगूनमध्ये तर या दंगलीं नि फार उग्र स्वरूप धारण केलें. बौद्ध भिक्षूसुद्धा या दंगलींत सामील झाले. याचा परिणाम असा झाला की, बा मॉचें मंत्रिमंडळ फेब्रुवारी १९३९ मध्ये गडगडलें. मंत्रिमंडळ गडगडतांच बा मॉने थाकिन पक्षीयांशीं हातमिळवणी केली.

यु ऑंग सॉन हे पूर्वीपासून संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रचार करीतच होते. त्यांना डॉ. बा मॉ येऊन मिळाले व त्यांनी फ्रीडम ब्लॉक या नांवाचा नवीन

पक्ष स्थापन केला. या पक्षाचें अध्यक्षपद डॉ. बा मॉ यांचेकडे होतें व यु ऑंग सॉन हे त्या पक्षाचे प्रमुख चिटणीस होते.

या राजकीय घटना ब्रह्मदेशांत घडत असतांनाच दुसरें महायुद्ध सुरू झालें. दुसरें महायुद्ध सुरू होतांच डॉ. बा मॉ व यु ऑंग सॉन यांनी एका बाजूने "ब्रिटिशांना मदत करूं नका" असा प्रचाराचा घोशाच सुरू केला. आणि दुसरीकडून निदान युद्धबंदी होतांच ब्रह्मदेशाला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचें आश्वासन द्या अशी मागणी सुरू केली. यु ऑंग सॉन व डॉ. बा मॉ हे दोघेहि एकच प्रचार करीत होते. त्यामुळे या दोघांनाहि संरक्षण कायद्यान्वयें पकडण्यांत आलें. डॉ. बा मॉ यांच्यावर खटला भरण्यांत येऊन त्यांची तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. यु ऑंग सॉग यांना मात्र कांही दिवसांनंतर सोडून देण्यांत आलें. दोन्ही पुढारी तुरुंगांत गेल्यामुळे फ्रीडम ब्लॉक हा पक्ष नामशेष झाला.

यु ऑंग सॉन तुरुंगांतून सुटतांच पुनः थाकिन पक्षाचें काम करूं लागले. १९४० च्या मार्च महिन्यांत यु ऑंग सॉन यांनी थाकिन पक्षातर्फे रामगढ येथे झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनांत भाग घेतला. तेव्हा त्यांनी गया, बनारस, आग्रा, दिल्ली, अलाहाबाद, पेशावर, लाहोर, मुंबई वगैरे भारताच्या भागांत दौरा केला. परत रंगूनला जातांच त्यांनी रंगून विद्यापीठाच्या नियामक मंडळावर काम करावयास सुरवात केली.

हें सर्व करीत असतांना यु ऑंग सॉन यांना अनंत प्रकारच्या आर्थिक व सामाजिक अडचणींना तोंड द्यावें लागलें. या अडचणींतून केवळ यु ऑंग सॉन म्हणून निभावून गेले असें म्हटलें पाहिजे. विद्यार्थिदशेपासून त्यांनी आपल्याला देशसेवा करावयाची आहे हें जणूं ठरवून ठेविलें होतें. कारण केवळ परीक्षेसाठी म्हणून त्यांनी केव्हाहि अभ्यास केला नाही.

विद्यार्थी संघटनांचें काम असो किंवा अन्य कोणतेंहि काम असो. एकदा त्यांत पडलें की, सर्व शक्तिनिशी तें करावयाचें असा त्यांचा बाणा होता. पुष्कळशा राजकीय पुढाऱ्यांच्या अंगीं असणारे गुण यु ऑंग सॉन यांचेपाशीं नव्हते. प्रथम प्रथम तर ते लोकांशीं अतिशय तुसडेपणें वागत. स्वतःइतकें परिस्थितीचें सम्यक् ज्ञान कुणालाहि नाही, असा त्यांचा दावा असे व ते तो आपल्या सहकाऱ्यांना क्षगदी स्पष्टपणे सांगत. त्यामुळे पुष्कळदा त्यांच्यावर

त्यांचे सहकारी रुष्ट होत. एवढेंच काय त्यांना रस्त्यांत जर कुणी अभिवादन केलें तर ते त्याला प्रतिसाद देतीलच अशी खात्री नसे.

दोभामा असी–अयोन या राजकीय पक्षांत गेल्यापासून त्यांना थाकिन् हें उपपद लागलें व ते थाकिन पक्षीयांमध्ये अगदी चपखल बसून गेले. मात्र तेव्हापासून त्यांना त्यांच्या आईवडिलांकडून येणारी रक्कम बंद झाली. अर्थात त्याबद्दल त्यांना कधीच वाईट वाटलें नाही.

व्यक्तिगत वागणुकींत ते कमालीचे गैदी होते. ते सकाळीं उशिरा उठत. रात्ररात्र झोंपत नसत. एकदा वाचायला लागले म्हणजे त्यांना कशाचेंहि भान राहात नसे. एकदा कपडे घातले म्हणजे ते अगदी घाण होईपर्यंत काढीत नसत. वाचनांत किंवा विचारांत गढून गेले म्हणजे ते एकेक आठवडाभर आंघोळसुद्धा करीत नसत. मग त्यांचे मित्र त्यांना आंघोळ करण्याची आठवण करीत.

थाकिन पक्षाचें काम करूं लागल्यापासून त्यांनी आपल्या आईला एक वोटभर चिठ्ठीसुद्धा पाठविली नव्हती. ते सर्व भावंडांत लहान असल्यामुळे त्यांच्यावर आईची फार माया होती. चार महिनेपर्यंत वाट पाहून त्यांची आई त्यांना भेटायला आली. तर तेव्हा ते धड तिच्याशीं बोललेसुद्धा नाहीत. पंधरावीस मिनिटांतच त्यांची भेट संपली. त्यांच्या आईला फार वाईट वाटलें. पण ऑंग सॉंग तिला स्टेशनवर पोंचवायला गेले. तेव्हाहि त्यांचें बोलणें असें झालेंच नाही. गाडी सुटतांच मात्र त्यांनी सर्वांसमक्ष गुडघे टेकून तिला नमस्कार केला. त्याबद्दल त्यांचे मित्र त्यांना हसले पण त्याची त्यांना पर्वा नव्हती.

आपल्या मित्रांशीं व सहकाऱ्यांशीं वागतांना ते कोणत्याहि प्रकारचे शिष्टाचार पाळीत नसत. आपल्याकडे पैसे असले म्हणजे सर्वांसाठी अगदी मोकळेपणाने ते खर्च करीत. स्त्रियांच्या सान्निध्यांत असले तर मात्र त्यांची फार केविलवाणी परिस्थिति होई. ते फारच लाजत व त्यांना काय व कसें बोलावें तेंच समजत नसे.

थाकिन पक्षाच्या स्त्री सदस्यांचा त्यामुळे त्यांच्यावर फार रोष होता. परंतु अत्यंत मूलगामी, स्वतंत्र व निर्भीड विचारसरणीमुळे त्यांची लोकप्रियता वाढीला लागली. शिवाय त्यांच्या प्रांजलपणाबद्दल कुणालाहि शंका येत नसे. आपल्याकडे पैसे नसले तर ते दोन–दोन दिवस उपास काढीत, पण त्याबद्दल कुरकुरत नसत. तसेंच त्यामुळे त्यांच्या वाचनांत किंवा इतर कार्यक्रमांत कोणताहि फरक

पडत नसे. दुसऱ्याच्या रागावण्याचा त्यांच्यावर अजिबात परिणाम होत नसे. त्यामुळेसुद्धा त्यांचे प्रतिस्पर्धी पुष्कळदा नामोहरम होत. एखाद्या विषयावर बोलायचें असलें तर त्या विषयाव्यतिरिक्त त्यांना इतर कशाचेंहि भान राहात नसे. एकदा एका ठिकाणीं ते भाषण करायला गेले होते. परत येतांना त्यांना आपलीं पादत्राणें शोधून काढतां येईनात कारण तीं कोणत्या प्रकारचीं होतीं हेंच त्यांना आठवेना.

हे सर्व दोष किंवा उणीवा त्यांचे मित्र नेहमीच त्यांच्या ध्यानीं आणून देत. त्या ते मान्य करीत व सुधारण्याचा प्रयत्न करीन असें आश्वासन देत. समाजांत वावरण्याचा त्यांना जसजसा अनुभव येऊं लागला तसतसा त्यांचा गबाळेपणा कमी झाला. पण एखाद्या विषयावर लक्ष केंद्रित झालें म्हणजे मग त्या व्यतिरिक्त अन्य कोणताहि विचार त्यांच्या मनांतसुद्धा शिरेनासा होई. हा त्यांच्या बुद्धीचा गुणधर्म शेवटपर्यंत कायम होता.

भारताच्या दौऱ्याहून परत जातांच ब्रह्मदेशच्या त्या वेळच्या सरकारने ऑंग सॉनवर पकड वॉरंट काढलें. ऑंग सॉन व त्यांचे मित्र यांना तें कळतांच त्यांनी भूमिगत व्हायचें ठरविलें. परंतु तेवढ्यावर भागलें नाही. ते व त्यांचा बो यान ऑंग या नांवाचा एक मित्र असे दोघेहि ब्रह्मदेशांतून पळून गेले. प्रथम ते ॲमॉय या आंतरराष्ट्रीय वसाहतींत जाऊन राहिले व तेथून जपानी लोकांशीं संधान बांधून शेवटी १२ नोव्हेंबर १९४० या दिवशीं ते जपानमध्ये पोचले.

टोकियो येथे जपानी पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करून त्यांनी असें ठरविलें की, प्रथम ब्रह्मदेशांतील कांही लोकांना सैनिकी शिक्षण देण्यांत यावें. त्यानंतर त्यांच्यामार्फत ब्रह्मदेशांत राष्ट्रीय सैन्याची उभारणी करावी व जपान्यांनी बाहेरून ब्रह्मदेशावर हल्ला करतांच आंतून ब्रह्मी सैन्यानेहि ब्रिटिशांविरुद्ध उठाव करावा. ही योजना मान्य होतांच ऑंग सॉन पुनः ब्रह्मदेशांत परत आले. आणि आपल्याबरोबर आणखी तीस तरुणांना घेऊन परत जपानमध्ये गेले. तेथे त्यांनी संपूर्ण वर्षभर सर्वप्रकारचें सैनिकी शिक्षण घेतलें व ते १९४३ मध्ये बँकॉकला येऊन दाखल झाले.

तेथे येतांच त्यांनी जपान्यांच्या मदतीने ब्रह्मी मुक्तिफौज ( Burma Independence Army ) निर्माण केली. जपान्यांनी ब्रह्मदेशावर स्वारी

करतांच ब्रह्मी मुक्तिफौजेनेहि त्यांच्याबरोबरच कूच केलें व जपान्यांना मदत केली. या आघाडीवर लढत असतांनाच ब्रह्मी पुढाऱ्यांचे व जपानी नेत्यांचे मतभेद झाले. यु ऑंग सॉन यांनी जपान्यांविरुद्ध ब्रह्मी फौजेचा उठाव करण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. त्याचा परिणाम फक्त एवढाच झाला की, ब्रह्मी मुक्ति फौज कमी करण्यांत आली. त्यांपैकीं कांही सैनिक व अधिकारी यांची ब्रह्मदेश संरक्षक सेना ( Burmese Defence Army ) निर्माण करण्यांत आली. परंतु सुदैवाने त्या सेनेवरील प्रमुख अधिकारी म्हणून यु ऑंग सॉन यांचीच नेमणूक करण्यांत आली.

मे १९४२ मध्ये जपान्यांनी ब्रह्मदेश पादाक्रांत केला. ब्रह्मदेशांतील थाकिन लोकांनी जपान्यांशी प्रथम संधान बांधलें असल्यामुळे त्यांची बहुसंख्या असलेल्या दोभामा असी–अयोन पक्षाला प्राधान्य मिळालें. त्याच पक्षाचे नेते डॉ. बा मॉ यांना ब्रह्मदेशला कोणत्या पद्धतीने स्वातंत्र्य द्यावें हें ठरविण्यासाठी जपान्यांनी नेमलेल्या समितीचें अध्यक्षपद देण्यांत आलें. त्यासाठी नेमलेल्या समितींत यु ऑंग सॉन यांचाहि समावेश होता. २८ जानेवारी १९४८ रोजी टोजो या जपानच्या पंतप्रधानांनी असें जाहीर केलें की, ब्रह्मदेशांत शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यांत आली आहे व तेथे डॉ. बा मॉ यांचें सरकार स्थापन करण्यांत आलें आहे.

ऑंग सॉन यांना जपानच्या बादशहाने मेजर जनरलचा हुद्दा दिला. पण तेव्हापासूनच यु ऑंग सॉन यांना ब्रह्मदेशाला जपानकडून कोणत्या प्रकारचें स्वातंत्र्य मिळणार होतें याची कल्पना आली व त्यांनी ताबडतोब त्यांच्याविरुद्ध लढण्यासाठी तयारी करावयास सुरवात केली. डॉ. बा मॉ व यु ऑंग सॉन यांनी ब्रह्मदेशांतील सर्व पक्षांचें दोभामा असी-अयोन या पक्षांत विलीनीकरण करण्याचे प्रयत्न सुरू केले. तसेच ब्रह्मदेशांतील वर्गभेद व वर्गकलह नष्ट करण्यासाठी कंबर कसली. संपूर्ण ब्रह्मदेशांत एक नेतृत्व निर्माण झाल्याशिवाय आपल्याला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळणार नाही हें यु ऑंग सॉन यांना स्पष्ट दिसत होतें. संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय अन्य कोणत्याहि गोष्टीने त्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें.

डॉ. बा मॉ यांच्या सरकारांत ऑंग सॉनला फार महत्त्वाचें स्थान होतें. त्या स्थानाचा उपयोग करून त्यांनी जपान्यांविरुद्ध लोकमत तयार केलें. त्यांना ताबडतोब उठाव करतां आला असता परंतु योग्य वेळ येईपर्यंत ते थांबले. थोड्याच कालांत सर्वसामान्य ब्रह्मी नागरिकांना निपोनी राजवटीच्या

वरचस्त्याचा जाच जाणवूं लागला व "ब्रिटिश परत आले तर बरें" असें त्यांना वाटूं लागलें. लोकमताची नाडी ओळखण्यांत आँग सॉन फारच तरबेज होते. त्यांनी या लोकमताचा नेमका उपयोग करून घेतला व ए. एफ्. ओ. ( Anti Faseist-Organisation ) या नांवाची स्वतंत्र संघटना उभारली व या संघटनेच्या मार्फत ब्रिटिश व अमेरिकन सेनाधिकाऱ्यांशी संधान बांधिलें व त्यांना असें कळविलें की, ऑग सॉनच्या नेतृत्वाखाली ब्रह्मदेश संरक्षकसेना जपान्यांविरुद्ध उठाव करणार आहे.

ही बातमी दोस्त राष्ट्रांना लागतांच त्यांनी यु ऑग सॉन यांना संपूर्ण मदत करावयाचें ठरविलें. त्याप्रमाणे २० मार्च १९४५ रोजीं दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी मंडालें घेतांच जपान्यांविरुद्ध सर्वत्र उठाव झाला व मे १९४५ मध्ये रंगून ब्रिटिशांच्या ताब्यांत आलें.

यु ऑग सॉनच्या नेतृत्वाखाली ब्रम्ही लोकांचा जय होतो असें दिसून येतांच ऑग सॉनची ए. एफ्. ओ. चें ए. एफ्. पी. एफ्. एल् ( Ahti–Fascist Peoples Freedom League ) असें नवें नामकरण केलें. ब्रिटिशांनी जपान्यांचा पूर्ण पाडाव करतांच यु ऑग सॉन यांना ब्रह्मी सेनेचे प्रमुख पद व ब्रिग्रेडिअरचा हुद्दा देऊं केला होता. परंतु तो त्यांनी नाकारला व पुनः राजकीय पक्षाचा नेता म्हणून काम करावयाचें ठरविलें.

१९३८ सालीं थु ऑग सॉनची दोभामा-असी-अयोन पक्षाचें सदस्यत्व स्वीकारलें. त्यानंतर १९४५ अखेरपर्यंतचा त्यांचा जीवनपट पाहिला म्हणजे त्यांच्या असामान्य धाडसाची व परिस्थितीचा नेमका वेध घेण्याच्या पात्रतेची कल्पना येते.

हें सर्व करीत असतांना आपल्याला कुठें जायचें आहे याची निश्चित कल्पना त्यांना होती. ब्रह्मदेशाला पूर्ण स्वराज्य मिळविणें हें त्यांचे ध्येय होतें. त्या ध्येयापासून ते कधींहि विचलित झाले नाहीत किंवा त्यासाठी त्यांना करतां येणें शक्य आहे अशी कोणतीहि गोष्ट करावयास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. मग त्यांमध्ये कितीहि धोका असो, त्यांनी त्याची कदर केली नाही. किंबहुना त्यांची दृष्टि ध्येयावर पूर्णपणें केंद्रित झालेली असल्या-मुळे त्यांना त्यांतील धोके दिसतच नसत की, काय कुणास ठाऊक !

या त्यांच्या तुफानी व साहसी वृत्तीला त्यांच्या पत्नीने साथच दिली असे म्हणावयास हरकत नाही. १९३८ सालापासून ऑग सॉनचे आयुष्य कमालीचें

धावपळीचें व धांदलीचें गेलें. त्यामुळे त्यांना फुरसद अशी मिळतच नसे. आजारी पडून अगदी नाइलाज झाला तरच ते विश्रांती घेत. ब्रह्मी मुक्ति फौजेचें नेतृत्व पत्करून १९४२ सालीं यु ऑंग सॉन यांनी तात्पुरतें का होईना पण ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळविलें होतें.

युद्धविराम होऊन थोडीशी स्थिरस्थावर होतांच या ब्रह्मी मुक्ति फौजेंतील अधिकारी व इतर लोक यांनी आपापले विवाह उरकून घ्यावयास सुरवात केली. कारण एक तर युद्धाचें दडपण राहिलें नव्हतें व दुसरें म्हणजे मुक्ति-फौजेंतील शूरवीर म्हणून पुष्कळ ब्रह्मी तरुणी त्यांच्याशीं विवाह करावयास तयार होत्या. याच सुमारास यु ऑंग सॉन हे मलेरियाने आजारी पडले. त्यामुळे त्यांना रंगून येथील रुग्णालयांत ठेवण्यांत आलें. तेथेच त्यांची व त्यांच्या भावी पत्नी माकिन् की यांची गाठ पडली.

त्या तेथे परिचारिकेचें काम करीत होत्या. यु ऑंग सॉनचें मन त्यांच्यावर जडलें. निसर्गतः सर्व प्रकारच्या शिष्टाचारांची नावड असल्यामुळे ऑंग सॉनशीं इतर कोणत्याहि परिचारिकेकडून अन्न-पाणी-औषध किंवा कांहीहि घेणार नाही असा हट्ट सुरू केला. एवढेंच काय पण मा किन् की शिवाय अन्य कोणाकडूनहि ते जेवणसुद्धा घेईनात. कांही दिवस हें प्रेमप्रकरण चालू होतें व शेवटीं सहा सप्टेंबर १९४२ रोजी त्यांचा विवाह झाला.

डा किन की यांची आई बौद्धधर्मानुयायी होती तर तिचे वडील ख्रिश्चन धर्माचे होते. त्यांचें कुटुंबहि फार मोठें व सधन होतें. यु ऑंग सॉनशीं विवाह झाल्यामुळे खऱ्या अर्थाने दोन्हीकडील लोक त्या वेळीं समाधानांत होते. यु ऑंग सॉनच्या पत्नी त्यांच्या हयातींत नेहमीं गृहिणी म्हणूनच वावरल्या. त्यांचें वैवाहिक जीवन फक्त पांच वर्षांचें झालें. या पांच वर्षांत त्यांना चार मुलें झालीं. त्यांची सर्वांत शेवटीं झालेली मुलगी वारली तेव्हा यु ऑंग सॉनना फार दुःख झालें. त्यांच्या प्रांजळ स्वभावाला अनुसरून ते म्हणाले की, " पांच वर्षांच्या वैवाहिक जीवनांत चार मुलें होणें हें कांही फारसें चांगलें नाही. "

यु ऑंग सॉन यांना आपल्या कुटुंबांत राहणे फार आवडत असे. विशेषतः जेव्हा जेव्हा शक्य असेल, तेव्हा प्रवासांत असतांनासुद्धा ते डा किन् की यांना आपल्याबरोबर घेऊन जात. कित्येकदा त्यांचें भाषण असेल तर ते

आपल्या शेजारच्या खुर्चीवर डा किन् की यांना बसवून घेत व बोलायला उभे राहिले म्हणजे त्यांच्याकडे बोट दाखवून ते म्हणत, "ह्या सौ. ऑंग सॉन. या व्यवसायाने परिचारिका आहेत. मी आपल्याला सांगतों, या परिचारिका मोठ्या शिष्ट असतात. अहो, माझा तसा अनुभव आहे ! मी मेजर जनरल ऑंग सॉन आहे हें समजेपर्यंत या बाई माझ्याकडे पहायला सुद्धा तयार नसत ! मग बोलायचे तर दूरच राहो. अजून तो त्यांचा स्वभाव..." असें म्हणून ते आपणच मोठ्याने हसूं लागत व मग जमलेले लोक हसत सुटत.

डा किन् की हें चालवून घेत ! इतकेंच काय पण तें त्यांना आवडेहि. त्या दृष्टीने त्यांचें वैवाहिक जीवन अतिशय सुखी होतें. त्यांच्या घरीं केव्हाहि गेलें तरी सर्वांचें आतिथ्य डा किन् की स्वतः अगत्याने करीत. यु ऑंग सॉनचे सैनिक तर त्यांना आईच म्हणत व मानीत.

डा किन् की या स्वभावाने अतिशय चांगल्या होत्या. तशाच त्या समाजाभिमुख होत्या. यु ऑंग सॉनच्या मृत्यूनंतर त्यांनी विविध क्षेत्रांत काम केलें आहे. एवढेंच काय पण तूर्त त्या ब्रह्मदेशाच्या वकील म्हणून भारतांत काम करीत आहेत. यावरून त्यांच्या पात्रतेची कल्पना येईल.

पण त्यांच्या अतुलनीय धैर्याची कल्पना यु ऑंग सॉनच्या मृत्युसमयींच्या त्यांच्या वागणुकीवरून येते. गोळीबार करून खुनी लोक पळून गेले. त्यानंतर सर्वत्र एकच धांदल उडून गेली. पंधरा वीस मिनिटांत गोळ्या लागलेल्या सर्वजणांना रुग्णालयांत दाखल करण्यांत आलें. आणि त्यानंतर पंधरा-वीस मिनिटांत डा किन की तेथे येऊन दाखल झाल्या. यु ऑंग सॉनच्या जखमांतून अजून उष्ण रक्त ठिबकत होतें. डा किन् की धीराने खाली वाकल्या. त्यांच्यातील परिचारिका जागी झाली. त्यांनी यु ऑंग सॉनच्या जखमा आपल्या हातांनी पुसल्या. तें करतांनाच त्यांना समजले की सारें संपलें आहे. त्या तेथेच बसल्या. आपल्या मृतपतीचे मस्तक त्यांनी आपल्या मांडीवर घेतलें.

त्यांच्या डोळयांतून अश्रु येत नव्हते. जणू अश्रूंना सुद्धा तें दृश्य पाहावलें नसतें. समोवती सहा मृत देह पडलेले आणि आपल्या मांडीवर आपल्या मृत पतीचे मस्तक ! त्यांचे अश्रूच आटले. कदाचित् त्यांनी या प्रसंगाची मनोमन तयारीच केली असेल ! कारण त्यांनी एका सैनिकाशीच विवाह केला होता ! म्हणजे अशा प्रकारचा मृत्यु गृहीत धरलेलाच होता. किंवा त्यांना यु ऑंग

सॉनच्या शत्रूंना तेवढासुद्धा आनंद उपभोगूं द्यायचा नव्हता ! काय असेल तें असो ! पण त्या प्रसंगीं वीरपत्नीला उचित असेंच त्या वागल्या यांत संशय नाही.

दुसऱ्या दिवशी म्हणजे वीस जुलैला ऑंग सॉनची अंत्ययात्रा काढण्यांत आली. हजारो ब्रह्मी नागरिकांनीं त्यांचें अंत्यदर्शन घेतले. सारा ब्रह्मदेश शोक-सागरांत बुडून गेला.

यु ऑंग सॉनचा खून होतांच रंगूनमध्ये 'कर्फ्यू' जारी करण्यांत आला. मागोमाग लष्करी अंमल जाहीर करण्यांत आला. खून झाल्यापासून ३६ तासांत संशयाने १७८ लोकांना पकडण्यांत आलें. त्यांत मुख्य आरोपी यु सॉ हे होते. मायो चिन या पक्षाचे ते नेते व ब्रह्मदेशचे भूतपूर्व पंतप्रधान होते. त्यांच्याच हस्तकांनी ऑंग सॉनचा खून केला होता. यु सॉ यांच्या रहात्या घरींच त्यांना अटक करण्यांत आली. त्यावेळीं त्यांचे हस्तक व सरकारी अधिकारी यांच्यामध्ये पंधरा वीस मिनिटेंपर्यंत चांगलीच चकमक झाली. शेवटीं त्यांना पकडलें. ज्या हिरव्या जीपमधून मारेकरी आले होते ती जीपहि त्यांच्याकडेच सापडली. त्यांत दोन बंदुकाहि सापडल्या. प्रत्यक्ष खून करण्यासाठी वापरण्यांत आलेल्या बंदुका यु सॉच्या घरामागील तळ्यांतून हुडकून काढण्यांत आल्या.

ज्या व्यक्तीने प्रत्यक्ष यु ऑंग सॉन यांच्यावर गोळ्या झाडल्या ती व्यक्ति पेगु येथे पळून गेली होती. पकडण्याचा प्रयत्न करीत असतांना झालेल्या चकमकींत ती ठार झाली. दि. २३ जुलैपर्यंत सुमारे ३०० जणांना प्राथमिक स्वरूपाचे आरोप ठेवून पकडण्यांत आले. याव्यतिरिक्त सुमारे १२० पोलीस व पोलीस अधिकारी या कटांत सामिल असल्याच्या संशयावरून पकडण्यांत आले. या व्यतिरिक्त या सर्व प्रकरणांत निरनिराळ्या प्रकारचीं १८८ हत्यारें व सुमारे पंचावन्न हजार जिवंत काडतुसें जप्त करण्यांत आली.

यु ऑंग सॉनच्या खुनाचा खटला चालविण्यासाठी कॉमिंट यांच्या अध्यक्षते-खाली एक खास न्यायालय स्थापन करण्यांत आलें. २४ सप्टेंबर १९४७ या दिवशी खटला उभा राहिला. त्यांतील प्रमुख आरोपी यु सॉ हे होते. या सर्व कटाचे ते सूत्रधार होते. या व्यतिरिक्त इतर आठ जण या कटांत सामील झाले होते. त्यांचेपैकी बा नायम याला माफीचा साक्षीदार बनविण्यांत आले. ३० डिसेंबर १९४७ या दिवशी या सर्व आरोपींना शिक्षा ठोठावण्यांत आल्या.

या आरोपींच्या वतीने अपील करण्यांत आलें व त्या अपिलाच्या निकालानुसार दि. ८ मे १९४८ या दिवशीं इन्सेन या रंगूनच्या तुरुंगांत यु सॉसह इतर सहा जणांना फांशीं देण्यांत आलें व इतर दोघांना ब्रह्मी राष्ट्राध्यक्षांनी दया करून फांशीच्या ऐवजी जन्मठेपेची शिक्षा दिली.

या खटल्यांतील प्रमुख आरोपी यु सॉ हे होते. ब्रह्मदेशाचे एकेकाळचे ते पंतप्रधान होते या एकाच गोष्टीवरून या खटल्याचें महत्त्व लक्षांत येते—त्यांचा दयेचा अर्ज स्वीकारावा व त्यांना जीवदान द्यावें अशी विनंती श्री. रेजिनाल्ड डॉर्मन स्मिथ या ब्रह्मदेशाच्या भूतपूर्व गव्हर्नरांनी केली होती, पण ती धुडकावून लावण्यांत आली.

अवघ्या तेहतीस वर्षांच्या आयुष्यांत ऑंग सॉ यांनी पार पाडलेली कामगिरी पाहिली म्हणजे मन थक्क होऊन जातें. प्रत्येक वेळीं त्यांनी घेतलेले निर्णय अतिशय दूरदर्शीपणाचे होते असेच इतिहासाने ठरविले आहे. ब्रह्मदेशांत पूर्ण शांतता स्थापन झाल्यानंतर लॉर्ड मौंटबॅटन यांनी, यु ऑंग सॉन यांना ब्रह्मी लष्करांत कायम स्वरूपाचें कमिशन देऊं केलें होतें. परंतु ऑंग सॉननें तें नाकारलें. त्यांनी नम्रपणे पण स्पष्टपणे असे सांगितलें की हा माझा मार्ग नव्हे.

यु ऑंग सॉनचा खून झाला नसता तर ब्रह्मदेशाचा इतिहास अगदी निराळा व अधिक चांगला घडला असता असे मानावयास जागा आहे. असे महापुरुष यदृच्छेने जन्माला येतात पण तें क्वचित्‌च घडत असतें.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों. दि. ........................

# सॉलोमन बंदरनायके

नेहमीप्रमाणे सकाळीं सर्व नित्यकर्मं आटोपून बंदरनायके त्यांना भेटायला आलेल्यांच्या गाठी भेटी घेण्यासाठी बंगल्याच्या व्हरांड्यांत आले. व्हरांड्यांत पाऊल ठेवतांच दोन बुद्ध भिक्षु उठून उभे राहिले. त्यांना त्यांनी अभिवादन केलें. अभिवादन करण्यासाठी बंदरनायके वाकतात न वाकतात तोंच त्या भिक्षूंपैकी एकाने पिस्तुलातून गोळ्या झाडायला सुरुवात केली.

श्री. बंदरनायके हे १९५६ ते १९५९ या कालांत सिलोनचे पंतप्रधान होते. सर्व सिंहली जनता त्यांचा “ जनतेचे पंतप्रधान ” ( People's Premiar ) असा उल्लेख करी. आपण जनतेचे खरेखुरे प्रतिनिधि आहोंत, असा रास्त अभिमान श्री बंदरनायके यांना होता. १९५९ सालीं २५ सप्टेंबरला त्यांच्यावर एका बौद्ध भिक्षूने पिस्तुलाने गोळ्या झाडल्या व त्यामुळे दुसऱ्या दिवशीं त्याचें प्राणोत्क्रम झालें; तोपर्यंत ते अगदी निर्भयतेने सर्वत्र वावरत. जनतेचें नेतृत्व करीत. त्यांचा आपल्या लोकप्रियतेवर इतका भरवसा होता की, ते शरीररक्षक घेण्याचें नाकारीत.

श्री. बंदरनायके यांचें संपूर्ण नांव सॉलोमन वेस्ट रिज्वे बंदरनायके (Solomen west Ridgeway Bandarnaike) असें होते. आठ जानेवारी १८९९ हा त्यांचा जन्मदिन होय. त्यांचा जन्म एका श्रीमंत कुटुंबांत झाला. त्यांचे वडील सिलोनच्या गव्हर्नरांचे आर्थिक सल्लागार होते. त्यांचे लहानपणीच ख्रिस्तीकरण झालें होतें ख्रिस्तीकरण करावयाचे वेळी पत्करावें लागणारें पितृत्व त्यांच्या बाबतीत त्या वेळच्या गव्हर्नरांनी पत्करले होतें. त्या अर्थाने ते सिलोनच्या गव्हर्नर जनरलचे मानलेले पुत्र ( Godson ) होते.

श्रीमंत कुटुंबांतील मुलांना, शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्याची त्या वेळीं पद्धति होती; किंबहुना श्रीमंतीचें व सामाजिक प्रतिष्ठेचें तें एक लक्षणच मानलें जाई. त्या पद्धतीनुसार त्यांना इंग्लंडला पाठविण्यांत आले. ऑक्सफर्ड विद्यापीठांतून त्यांनी पदवी घेतली. ऑक्सफर्ड विद्यापीठांत असतांना अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक होता. नंतर प्रसिद्धि पावलेले श्री. अँथनी ईडन हे त्यांचे सहाध्यायी होते. वादविवाद सभेच्या कार्यक्रमांत श्री. बंदरनायके

अतिशय हिरीरीने भाग घेत. वादविवादांत प्रतिपक्षाला नामोहरम करण्याचें त्यांचें कौशल्य पाहून एकदा श्री. अँथनी ईडन त्यांना म्हणाले होते की, "तुम्ही सिलोनचे पंतप्रधान व्हाल." हें त्यांनी गमतीने वर्तविलेलें भविष्य तंतोतंत खरे ठरलें. १९२५ साली त्यांनी बॅरिस्टरीची परीक्षा दिली व ते सिलोनला परत आले.

सिलोनला आल्यानंतर त्या वेळच्या प्रथेनुसार श्री. बंदरनायके यांनी वकिली करावयास प्रारंभ केला. त्यांच्या घराण्याला सामाजिक प्रतिष्ठा होतीच. कारण त्यांचे वडील "महामुदलीयार" म्हणूनच ओळखले जात. शिवाय त्यांना राजमान्यताहि होती. या कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे त्यांना वकिलीच्या धंद्यांत जम बसविणे अगदी सोपे गेले. आपल्या अंगच्या अक्कलहुशारीने चार-पांच वर्षांतच ते एक नाणावलेले वकील म्हणून सिलोनमध्ये प्रसिद्धि पावले.

परंतु केवळ व्यावसायिक यशाने त्यांचें समाधान झालें नाहीं. निसर्गतः त्यांची वृत्ति समाजाभिमुख होती. त्यांनी सार्वजनिक जीवनालाहि सुरुवात केलीच होती, परंतु १९३१ सालीं ते त्या वेळच्या सिलोनी पार्लमेंटचे सभासद म्हणून निवडून आले. तेव्हापासून त्यांचा खून होईपर्यंत ते या ना त्या नात्याने पार्लमेंटशीं संबद्ध होतें.

सार्वजनिक जीवनांत पडतांच त्यांनी असें जाहीर करून टाकलें, मी जरी इंग्रजी शिक्षण घेतले असलें तरी माझें आंग्लीकरण झालेलें नाही. मी मूलतः सिंहलीच आहे. सिंहली लोकांशीं अधिक एकरूप होता यावें म्हणून त्यांनी पाश्चात्त्य पोशाखाचा त्याग केला. एवढेच नव्हे तर त्यांनी बौद्ध धर्महि स्वीकारला. या त्यांच्या वागणुकीमुळे सिलोनी जनतेला त्यांच्याबद्दल फार आत्मीयता वाटूं लागली.

श्री. बंदरनायके ज्या वेळीं सार्वजनिक जीवनांत उतरले, त्या वेळची सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिति फार जागृत होती असे म्हणावयास हरकत नाही. रबर व चहा यांच्या मळ्यांनी सिलोनच्या परिस्थितींत फार बदल घडवून आणला होता. १८८० पूर्वी सिलोनमध्ये नारळ आणि कॉफी यांची लागवड फार मोठ्या प्रमाणावर होत असे. परंतु त्यानंतर मात्र कॉफीची जागा रबर व चहा या दोन पिकांनी घेतली. कॉफीचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर व्हायला लागल्यापासून आणि विशेषतः चहा व रबराची लागवड व्हायला लागल्यापासून सिलोनच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडून आली. मळेवाले,

मजूर, छोटेमोठे व्यापारी, सर्व प्रकारचे ठेकेदार या सर्वांची मिळकत वाढली. भारतांतून मोठ्या प्रमाणावर मजुरांची आयात केली जाऊं लागली. नवीन समस्या निर्माण होऊं लागल्या. सरकार भांडवलदार व मळेवाले यांची पाठराखण करीत असल्यामुळे सरकार व सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये संघर्ष होऊं लागले होते.

१९२३ व १९२५ साली सिलोनमध्ये फार मोठे संप घडून आले. सुसंघटित मजुरांची शक्ति फार मोठी असते, याची जाणीव लोकांना व सरकारला होऊं लागली होती. त्यापूर्वीच सिलोन नॅशनल काँग्रेस, तामिल महाजन सभा, सिलोन सोशल सर्व्हिस लीग, सिलोन वर्कर्स वेल्फेअर लीग इत्यादि राजकीय व सामाजिक संघटना काम करूं लागल्या होत्या. सिलोनच्या शासनाचें सिलोनीकरण झालें पाहिजे अशी मागणी केली जाऊं लागली होती. सारांश, सर्व दृष्टीने सीलोन जागृत होऊं लागला होता. आणि अशावेळी श्री. बंदरनायके यांचें सामाजिक व राजकीय क्षेत्रांत पदार्पण झालें.

सिलोन नॅशनल काँग्रेसचे ते पूर्वीपासून सभासद होते, तेथे त्यांनी " पुरोगामी विचारांचा तरुण " म्हणून नांव कमाविलेंच होतें. १९३३-३४ च्या सुमारास सिलोनमध्ये मार्क्सच्या विचारांचा प्रभाव पडावयास सुरवात झाली. इंग्लंडमधून कायदा, अर्थशास्त्र व इतर समाजविषयक शास्त्रांचा अभ्यास करून परत आलेल्या तिशीच्या आंतील तरुण लोकांना या कम्युनिस्ट विचारांनी भारावून टाकलें होतें. लेनिन व ट्रॉट्स्की यांनी प्रतिपादन केलेल्या विचारांचा या तरुणांवर पगडा होता. या तरुणांनी १९३५ मध्ये " लंका सम समाज पार्टी " (LSSP) या नांवाचा स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापिला.

फिलिप गुणवर्धन, एन्. एम्. पेरेरा वगैरे नेत्यांमुळे या पक्षाचें वजन बरेंच वाढलें. त्या वेळच्या मंत्रिमंडळावरहि या लंका सम समाज पक्षाच्या नेत्यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

श्री. बंदरनायके यांना या कालांत हळूहळू पण निश्चितपणे महत्त्व प्राप्त होऊं लागलें होतें. स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक आरोग्य या खात्यांचे मंत्री म्हणून काम करीत असल्यामुळे त्यांना लोकमताची नाडी बरोबर ओळखतां आली. १९३७ साली त्यांनी सिंहल महासभा या संस्थेची स्थापना केली. ही सभा स्थापण्याचें मुख्य कारण म्हणजे तोपर्यंत मध्यमवर्ग व सिंहली शिक्षण घेतलेला वर्ग यांना समाजकारण व राजकारण यांमध्ये स्थान नव्हतें. सिलोन

नॅशनल काँग्रेस व लंका सम समाज पार्टी या दोन्ही संघटनांमधून सिंहली भाषेचेंच ज्ञान असणाऱ्या बहुजन समाजाला स्थान नव्हतें. त्यामुळे श्री. बंदरनायके यांनी सिंहल महासभा ही नवी सभा स्थापन केली.

श्री. बंदरनायके हे उच्च शिक्षित असल्यामुळे व त्यांच्या घराण्याला सिलोनमध्ये सामाजिक प्रतिष्ठा असल्यामुळे सिंहल सभेला प्रतिष्ठित समाजांत मानमान्यता मिळाली. तसेच श्री. बंदरनायके यांनी सिंहली भाषेचा व बौद्धधर्माचा अभिमान दाखविल्यामुळे त्यांना या दोन्ही गटांचा पाठिंबा मिळाला. सिंहली मध्यवर्गाचाहि या पक्षाला पाठिंबा मिळाला.

१९३९ सालीं दुसरे महायुद्ध सुरू झालें. सिलोन ही ब्रिटिशांची वसाहत असल्यामुळे सिलोनने सुद्धा जर्मनीबरोबर युद्ध पुकारलें आहे, असें गृहीत धरण्यांत आलें. युद्धकालांत सिलोनचा प्रत्यक्ष फायदा झाला की नाही हें सांगणे कठीण आहे, परंतु गोऱ्या लोकांशीं अगदी जवळून संबंध आल्यामुळे सिंहली लोक व गोरे यांच्यांत कांहीहि फरक नाही, अशी आत्मविश्वासाची भावना सिंहली लोकांत निर्माण झाली. भाववाढ, वस्तूंची टंचाई, काळाबाजार इत्यादि युद्धाचे परिणाम सिलोनला भोगावे लागले.

भाववाढीमुळे कारकुनी करणारा व पांढरपेशीने जगणारा मध्यम वर्ग पार बुडाला. या वर्गाचें उत्पन्न ठरलेलें व महागाई मात्र सतत वाढती, या परिस्थितीमुळे फार नुकसान झालें. त्यामुळे १९४७ साली सिलोनला स्वराज्य द्यावयाचें ठरतांच या सर्व पांढरपेशा कारकुनांनी एक मोठा संप घडवून आणला. हा संप कांही दिवसांनी मोडून काढण्यांत आला. पण त्यामुळे एक नवी राजकीय पार्श्वभूमि तयार व्हावयास मदत झाली. पांढरपेशांनी सर्वसामान्य मजुरांशीं हात मिळवणी केली. त्यांच्यांतील अंतर नाहीसे झालें.

हें सर्व परिवर्तन घडून येत असतांना श्री. बंदरनायके या ना त्या स्वरूपांत राजकारणांत भाग घेत होते. श्री. डी. आर सेनानायके सिलोनी मंत्रिमंडळाचे प्रतिनिधि म्हणून ब्रिटिश सरकारशीं बातचीत करीत होते. स्वराज्य मिळेल असें निश्चित होतांच सत्ताग्रहण करण्यासाठी एका राजकीय पक्षाची आवश्यकता निर्माण झाली. त्यासाठी श्री. डी. आर सेनानायके यांनी युनायटेड नॅशनल पार्टी (UNP) नांवाचा नवीन राजकीय पक्ष स्थापन केला. या पक्षाला सिंहल महासभा व मुस्लिम लीग या दोन्ही पक्षांचा पाठिंबा मिळाला. सिंहल महासभा

या पक्षाचें नेतृत्व श्री. सॉलोमन बंदरनायके यांच्याकडे असल्यामुळे हें कार्य सहज पार पडलें. कारण श्री. डी. आर-सेनानायके व श्री. बंदरनायके यांचे संबंध मैत्रीचे होते.

—१९४७ सालीं झालेल्या निवडणुकांत युनायटेड नॅशनल पार्टी या पक्षाला बहुमत मिळालें व सॉलोमन बंदरनायके यांचा मंत्रिमंडळांत समावेश झाला, परंतु १९५१ साली त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कारण त्यांना लोकांचें मत सरकारच्या पाठीशीं नाहीं हें स्पष्ट दिसत होतें.

श्री. बंदरनायके यांनी मंत्रिमंडळांतून बाहेर पडतांच श्रीलंका फ्रीडम पार्टी या नांवाचा नवीन राजकीय पक्ष स्थापन केला. त्यांची अशी अपेक्षा होती, की त्यांनी राजीनामा देतांच इतर मंत्रीहि राजीनामा देतील व मंत्रिमंडळ गड-गडेल. परंतु पूर्वी कबूल केल्याप्रमाणे इतर मंत्र्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले नाहीत. परंतु पुढे १९५२ साली श्री. सेनानायके घोड्यावरून पडून वारले. त्यांच्यामागून श्री. डडले सेनानायके यांनी पंतप्रधानपद स्वीकारलें.

१९५३ साली डाव्या गटांच्या प्रेरणेमुळे सीलोनमध्ये एक मोठा हरताळ पाडण्यांत आला. आयात केलेल्या तांदळाच्या किंमती लोकांना परवडण्याजोग्या असाव्यात यासाठी सरकारतर्फे दण्यांत येणारी मदत श्री. डडले सेनानायके यांनी बंद केली होती. त्यामुळे हा हरताळ पाडण्यांत आला होता. हा हरताळ यशस्वी झाला. पोलिसांच्या दडपशाहीमुळे दहा लोक मारलें गेलें. त्यामुळे पंतप्रधानांनी राजीनामा दिला व त्यांच्या जागी श्री. जॉन कोटेलावाला हे सिलोनचे पंतप्रधान झाले.

हें सर्व घडत असतांना श्री. बंदरनायके आपल्या पक्षाची संघटना मजबूत करीत होते. पार्लमेंटमध्ये विरोधी पक्षाचें नेतृत्व त्यांच्याकडे होतें. आणि अशा परिस्थितींत सिलोनची राज्यकारभाराची भाषा कोणती असावी, हा प्रश्न पुढे आला. श्री. सेनानायके यांनी या प्रश्नाचें गांभीर्य राज्यकर्त्यांच्या लक्षांत आणून देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा कांही फारसा उपयोग झाला नाही. सिंहली व तामिळ या दोन भाषिकांत, आपली भाषा हीच राज्यकारभाराची भाषा ठरावी अशी ईर्षा होती. त्यामुळे प्रकरण हमरीतुमरीवर आलें. तशांत श्री. कोटेला-वाला यांनी १९५६ साली 'जाफना' या प्रांताला भेट देऊन सिंहली बरोबरच तामिळ भाषेलाहि समान दर्जा देऊं असें आश्वासन दिलें. त्याचा भलताच परिणाम झाला. पार्लमेंटमध्ये त्याबद्दल प्रश्न विचारतांच आपण सिंहली भाषेलाच

प्राधान्य देऊं असें त्यांनी सांगितलें. याचा परिणाम फारच वाईट झाला व त्यांनी मंत्रिमंडळ बरखास्त करून १९५६ साली पुनः निवडणुका घ्यावयाचें ठरविलें.

निवडणुकांच्या आखाड्यांत उतरतांच श्री. कोटेलावालांच्या पक्षाला म्हणजे युनायटेड नॅशनल पार्टीला विरोध करण्यासाठी इतर सर्व पक्ष एकत्र झाले. श्री. बंदरनायके यांचा श्री लंका फ्रीडम पार्टी, एकस्थ भिक्कु पेरामुना व श्री. फिलिप गुणवर्धनांचा पक्ष, हे सर्व पक्ष एका झेंड्याखाली गोळा झाले. याशिवाय महाजन एकस्थ पेरामुना या पक्षाने व इतर डाव्या गटांनी निवडणुकीपुरता श्री लंका फ्रीडम पार्टी व इतर पक्ष यांच्याशीं समझोता केला. विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणण्याची ही किमया श्री. बंदरनायके यांचीच होती. त्यांनी नंतर एकस्थ भिक्कु पेरासुना हा पक्ष श्री लंका फ्रीडम पार्टी या पक्षांत विलीन करून टाकला.

श्री. बंदरनायके यांच्या नेतृत्वाखाली या सर्व पक्षांना निर्णायक बहुमत मिळाल्यामुळे पंतप्रधानपद त्यांनाच स्वीकारावें लागलें. त्यांची लोकप्रियता या वेळीं अगदी शिगेला पोचली होती. ह्यांनी अधिकारग्रहण केलें, त्या दिवशी तर सिंहली लोकांच्या उत्साहाला उधाण आलें होतें. नवनवीन पोषाख करून सर्व सिंहली जनता रस्त्यांतून गर्दी करून हिंडत होती. हें सरकार आपलें आहे, बंदरनायकेंचा विजय हा आपलाच विजय आहे, असें प्रत्येक सिलोनी माणसाला वाटत होतें.

श्री. बंदरनायके यांच्या मंत्रिमंडळांतील सर्व लोक सिलोनीपद्धतीचा पोषाख करीत व बौद्ध भिक्षूंचा आदर करीत. लोकांशीं नम्रतेने वागत. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढतच होती. विशेषतः भिक्षूंना मान देण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांची लोकप्रियता टिकून राहण्यास मदत झाली. कारण निवडणूक प्रचाराच्या मोहिमेंत सर्व तरुण भिक्षूंनी मोठ्या हिरीरीने भाग घेतला होता. या भिक्षूंना सिलोन-मध्ये सामाजिक व धार्मिक प्रतिष्ठा आहे. कारण ख्रिस्ती धर्मप्रचारकांशीं त्यांना सतत सामना करावा लागल्यामुळे विद्वत्ता व लोकाभिमुखता या दोन्ही गोष्टी त्यांच्यामध्ये टिकून आहेत. ऐहिक सुख पायांशी लोळत असतांनासुद्धा भिक्षुत्व स्वीकारून राहाणारे कर्मठ बौद्ध अजूनहि सिलोनमध्ये आहेत. त्यामुळे या भिक्षूंना सामाजिक प्रतिष्ठा आहे. त्यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे श्री. बंदरनायके यांना निरपवाद बहुमत मिळविणें सहजी शक्य झालें.

श्री. बंदरनायके यांच्या पक्षाशीं निवडणुकीपुरता तामिळ भाषिक लोकांनी समझोता केला होता. परंतु असें करीत असतांना त्यांची अशी अपेक्षा होती

की, यामुळे तामिळवादी लोकांना इतक्या जागा मिळतील की, त्यांच्या सहकार्याविना श्री. बंदरनायके यांना कारभार हांकता येऊं नये. परंतु प्रत्यक्षांत तसें घडलें नाही. त्यामुळे तामिळ-वादी लोकांना, त्यांचा जय झाला असतांनासुद्धा पराजय झाल्या सारखे वाटलें. श्री. बंदरनायके यांना कदाचित् या तामिळवादी लोकांची समजूत काढतां आली असती. परंतु निवडणूक प्रचाराच्या धामधुमींत सर्व प्रकारच्या जातीयवादी फुटीर प्रवृत्तींना पुरेसे खतपाणी घातलें गेलें होतें. त्यामुळे श्री. बंदरनायके यांचें मंत्रिमंडळ अधिकारावर येतांच जातीय कुरबुरींना प्रारंभ झाला.

श्री. बंदरनायके यांच्या नेतृत्वाखाली कारभाराला सुरवात होऊन उणेपुरे तीन महिने झाले असतील नसतील तोच राज्यकारभाराची भाषा सिंहलीच असावी अशा आशयाचें विधेयक चर्चेला आलें. सिलोनमधील राज्यकारभाराची भाषा सिंहली असावी हें अगदी रास्त होतें पण या विधेयकाच्या निमित्ताने सिलोन-मध्ये जातीय दंगलींना प्रारंभ झाला.

जातीय दंगलींना प्रारंभ होतांच, नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या वेळी जे लहानमोठे सामाजिक गट एकत्र आले होते, त्यांनी आपापसांत लाथाळीला सुरवात केली. आणि थोड्याच कालांत या दंगलीचा सर्व सिलोनभर प्रसार झाला. मुख्यत: सिंहली विरुद्ध तामिळ असें या दंगलींचें स्वरूप होतें. उत्तरे-कडील जाफना हा सिलोनचा भाग सोडला तर इतर भागांत तामिळभाषी लोक अल्पसंख्य होते. गल ओया ( Gal Oya ) या भागांत तर तामिळ लोकांना पिटून काढण्यांत आलें. त्यांची मालमत्ता लुटण्यांत आली. एकंदरीने पाहतां सामाजिक अस्वस्थता निर्माण झाली.

या कालांत निवडणुकींत यशस्वी होण्यासाठी एकत्र आलेले पक्ष व पराभूत झालेले पक्ष या दोन्ही पक्षांनी लोकशाही वागणूक डावलली व फुटीर आणि जातीयवादी प्रवृत्तींचा अनिर्बंध प्रचार करावयास सुरवात केली. या प्रचाराने लोकांचीं माथीं भडकण्यास मदत झाली हें खरें, पण आर्थिक दुरवस्था हें या सामाजिक असंतोषाचें खरें कारण होतें.

या काळांत सिलोनमध्ये पुष्कळ ठिकाणी मजुरांचे संप झाले. वाहतूक व्यवस्थेचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आल्यामुळे, पूर्वी ती व्यवस्था ज्यांच्या हातीं होती तो धनिक वर्ग रुष्ट झाला. तामिळ भाषिकांनी आपल्याला स्वतंत्र सुभा पाहिजे, अशी मागणी सुरू केली. मे १९५८ मध्ये कोलंबोमध्ये मोठा संप

झाला. नंतर कोलंबो बंदराचे राष्ट्रीयीकरण करणें भाग पडलें. सिलोनी पार्लमेंटच्या सभासदांना तर कोलंबो बंदरांतील संपाच्यावेळींसुद्धा एकमताने व धडाडीने वागतां आलें नाही. परस्परविरोधी हुकूम दिले गेल्यामुळे पुष्कळदा पोलिसांची पंचाईत झाली.

याच सुमारास दक्षिण सिलोनमधील बौद्ध भिक्षूंनी तामिळभाषी लोक व व्यवसाय यांच्यावर बहिष्कार पुकारण्याच्या मोहिमेसाठी प्रचार करावयास सुरवात केली होती. या सर्व घटना घडत असतांना सिलोनमध्ये सर्वत्र निर-निराळ्या कामांसाठी पोलिसांची मदत घेणे सरकारला अपरिहार्य झालें. आणि या वेळीं जनतेला असें आढळून आलें की, जनतेच्या मुसंडीपुढे पोलीस हे हतबल ठरतात. पोलीस हतबल ठरण्याचें मुख्य कारण सरकारकडून सुटणाऱ्या हुकूमांतील विसंगति किंवा धरसोड हें होतें. याचा परिणाम असा झाला की, जनतेला पोलीस आपलें कांही करूं शकणार नाहीत, अशी खात्री पटली. आणि याचा परिणाम फार भयंकर झाला.

२२ मे १९५८ रोजी पोलोन्नुरुआ येथे व २६ मे रोजी खुद्द कोलंबो या राजधानीच्या शहरांत अतिशय मोठ्या प्रमाणावर जातीय दंगलींना प्रारंभ झाला. ही दंगलींची लाट अगदी थोड्या काळांत दक्षिण, पश्चिम व मध्य कोलंबोंत पसरली. सर्वत्र लुटालूट, जाळपोळ, मारहाण वगैरे प्रकार सुरू झाले.

दि. २६ मे १९५८ रोजी रात्री श्री लंका सम समाज पक्षाने सरकारला असें कळविलें की जर सरकारला परिस्थिति काबूत आणितां येत नसेल तर नाइलाजाने पक्षाला आपल्या हातात सत्ता द्यावी लागेल. दि. १७ मेच्या वर्तमानपत्रांतून या बातमीला प्रसिद्धि देण्यांत आली. ही बातमी प्रसिद्ध होतांच सिलोनच्या गव्हर्नरांनी २७ मे रोजी दुपारी सव्वाबारा वाजता आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली आणि शांतता व सुव्यस्था राखण्यासाठी लष्कराची मदत घेण्यांत आली. सायंकाळपर्यंत सिलोनमधील परिस्थिति काबूत आली.

जाफना हा भाग वगळल्यास बहुतेक सर्व सिलोनमध्ये तामिळ लोकांची थोड्याअधिक प्रमाणावर हत्या करण्यांत आली होती. त्यांची मालमत्ता लुटण्यांत आली होती व नाइलाज म्हणून सर्व तामिळभाषी लोकांना समुद्रमार्गे लष्करी बंदोबस्तांत जाफना प्रांतांत हलविणे भाग झाले. तसेच उत्तर व पूर्व सिलोनमधील

सिंहली लोकहि कोलंबो व इतर भागात गेले होते. सिंहली व तामिळ लोकसंख्येची अशा तऱ्हेने अदलबदल झाली.

१३ मार्च १९५९ पर्यंत आणीबाणीची परिस्थिति टिकून राहिली. दरम्यानच्या काळांत सिलोनी पार्लमेंटमधील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींमधील मतभेद शिगेला पोचले. बौद्ध भिक्षूंना सर्वांत अधिक नैराश्य आलें. पार्लमेंटमध्ये कोणत्याहि प्रकारचें कामकाज करणें हें अशक्य होऊन बसलें. सर्व सिलोनमध्ये एकप्रकारें असुरक्षिततेचें व असमाधानाचें वातावरण भरून राहिलें होतें.

श्री. बंदरनायके यांना देशांत घडून येणाऱ्या या सामाजिक परिवर्तनाची जाणीव होती. त्याबद्दल त्यांना खंतहि वाटत होती. देशांत असुरक्षितता वाढत आहे हें लक्षांत घेऊन श्री. बंदरनायके यांच्या संरक्षणाची अतिशय कडेकोट व्यवस्था करण्याची सरकारची इच्छा होती. पण श्री. बंदरनायके यांना तें मान्य नव्हतें. त्यांच्या निवासस्थानावर पोलीस पहारा होता. पण त्यांच्या घरीं येऊन त्यांची भेट घेण्याची कुणाहि सिंहली रहिवाशाला मुभा होती.

नेहमीप्रमाणे दिनांक २५ सप्टेंबर १९५९ या दिवशी सकाळी सर्व नित्यकर्मे आटोपून ते त्यांना भेटायला आलेल्या लोकांच्या गाठीभेटी घेण्यासाठी म्हणून त्यांच्या बंगल्याच्या व्हरांड्यात आले. व्हरांड्यांत पाऊल ठेवतांच दोन बौद्ध भिक्षू उठून उभे राहिले. त्यांना त्यांनी अभिवादन केलें, अभिवादन करण्यासाठी ते वांकले असतील नसतील तोच त्या भिक्षूंपैकी एका भिक्षूने. ४६ जातीच्या पिस्तुलांतून श्री. बंदरनायके यांच्यावर गोळ्या झाडायला सुरवात केली.

एक-दोन नव्हे तर चांगल्या चार गोळ्या अगदी जवळून त्यांच्यावर झाडल्या. पहिली गोळीं श्री. बंदरनायके यांच्या हाताला लागली. दुसरी त्यांच्या यकृतांत घुसली. तिसरी पोटाला लागली. तेवढ्यांत ते आंतल्या खोलींत शिरले. तोंडाने ते आपल्या पत्नीला " सिरिमा, सिरिमा, " अशा हाका मारीत होते. त्या आंतून धांवतच बाहेर आल्या. तेवढ्यांत त्या भिक्षूने आंतील खोलींत प्रवेश करून आणखी एक गोळीं झाडली होती. ती गोळीं श्री. बंदरनायकेंच्या मांडीला लागली.

पुनः त्या बौद्ध भिक्षूने श्री. बंदरनायके यांच्या मदतीला आलेल्या त्यांच्या पत्नीवर नेम धरला. तो गोळी झाडणार येवढ्यांत जखमी अवस्थेंतहि श्री. बंदरनायके यांनी त्या भिक्षूवर झडप घालून त्याचें पिस्तूल हिसकावून घेतलें.

एवढें होईतो बाहेर असलेले लोक आंत आले. एकच गोंधळ उडाला. सर्वांनी श्री. बंदरनायके यांना आधार देऊन एका पलंगावर बसविलें. गोळ्या झाडणाऱ्या भिक्षूला पळून जाण्याच्या प्रयत्नांत असतांना पकडलें. त्याच्यावर पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यामुळे तोहि जखमी झाला होता. त्याचें नांव तलडुवा सोमारामा थेरो असें होतें. त्याच्याबरोबर आलेल्या दुसऱ्या भिक्षूचें नांव बुद्धरक्षित थेरो असें होतें.

श्री. बंदरनायके यांना लगेच हॉस्पिटलमध्ये नेण्यांत आले. हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी त्यांना मोटारींत बसविण्यांत आलें, तेव्हा लोकांनी तलडुवा सोमारामा थेरो यांना पकडलें होतें. रागावलेलें लोक त्याला झोडपीत होते व तो गुरासारखा ओरडत होता. तें ऐकून श्री. बंदरनायके यांनी "त्याला मारूं नका" असें सांगितलें. हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी त्यांनी जी जबानी दिली, तेव्हाहि त्यांनी थेरो त्याला कायद्याने जी शिक्षा व्हायची असेल ती होऊं द्या, पण त्याला बदडूं नका असें सांगितलें.

पांच तासपर्यंत शस्त्रक्रिया चालू होती. या कालांत त्यांना वीस पिंट रक्त देण्यांत आलें. पिस्तुलाच्या गोळीमुळें त्यांचें यकृतच निकामी झालें होतें. त्यामुळे ते जगणे शक्यच नव्हते. दि. २६ सप्टेंबरला सायंकाळीं साडेसात वाजता त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. त्यांच्या चेहऱ्यावर दुःख नव्हतें. निराशा नव्हती. दिसत होतें तें फक्त समाधान! कर्तव्य करीत असतांना मृत्यु आल्याचें असाधारण समाधान.

त्यांच्यावर गोळीबार होतांच तासाभराने, सिलोनचे त्या वेळचे गव्हर्नर श्री. ऑलिव्हर गुणतिलके यांनी सिलोनमध्ये आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली. तरीहि भिक्षूंच्या विरुद्ध प्रचंड लोकक्षोभ झाला. भिक्षूंना रस्त्यांतून हिंडणे मुष्किल झालें. शेवटी दि. २७ सप्टेंबरला श्रीमती सिरिमाओ बंदरनायके यांना लोकांना शांत राहण्याची विनंती करणे भाग पडले. "भिक्षूंना अकारण त्रास देऊं नका. त्यांना इतर लोकांप्रमाणे माझ्या पतीच्या व सिलोनी पंतप्रधानांच्या अंत्ययात्रेत भाग घेऊं द्या." अशी विनंती करणे भाग पडले.

श्री. बंदरनायके यांचें शव त्यांच्या राहत्या घरीं "रोजमीड प्लेस" येथे नेण्यांत आलें. या बंगल्यांत प्रवेश करून त्यांचें अंत्यदर्शन घेण्यासाठी सिलोनी

नागरिकांच्या झुंडी उडाल्या. पण आणखी अपप्रकार होऊं नयेत म्हणून आंत कुणालाहि प्रवेश देण्यांत आला नाही. पण लोक हालेनात. शेवटी श्रीमति बंदरनायके यांनी आपणहूनच बंगल्याच्या फाटकाचें प्रवेशद्वार उघडावयास लावलें. डबडबलेल्या डोळयांनी त्या म्हणाल्या, " पंतप्रधान असतांनासुद्धा जिवंतपणी त्यांनी कुणालाहि भेट नाकारली नाही. तर आता काय ? लोकांना त्यांचें दर्शन घेऊं द्या ! "

एका दिवशी सुमारे दहा हजार लोकांनी त्यांच्या शवाचें दर्शन घेतलें. आपल्या पतीची ती अमाप लोकप्रियता पाहून श्रीमति बंदरनायकेंचें अंतःकरण भरून आलें. शेवटी त्यांचें शव लोकसभेच्या सभागृहांत हलवण्यांत आलें. तेथे सर्व सिलोनी जनतेला अंत्यदर्शन घेण्यासाठी ते दोन दिवस ठेवण्यांत आलें. तेथे सिलोनमधील जवळजवळ निम्म्या लोकसंख्येने त्यांचें अंत्यदर्शन घेतलें. सिलोनी जनतेचे अत्यंत लोकप्रिय पंतप्रधान " बंडा " तेथे चिरनिद्रा घेत होते व सिलोनी जनता दुःखसागरांत बुडून गेली होती.

३० सप्टेंबर १९५९ रोजी त्यांचे शव बंदरनायके यांच्या मूळ गांवी म्हणजे ' होरागलू ' या गांवी नेण्यांत आलें. हें ठिकाण कोलंबोहून सुमारे वीस मैल आहे. तेथे त्यांचे अंत्यसंस्कार करण्यांत आले.

श्री. बंदरनायके यांच्या खुनाच्या कटांत खूप मोठ्या लोकांचे हात गुंतलेले होते. त्यांच्या खुनाच्या कटाचे धागेदोरे शोधून काढण्यासाठी स्कॉटलंड यार्ड-मधील दोघा तज्ज्ञांची मदत घेण्यांत आली. सौ. विमला विजय वर्धिने, माजी मंत्रीणबाई, थेरोद्रय, बौद्ध भिक्षू व आयुर्वेद महाविद्यालयांतील व्याख्याते श्री. सी. अमरसिंग, आयुर्विमा डॉक्टर, अनुरा डीसिल्व्हा मोटार मेकॅनिक वगैरे अनेक लोकांवर आरोप ठेवून खटले भरण्यांत आले. अशा प्रकारच्या खून खटल्यांत कित्येक मोठमोठ्या लोकांचे हितसंबंध गुंतलेले असतात. त्यामुळे पूर्ण सत्य उघडकीला येणें शक्यच नसतें, तसेंच या खटल्यानहि झालें. शेवटी श्री. थेरो, बुद्धरक्षित व जयवर्धिने यांना दोषी ठरविण्यांत आलें. पुष्कळ भवति नभवति होऊन श्री. थेरो यांना शेवटी फाशी देण्यांत आलें व इतरांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

सिलोनच्या राजकारणाचा गाडा चालू आहे. बंदरनायके यांच्या नंतर श्री. धननायके यांनी पंतप्रधानपद स्वीकारलें, पण त्यांनासुद्धा सिलोनच्या

राजकारणाचा गाडा सुरळीतपणे चालू ठेवतां आला नाही. शेवटी श्रीमति सिरिमाओ बंदरनायके यांना त्यांच्या पतीनी स्थापन केलेल्या पक्षाचें नेतृत्व स्वीकारावें लागलें. २० जुलै १९६० रोजी झालेल्या निवडणुकांत श्रीमति सिरिमाओ बंदरनायके यांच्या पक्षाचा विजय झाला. एकूण १३१ जागांपैकी ७५ जागा त्यांच्या पक्षाला मिळाल्या व श्रीमति बंदरनायके यांनी मंत्रिमंडळ बनविलें. जगांतील पहिली स्त्री पंतप्रधान म्हणून आज त्यांचे नांव सर्वत्र गाजत आहे.

श्रीमति बंदरनायके स्वतः कर्तृत्ववान आहेत, ही गोष्ट सत्य असलीं तरी त्यांना पंतप्रधान होण्याचा मान मिळण्यास त्यांच्या पतीची अमाप लोकप्रियता कारणीभूत आहे, हें कुणीहि मान्य करील. श्री. बंदरनायके यांचा मृत्यूनंतरचा हा विजय निश्चितच अभूतपूर्व आहे.

● ● ●

# दाग हॅमरशील्ड

हॅमरशील्ड यांचे विमान नोडोलाच्या विमानतळापासून सुमारे सात मैलांवर घनदाट जंगलांत कोसळलें असल्याची दुःखद वार्ता लागली. या विमानांतील सर्व प्रवासी मृत्युमुखी पडले होते. सर्वांचे देह भाजल्यामुळे ओळखूं न येण्याइतके विद्रूप झाले होते. राष्ट्रसंघाच्या आरक्षक दलाचा एक रक्षक त्या अपघातांतून बचावला होता. त्याचें नांव हॅरॉल्ड ज्यूलियन असें होतें. तोहि त्यानंतर पांच दिवसांनी वारला. हा सर्व ताण सहन न होऊन तो जवळजवळ वेडाच झाला होता, पण त्याच्याकडून पोलिसांनी अपघात कसा झाला, याविषयींची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांत एवढेंच निष्पन्न झालें कीं विमान कोसळण्यापूर्वी विमानांत कसलातरी स्फोट झाला होता.

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

राष्ट्रसंघाचे सरचिटणीस म्हणून श्री. दाग हॅमरशील्ड यांचें नांव जगाच्या इतिहासांत अजरामर झालें आहे. १० एप्रिल १९५३ या दिवशी राष्ट्रसंघाचे सरचिटणीस म्हणून त्यांनी अधिकारग्रहण केलें, तेव्हापासून १७ सप्टेंबर १९६१ या दिवशी त्यांचा अपघाती मृत्यु घडून येईपर्यंत त्यांनी राष्ट्रसंघाचें सरचिटणीस-पद भूषविलें. या काळांत जगांत शांतता नांदावी म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केले व शेवटी त्याच प्रयत्नांत त्यांनी आपला जीव गमावला. त्यांच्या विमानाला अपघात झाला आणि त्या अपघातांत त्यांचे सहकारी व ते ठार झाले. हें विमानोड्डाण करीत असतांना "आपण केवढा मोठा धोका पत्करीत आहोत," याची पूर्ण जाणीव त्यांना होती; परंतु आपल्या जीवितशाश्वतीपेक्षा जागतिक शांतता त्यांना अधिक मोलाची वाटत होती. म्हणून त्यांनी हा धोका पत्करला आणि शेवटी त्यांतच त्यांचा अंत झाला. श्री. हॅमरशील्ड यांना शांततेचे निस्सीम भक्त व अग्रदूत म्हणून सारें जग आज गौरवितें, तें याच कारणाने !

श्री. दाग हॅमरशील्ड यांचें संपूर्ण नांव दाग हॅजल्मार अग्ने हॅमरशील्ड (Dag Hjalmar Agne Hammerskjold) असें होतें. स्वीडनच्या दक्षिणेकडील जॉन कोपिंग (Jon Koping) या नांवाच्या गावी २९ जुलै १९०५ या दिवशी त्यांचा जन्म झाला. हॅमरशील्ड कुटुंब हें स्वीडनमधील एक प्रतिष्ठित व मातबर कुटुंब आहे. श्री. दाग हॅमरशील्ड यांचे वडील श्री. हॅजल्मार हॅमरशील्ड हे पहिल्या महायुद्धाचे वेळीं स्वीडनचे पंतप्रधान होते. स्वीडनच्या इतिहासांत या हॅमरशील्ड कुटुंबाचें नांव प्रसिद्ध होतें. कारण अगदी सतराव्या शतकापासून हॅमरशील्ड घराण्यांतील पुरुष स्वीडनच्या सरकारचे

नोकरीत होते. शिवाय स्वीडनच्या सैन्यांतहि हॅमरशील्ड कुटुंबियांनी अनेकदा तरवार गाजविली होती. स्वीडन व डेन्स यांमध्ये झालेल्या एका लढाईत भीम-पराक्रम गाजविल्याबद्दल हॅमरशील्ड कुटुंबाच्या पूर्वजांना सरदारकी देण्यांत आलेली होती. सारांश हॅमरशील्ड कुटुंब राष्ट्रनिष्ठा, शौर्य व विद्वत्ता याबद्दल सतराव्या शतकापासून स्वीडनमध्ये प्रसिद्धच होतें.

श्री. दाग हॅमरशील्ड यांचे थोरले बंधु हेग येथील आंतरराष्ट्रीय न्याया-लयाचे न्यायाधीश होते. या कौटुंबिक पार्श्वभूमीला साजेसे व्यक्तिमत्त्व श्री. दाग हॅमरशील्ड यांना लाभलें होतें. अगदी लहानपणापासून एक अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून श्री. दाग हॅमरशील्ड हे प्रसिद्ध होते. १९२५ सालीं त्यांनी उप्पसाला ( Uppsala ) विद्यापीठाची बी. ए. ची पदवी मिळविली. पदवी परीक्षेसाठी त्यांनी वाङ्मय, फ्रेंच तत्त्वज्ञान व अर्थशास्त्र हे विषय घेतले होत. पैकी अर्थशास्त्र हा त्यांचा अतिशय आवडीचा विषय होता.

उप्पसाला विद्यापीठांतून पदवी घेतल्यावर ते स्टॉकहोम विद्यापीठांत पुढील शिक्षणासाठी गेले. तेथे त्यांनी Distribution of Economic Market trends या विषयावर संशोधनात्मक प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविली. या-व्यतिरिक्त आवडीचा विषय म्हणून त्यांनी तत्त्वज्ञानविषयक संशोधन करून दुसऱ्यांदा डॉक्टरेट मिळविली होती.

आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त त्यांचे इंग्रजी, फ्रेंच व जर्मनी या भाषांवर उत्तम प्रभुत्व होतें. वार्ताहरांना मुलाखत देतांना पुष्कळदा आवश्यकतेनुसार या चारहि भाषांतून उत्तरें देऊन त्यांनी चांगलेच चकित करून सोडले आहे.

स्वतःला त्यांना अर्थशास्त्रज्ञ म्हणवून घेणे आवडे. स्टॉकहोम विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाल्यानंतर त्यांनी कांही कालपर्यंत त्याच विद्यापीठांत अध्यापनाचें कार्य केलें. परंतु तेथे त्यांचें मन रमेना. त्यांनी स्वीडन बँकेंत चिटणीस म्हणून काम करावयास सुरवात केली. त्यानंतर मात्र त्यांचा अभ्युदय अतिशय झपाट्याने झाला. १९३० ते ३४ या कालांत जागतिक मंदीचा तडाखा जगांतील इतर राष्ट्रांप्रमाणे स्वीडनलासुद्धा बसला होता. त्यामुळे स्वीडनमध्ये फार मोठ्या प्रमाणावर बेकारी निर्माण झाली होती. या बेकारीची चौकशी करण्यासाठी स्वीडनच्या सरकारने एक चौकशी समिति नेमली होती. या समितीवर श्री. दाग हॅमरशील्ड यांची नियुक्ति करण्यांत आली होती. या कामांत मिळविलेल्या

अनुभवाचा त्यांना फार फायदा झाला, असे ते म्हणत. १९३६ ते ४५ या कालांत ते स्वीडनच्या अर्थखात्याचे कायमचे चिटणीस म्हणून काम करीत होते.

हें काम करीत असतांनाच दुसऱ्या महायुद्धाचे ऐन मध्यावर (१९४१ सालीं) त्यांना स्वीडन बँकेचे अध्यक्ष करण्यांत आले होते. १९४९ पर्यंत ते स्वीडनच्या परराष्ट्रखात्याचे आर्थिक सल्लागार म्हणूनहि काम करीत. १९४९ ते १९५३ पर्यंत म्हणजे राष्ट्रसंघाचे सरचिटणीस म्हणून त्यांची नियुक्ति होईपर्यंत ब्रिटन, अमेरिका व इतर राष्ट्रें यांच्याशीं विविध प्रश्नांवर वाटाघाटी व चर्चा करण्यासाठी स्वीडन सरकारचे प्रतिनिधि म्हणून ते जात असत. या त्यांच्या अष्टपैलू कार्यक्षमतेमुळेच राष्ट्रसंघाचे सरचिटणीस म्हणून त्यांची निवड होणे अपरिहार्य ठरले.

त्यांचें व्यक्तिमत्त्व मोठें प्रसन्न व उमदें होतें. पांच फूट दहा इंच उंची, सडसडीत अंगलट, भव्य कपाळ, मोठे, दुसऱ्याच्या अंतःकरणाचा ठाव पाहणारे निळेशार डोळे आणि अतिशय प्रसन्न अशी मुद्रा हीं त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचीं वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील. परंतु त्यांच्याशीं बोलणाऱ्यावर त्यांची जी छाप पडे, ती विनोदगर्भ सडेतोड पण लाघवी अशा त्यांच्या बोलण्यामुळे! वाचनाचा त्यांना विलक्षण नाद होता. पण एवढें असूनहि त्यांची रसिकता व कलादृष्टि जागरूक होती. त्यांच्या खोलीत पिकासोचें एखादें चित्र लटकवलेलें असायचें. तसेच ते वेळ मिळेल तेव्हा अवन्त गर्द (Avant-Garde) ची कविताहि वाचीत. आमरण अविवाहित असूनहि त्यांची रसिकता व जागतिक शांतते-विषयींची आस्था कायम होती, हें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें मला जाणवलेलें खास वैशिष्ट्य होय.

आजन्म अविवाहित राहणारी माणसे आपल्या देशांतहि आहेत. त्यांपैकी कांही विद्वान व व्यासंगीहि आहेत; पण त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन जेवढा स्वच्छ असावयास हवा, तेवढा क्वचितच आढळतो. आपण फार मोठा त्याग केला आहे व समाजाने आपल्याला योग्य तो मान दिलेला नाही, अशी बहुधा या लोकांची प्रामाणिक समजूत झालेली असते. त्यामुळे परनिंदा, उपहास व आत्मश्लाघा यांच्या भोवऱ्यांत सापडून अशा लोकांचें व्यक्तिमत्त्व नासून जाते. श्री. दाग हॅमरशील्ड यांना या दुर्गुणांचा शेवटपर्यंत स्पर्शहि झाला नव्हता. या गोष्टींवरून त्यांची वैयक्तिक महत्तता चटकन् नजरेत भरते.

श्री. दाग हॅमरशील्ड यांची राष्ट्रसंघाच्या सरचिटणीसपदीं ज्या पद्धतीने व ज्या परिस्थितीत निवड झाली ती परिस्थिति मोठी स्फोटक होती. श्री. ट्रिग्वे ली यांनी राजीनामा देतांच खऱ्या अर्थाने राष्ट्रसंघाच्या कार्याची धुरा वाहण्यासाठी सर्वांना मान्य होईल, असा कुणीहि उमेदवार सापडेना. १० नोव्हेंबर १९५२ या दिवशी श्री. ट्रिग्वे ली यांनी आपला राजीनामा सादर केला. तेव्हापासून १० एप्रिल १९५३ पर्यंत राष्ट्रसंघाच्या सरचिटणीसपदीं कुणाची नियुक्ति करावी, याबद्दल राष्ट्रसंघाच्या आमसभेत ( General Assembly ) सारखी चर्चा चालू होती. ११ मार्च १९५३ रोजी राष्ट्रसंघाच्या सिक्युरिटी कौन्सिलची जी बैठक भरविण्यांत आली त्या बैठकींत या पदासाठी तीन नांवें सुचविण्यांत आलीं. ( १ ) ब्रिगेडियर जनरल कार्लश् पी. रोम्यूलो, फिलिपाईनचे राष्ट्रसंघांतील कायम प्रतिनिधि, ( २ ) डॉ. स्टॅनिस्लाव खसेझेवस्की, पोलंडचे परराष्ट्रखात्याचे मंत्री व ( ३ ) श्री. लेस्टर पियर्सन, कॅनडाच्या परराष्ट्रखात्याचे सरचिटणीस. या तीन नांवांपैकी पहिलें नांव अमेरिकेतर्फे, दुसरें रशियातर्फे व तिसरें डेन्मार्कच्या मार्फत सुचविण्यांत आलें होतें. या तिसऱ्या नांवाला फ्रान्स व इंग्लंड या दोन्ही राष्ट्रांचाहि पाठिंबा होता.

याबाबत तीन-साडेतीन तास चर्चा होऊनसुद्धा यापैकी कोणत्याहि उमेदवाराबाबत सर्व प्रतिनिधींचें एकमत होईना. त्यानंतर २७ मार्च १९५३ पर्यंत राष्ट्रसंघाच्या सिक्युरिटि कौन्सिलच्या पांच बैठकी झाल्या, परंतु कांही वेळां रशियन प्रतिनिधि झोरिन व कांही वेळा इतर राष्ट्रांचे प्रतिनिधि यांचें एकमत न झाल्यामुळे राष्ट्रसंघाच्या सरचिटणीसपदीं कोणाला नेमावें याबाबत कांही निर्णय होईना.

३१ मार्च १९५३ या दिवशी पुनः सिक्युरिटि कौन्सिलची बैठक भरली. या बैठकीच्या वेळीं श्री. झोरिन यांच्याऐवजी श्री. एम्. व्हिशन्स्की हे रशियाचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. या बैठकींत फ्रान्सच्या प्रतिनिधीने श्री. दाग हॅमरशील्ड यांचें नांव या जागेसाठी सुचविलें. या नांवाला मात्र ब्रिटन, अमेरिका व रशिया देशांच्या प्रतिनिधींनी हरकत घेतली नाही. शेवटी मतदान होऊन दहा विरुद्ध शून्य अशा मतांनी श्री. हॅमरशील्ड यांचें नांव सिक्युरिटि कौन्सिलमध्ये मान्य करण्यांत आलें. फक्त चीनच्या ( फोर्मोसाच्या ) प्रतिनिधींनी मतदान केलें नाही. कारण स्वीडनने कम्युनिस्ट चीन या राष्ट्राला

मान्यता दिली होती व श्री. हॅमरशील्ड हे स्वीडनचे नागरिक होते. चीनच्या या कृत्याबद्दल रशियाचे प्रतिनिधि श्री. व्हिशन्स्की विनोदगर्भ उपहासाने असे म्हणाले की, " जे राज्य अस्तित्वांतच नाही, त्या राज्याने मत दिलें नाहीं तर त्यांत आश्चर्य तें काय ? "

राष्ट्रसंघाचा हा निर्णय श्री. दाग हॅमरशील्ड यांना ताबडतोब तारेने कळविण्यांत आला. स्वीडनच्या सरकारशीं विचारविनिमय केल्यानंतर श्री. दाग हॅमरशील्ड यांनी स्टॉकहोम येथून " आपण ही जागा स्वीकारीत आहोत, " असें कळविलें. हें पद स्वीकारीत असतांना ते असें म्हणाले की " मी हें पद स्वीकारीत आहें, पण त्या पदाची जबाबदारी पार पाडण्यास मी कितपत पुरा पडेन, अशी मला शंका वाटते. परंतु सिक्युरिटि कौन्सिलने या पदासाठी माझी निवड करून माझा फार मोठा सन्मान केला आहे असे मला वाटतें. " राष्ट्रसंघाच्या आमसभेनें सिक्युरिटि कौन्सिलच्या या निवडीवर शिक्कामोर्तब करतांच दि. १० एप्रिल १९५३ या दिवशी श्री. दाग हॅमरशील्ड यांनी आपल्या पदाचीं अधिकारसूत्रें हाती घेतलीं.

१० एप्रिल १९५३ ते १७ सप्टेंबर १९६१ अशी शंभर महिन्यांची त्यांची कारकीर्द झाली. या सर्व कालांत त्यांनी आपलें काम अतिशय चोखपणे बजाविलें. ही जबाबदारी फारच मोठी होती. राष्ट्रसंघाच्या मॅनहटन येथील कार्यालयाची अडतीस मजली गगनचुंबी इमारत हें त्यांचें कार्यालय होतें. या कार्यालयांतील सर्वांत वरच्या मजल्यावर श्री. हॅमरशील्ड यांची कचेरी होती. या कार्यालयांत निरनिराळ्या देशांतील सुमारे पांच हजार नोकर होते. या सर्वांकडून एखाद्या कुशल शास्त्याप्रमाणे श्री. हॅमरशील्ड लीलया काम करून घेत असत.

राष्ट्रसंघाचे सरचिटणीस म्हणून त्यांची नियुक्ति झाली, तेव्हा ते जगाला फारसे परिचित नव्हते. परंतु ते अधिकारपद स्वीकारल्यानंतर थोड्याच कालांत त्यांनी आपला ठसा त्यावर उठविला.

श्री. दाग हॅमरशील्ड यांनी सरचिटणीसपद धारण करण्यापूर्वी राष्ट्रसंघाच्या मार्फतीने साधण्यांत आलेलें उल्लेखनीय आंतरराष्ट्रीय कार्य म्हणजे कोरियामधील युद्धबंदी. प्रथमदर्शनी हें बरोबर आहे असें जरी वाटलें तरी तत्कालीन जागतिक राजकारणाचा विचार केल्यास असें म्हणावें लागेल की कोरियन युद्धबंदीचें खरें

श्रेय अमेरिकेकडे जातें. कारण ही युद्धबंदी जरी राष्ट्रसंघामार्फत घडवून आणण्यांत आली होती, तरी त्यामागची खरी प्रेरणा अमेरिकेचीच होती. काय वाटेल तें करून अमेरिकेला कम्युनिस्टांनी दक्षिणेकडे मारलेली मुसंडी थोपवावयाची होती. म्हणून कोरियन युद्धबंदी अमेरिकेने राष्ट्रसंघामार्फत घडवून आणली, असें म्हणावें लागतें.

परंतु राष्ट्रसंघाची प्रतिष्ठा व उपयुक्तता पणाला लागली, ती १९५४ साली जेव्हा युद्धकैद्यांची मुक्तता करण्याचा ठराव राष्ट्रसंघाने मान्य केला तेव्हा! कम्युनिस्ट चीनने युद्धकैदी म्हणून पंधरा अमेरिकन वैमानिक पकडून ठेवले होते. त्यांची मुक्तता करावी, अशी घोषणा तर राष्ट्रसंघानें केली, पण तिची अंमलबजावणी करणे ही खरी कसोटी होती. श्री. हॅमरशील्ड यांना कुणीतरी विचारलें की या कैद्यांच्या मुक्ततेविषयी वाटाघाटी करण्यासाठी तुम्ही स्वतः चीनमध्ये जाल काय? या प्रश्नाला श्री. हॅमरशील्ड यांनी असें करणें फारच नाट्यपूर्ण होईल नाही का? असें प्रश्नात्मक उत्तर दिलें. पण त्यानंतर कांही आठवड्यांतच श्री. हॅमरशील्ड पेकिंगमध्ये वाटाघाटी करण्यासाठी दाखल झाले आणि आश्चर्य म्हणजे त्यांनी वाटाघाटींच्या मार्गानेंच या युद्धकैद्यांची सुटका घडवून आणली. त्यामुळे सारें जग त्यांच्याकडे डोळे चोळीत आश्चर्यानें पाहूं लागलें.

पूर्ण विचार करून निर्णय घेणे आणि निर्णय घेतल्यानंतर काय वाटेल तें झालें तरी त्या निर्णयाला चिकटून राहणे ही त्यांच्या कार्यपद्धतीचीं वैशिष्ट्यें होतीं. आपल्या मनांत काय चाललें आहे, पुढे आपल्या काय योजना आहेत, याविषयी ते कुणालाहि कधीहि थांगपत्ता लागूं देत नसत. चतुर, जिज्ञासू व व्यासंगी बातमीदारांच्या घोळक्यांत वावरत असतांना अशा प्रकारची गुप्तता पाळणे, हें असामान्य आत्मसंयमाचेंच द्योतक नाही काय?

ब्रिटिशांनी इजिप्तच्या बाबतीत घसमुसळेपणा करावयास सुरवात करतांच त्यांनी इजिप्तमध्ये राष्ट्रसंघाचें सैन्य पाठविलें. फ्रान्स-इस्राइलवरील आक्रमणाचे वेळीहि ते तसेंच वागले. राष्ट्रसंघाच्या झेंड्याखाली निळ्या टोप्या घालून डेन्स, नॉर्वेजियन व कोलंबियन स्वयंसेवक सैनिक एकदिलानें लढूं शकतात, हें दृश्य त्या वेळीं जगाला दिसले. लेबेनॉन व जॉर्डन यांच्यामध्ये १९५८ सालीं कुरबूर झाली. तेथेहि राष्ट्रसंघाचें सैन्य हजर होतेंच. १९५९ साली कॉंगोमध्ये राष्ट्रसंघाचें

सैन्य धाडण्यांत आलें आणि तेव्हापासून रशियन प्रतिनिधींनी श्री. दाग हॅमरशील्ड यांच्यावर आग पाखडावयास सुरवात केली.

खरें तर प्रथम रशियाच्या प्रतिनिधीने कॉंगोमध्ये राष्ट्रसंघाचें सैन्य पाठविण्यास मान्यता दिली होती. कारण श्री. हॅमरशील्ड यांनी प्रस्ताव अशातऱ्हेने मांडला की रशियन प्रतिनिधीला तो मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. पण पुढे जेव्हा राष्ट्रसंघाच्या नांवाखाली रशियन सैन्याला कॉंगोमध्ये हस्तक्षेप करण्यास श्री. दाग हॅमरशील्ड यांनी संमति दिली नाही, तेव्हा रशियनांचा तिळपापड झाला, पण त्याला श्री. हॅमरशील्ड यांनी भीक घातली नाही.

राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या बैठकीत श्री. निकिता क्रुश्चेव्ह या त्या वेळच्या रशियन पंतप्रधानांनी श्री. हॅमरशील्ड यांच्याविरुद्ध आपला जळफळाट व्यक्त केला. मुठी आपटीत श्री. क्रुश्चेव्ह यांनी आपल्या पायांतील जोडा हातांत घेऊन तो नाचवीत नाचवीत ओरडून म्हटलें, "हा हॅमरशील्ड कोण शिष्ट आहे! मोठा संतच लागून गेला...एवढी सामान्य न्यायबुद्धीसुद्धा ज्याच्यापाशीं नाही, असला क्षुद्रबुद्धि माणूस राष्ट्रसंघाचा सरचिटणीस व्हायला पूर्णपणे नालायक आहे......"

हें सर्व चालू असतांना श्री. दाग हॅमरशील्ड हे अगदी शांतपणे आपल्या जागी बसले होते. आपल्या दोन्ही हातांच्या मुठी त्यांनी आपल्या तोंडावर पालथ्या धरल्या होत्या व श्री. क्रुश्चेव्हकडे ते रोखून एकटक बघत होते. जणू आपल्या तोंडून एखादा उणादुणा शब्द जाईल, म्हणून त्यांनी तोंड दाबून धरलें होतें.

श्री. निकिता क्रुश्चेव्ह यांचें हें उद्दामपणाचें भाषण संपल्यानतर क्षणभर ते गप्पच राहिले व नंतर शांतपणे म्हणाले की "मी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा यासाठी आपण म्हणतां तें एक कारण असूं शकेल कदाचित्...पण अशा आणीबाणीच्या परिस्थितीत राजीनामा देऊन राष्ट्रसंघासारखी आंतर-राष्ट्रीय संघटना नेस्तनाबूत करण्याचें निंद्य कृत्य मी कदापि करणार नाही."

या त्यांच्या संयमाचें जगांतील सर्वच पुढाऱ्यांनी कौतुक केलें. कारण अशा प्रसंगी प्रामाणिकपणे काम करणारा कोणताहि मानी पुरुष सहज संतापाच्या आहारी गेला असता. श्री. क्रुश्चेव्ह यांच्या या वागणुकीविषयी श्री. दाग हॅमरशील्ड यांनी आपल्या एका मित्राला असें लिहिलें की "श्री. क्रुश्चेव्ह यांना मला

जोडा दाखवून जणू सर्व जगाला शाप द्यावयाचे होते. सर्व प्रकारच्या सांथी व रोग यांचा कम्युनिस्टेतर जगांत तत्काल प्रादुर्भाव होवो, असेंच त्यांना म्हणावयाचें होतें." या त्यांच्या उद्गारांवरून श्री. क्रुश्चेव्ह यांच्यावर ते रागावले नाहीत, तर त्यांची त्यांनी कीव केली किंवा उपेक्षा केली असें दिसून येईल. कोणत्याहि प्रसंगी भावनेच्या आहारी न जातां डोकें शांत ठेवून काम करण्याची त्यांची पात्रता या वेळीं कसोटीला उतरली हें कुणीहि मान्य करील.

श्री. क्रुश्चेव्ह यांच्या वागणुकीची, श्री. हॅमरशील्ड यांनी जी दखल घेतली त्यावरून त्यांची आंतरराष्ट्रीय राजकारणांतील अपक्ष भूमिका स्पष्ट झाली. निःपक्षपातीपणे काम करणारा अधिकारी म्हणून त्यांची प्रतिष्ठा त्यामुळें वाढली. परंतु असें असलें तरी त्या अगोदर वेळोवेळी त्यांना या प्रकारच्या वागणुकीबद्दल इंग्लंड-अमेरिका वगैरे राष्ट्रांचा रोष पत्करावा लागला होता, पण त्याबद्दल त्यांनी कधीहि खंत केली नाही. कोणत्याहि एका देशाचें कल्याण व संपूर्ण जगाचें कल्याण यांपैकी एक पत्करणें आवश्यक आहे, अशी परिस्थिति जेव्हा जेव्हा आली, तेव्हा तेव्हा त्यांनी जगाच्या कल्याणालाच प्राधान्य दिले आहे.

सर्व जगाचा विचार करून अचूक निर्णय घेण्याची त्यांची पद्धति कटांगाच्या बाबतीत निर्णय घेतांना चुकीची ठरली, असें कांही विचारवंतांचें मत आहे. कटांगाचे बाबतीत राष्ट्रसंघाने हस्तक्षेप करून आपली प्रतिष्ठा गमावली, असेंहि कांही पौर्वात्य राजकारणपटु म्हणतात.

सप्टेंबर १९६० पासून कॉंगोमधील परिस्थिति चिघळत चालली. श्री. लुमुंबा आणि प्रेसिडेंट कासावुबू यांच्यामधील तेढ वाढत जाऊन तेथे अराजक माजलें. श्री. लुमुंबांनी विनंती केल्यावरून राष्ट्रसंघाच्या फौजा कॉंगोमध्ये पाठविण्यांत आल्या. २० सप्टेंबर १९६० रोजी कॉंगोमधील लिओपोल्डव्हिला येथे राष्ट्रसंघातर्फे पाठविण्यांत आलेल्या फौजेंत, अधिकारी धरून १६,४०० माणसें होतीं.

श्री. लुमुंबा, प्रेसिडेंट कासावुबू व घानाचे डॉ. एन्क्रुमा या सर्वांची अपेक्षा अशी होती कीं राष्ट्रसंघाच्या फौजांच्या अस्तित्वाचा आपल्याला सर्वांत अधिक फायदा व्हावा व आपणांस राजकीय प्रतिष्ठा व सत्ता प्राप्त व्हावी. परंतु राष्ट्रसंघाच्या फौजांचा अशा प्रकारे वापर करतां येऊं नये, अशी काळजी श्री. दाग हॅमरशील्ड घेत होते. याचा परिणाम असा झाला की आळीपाळीने या तिन्ही नेत्यांचा श्री. हॅमरशील्ड यांना थोड्याफार प्रमाणांत रोष पत्करावा लागला.

श्री. हॅमरशील्ड यांच्या कारकिर्दीतील शेवटचे वर्ष-दीडवर्ष अतिशय कटकटींचें गेलें. या काळांत मुख्यतः दोन प्रश्नांनी श्री. हॅमरशील्ड यांना अगदी सतावून सोडलें होतें. एक म्हणजे वर उल्लेखिलेला काँगोचा प्रश्न व दुसरा म्हणजे त्यांच्या सरचिटणीसपदाला रशियाकडून होणारा वाढता विरोध.

काँगोमध्ये अराजक निर्माण होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. विशेषतः जुलै १९६० मध्ये बेल्जम स्वतंत्र झाल्यापासून घातपाती कृत्यें व अंदाधुंदी यांना काँगोमध्ये ऊत आला होता. अशी राजकीय अस्वस्थता निर्माण झाली म्हणजे साम्राज्यविस्तार करण्याची बुद्धि इतर राष्ट्रांना होते व अशी बुद्धि कोणत्याहि राष्ट्राला होणे, ही जागतिक महायुद्धाची नांदीच असते. म्हणून श्री. हॅमरशील्ड यांनी या अंदाधुंदीला आळा घालण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावयाचे ठरविले होते व त्याच हेतूने राष्ट्रसंघाच्या फौजा त्यांनी लिओपोल्ड-व्हिलमध्ये नेऊन ठेवल्या होत्या.

या अंदाधुंदीचा फायदा कम्युनिस्टांना घेतां आला नाही, म्हणून श्री. क्रुश्चेव्ह यांचा जळफळाट झाला होता व त्यामुळेच राष्ट्रसंघाच्या आमसभेत त्यांनी आपलें म्हणणें स्पष्टपणे मांडून श्री. हॅमरशील्ड यांची नेमणूक रद्द करून तीन प्रतिनिधींच्या मार्फतीने हें काम करवून घ्यावे, असे सुचविलें होतें. ही आपली ट्रॉयका (Troika) योजना मान्य व्हावी म्हणून रशियामार्फत श्री. हॅमरशील्ड यांच्यावर जोरदार हल्ले करण्यांत येत होते. या दोन प्रश्नांनी श्री. हॅमरशील्ड यांना फार त्रास दिला.

श्री. हॅमरशील्ड यांनी रशियाप्रणीत ट्रॉयका योजना जरी यशस्वीरीत्या धुडकावून लावली असली तरी दिवसेंदिवस रशियाचा काच त्यांना असह्य होत होता व रशियाच्या मार्फतीने सर्व प्रकारच्या भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करण्यांत येत होता. त्यामुळे श्री. हॅमरशील्ड यांना काँगोमध्ये लवकरांत लवकर शांतता प्रस्थापित करणे आवश्यक आहे, असे वाटत होते.

आफ्रिकेमधील बऱ्याचशा राष्ट्रांचा श्री. हॅमरशील्ड यांनी विश्वास संपादन केला होता. काँगोचें स्वातंत्र्य, कटांगाचा प्रश्न समाधानकारकरीत्या सुटल्या-शिवाय सिद्ध होणार नाही, हें त्यांनी ओळखलें होतें. कारण कटांगा हा प्रांत उत्पन्नाच्या दृष्टीने चांगला होता. मोइसे टिशोंबे यांची भूमिका, लुमुंबा यांच्या एकतंत्री राज्याच्या कल्पना, बेल्जमचा कटांगामध्ये चंचुप्रवेश, रशियाने

याबाबतीत घेतलेली भूमिका, या सर्वांचा परिणाम असा विचित्र झाला की या प्रश्नाची तड लागण्याऐवजी त्याची निरगाठच होत गेली.

१९६१ सालच्या सुरवातीपासून रशियातर्फे श्री. दाग हॅमरशील्ड यांच्यावर भलतेसलते आरोप करण्यांत येऊं लागले. लुमुंबाच्या खुनांतसुद्धा त्यांचाच हात होता असें म्हणावयास रशियाने मागे पुढे पाहिलें नाहीं. या काळांत अगदी वैतागून जाऊन पुष्कळदा श्री. हॅमरशील्ड म्हणत, " मी रशियन राजकारणाला पुरून उरेन, पण त्यांच्या अशिष्ट वागणुकीपुढे मात्र मी हात टेकले आहेत. "

शेवटी श्री. हॅमरशील्ड यांनी ज्या परिस्थितीला कंटाळून नोडोला येथे विमानांतून जाण्याचा निर्णय घेतला, ती परिस्थिति फार भयानक होती. काँगोची राजधानी लिओपोल्डव्हिला येथील राष्ट्रसंघाच्या तात्पुरत्या कचेरीत हजर राहून श्री. हॅमरशील्ड यांनी कटांगांतील परिस्थितीचें निरीक्षण केलें होतें.

कटांगांतील लढाईने उग्र स्वरूप धारण केलें होतें. राष्ट्रसंघाच्या सैन्याची कोंडी झालेली होती व डाव्या गटाची श्री. अँटोनी गिझेंगा यांच्या नेतृत्वा-खाली सतत सरशी होत होती. कोणत्याहि क्षणाला कटांगांत सर्वत्र अराजक व भयानक स्वरूपाचें युद्ध सुरू होण्याची शक्यता होती. अशा प्रकारचें अराजक टाळण्यासाठी तर श्री. हॅमरशील्ड यांनी आटोकाट प्रयत्न चालविले होते.

श्री. हॅमरशील्ड यांनी श्री. टिशोंबे यांना युद्धविराम घडवून आणण्याच्या वाटाघाटी करण्याचे तारेने आवाहन केलें. या वाटाघाटी नोडोला येथे व्हाव्यात असें ठरले. श्री. टिशोंबे यांनी त्याला मान्यता देताच त्याच दिवशी म्हणजे दि. १७ सप्टेंबर १९६१ या दिवशी सायंकाळीं चार वाजता श्री. हॅमरशील्ड नोडोला येथे जाण्यासाठी निघाले.

आपल्याबरोबर त्यांनी इतर पंधरा अधिकाऱ्यांना घेतले होते. राष्ट्रसंघातर्फे कांगोमध्ये वापरण्यांत येणाऱ्या डी–६ या जातीचें " अल्बेर्टिना " या नांवाचें पांढऱ्या रंगाचें विमान त्यांनी प्रवासासाठी मुक्रर केलें होतें. श्री. हॅमरशील्ड यांनी सुरक्षिततेसाठी सर्वप्रकारच्या खबरदाऱ्या घेतल्या होत्या. विशेषत: " लोन रेंजर " या नांवाच्या जेट लढाऊ विमानापासून आपला बचाव करण्यासाठी त्यांनी आपल्या वैमानिकाला " मौन " ( Radio Silence ) पाळण्यास सांगितलें होतें, तसेच त्यांनी आपल्या प्रवासाचा हवाई मार्ग अशा

पद्धतीने ठरविला होता की; लोन रेंजरच्या प्रदेशावर त्यांचें विमान रात्र झाल्यावर पोहोचेल, शिवाय ऱ्होडेशिया व कॉंगोमधील पंधरा विमानतळांना “आवश्यक तर केव्हाहि आपलें विमान तेथे उतरेल,” असे इशारे देऊन ठेवले होते. त्यांच्या विमानाचा वैमानिक कॅप्टन पर एरिक हॅलॉंकिस्ट हा अतिशय कार्यकुशल होता. आतापर्यंत त्याने ७००० तास उड्डाण केलेलें होतें शिवाय या सर्वभागाची त्याला अगदी खडान् खडा माहिती होती.

नोडोलाच्या विमानतळावर श्री. टिशोंबे सायंकाळीं सहा वाजल्यापासून हजर होते. श्री. हॅमरशील्ड यांच्या आगमनाची ते वाट पाहात होते. रात्री दहा वाजून चाळीस मिनिटांनी लॉर्ड लॅन्स्डोन हे ब्रिटिश पार्लमेंटच्या परराष्ट्रखात्याचे सेक्रेटरीहि येऊन पोहोचले. त्यांनी मध्यस्थ म्हणून काम करण्याचें कबूल केलें होतें. तेथें हजर असलेल्या वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींची अशी समजूत झाली, की श्री. लॅन्स्डोन हेच हॅमरशील्ड आहेत. त्यामुळे हॅमरशील्ड अगदी सुखरूपपणे येऊन पोहोचले, अशी बातमीसुद्धा त्यांनी आपल्या वर्तमानपत्रांना दिली. अकरा वाजून दहा मिनिटांपर्यंत श्री. टिशोंबे व लॅन्स्डोन हे विमानतळावर थांबून राहिले होते. त्यानंतर ते झोपण्यास निघून गेले. तोपर्यंत श्री. हॅमरशील्ड यांच्या विमानाचा कांहीच पत्ता नव्हता.

रात्री एकच्यानंतर नोडोला विमानतळावर एकाएकी कुठल्या तरी अज्ञात विमानाकडून संदेश आला. त्या विमानाचा वैमानिक ६००० फुटावर उतरावयास हरकत नाही ना असे विचारीत होता, पण त्यानंतर त्या विमानाकडून कांहीहि संदेश आला नाही. त्यामुळे नोडोला विमानतळावरील अधिकाऱ्यांना वाटले की ते विमान दुसरीकडे कुठेतरी उतरलें असेल.

त्यानंतर नऊ तासांनी “अल्बेर्टिनाचा” शोध सुरू करण्यांत आला आणि दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता अल्बेर्टिना विमान, नोडोलाच्या विमानतळापासून सुमारे सात मैलांवर घनदाट जंगलांत कोसळलें असल्याची दुःखद वार्ता लागली.

या विमानांतील सर्व प्रवासी मृत्युमुखी पडले होते. सर्वांचे देह भाजल्यामुळे ओळखूं न येण्याइतके विद्रूप झाले होते. राष्ट्रसंघाच्या आरक्षक दलाचा एक रक्षक त्या अपघातांतून बचावला होता. त्याचें नांव हॅरॉल्ड ज्यूलियन असें होतें. तोहि त्यानंतर पांच दिवसांनी वारला. हा सर्व ताण सहन न होऊन तो

जवळजवळ वेडाच झाला होता, पण त्याच्याकडून पोलिसांनी अपघात कसा झाला, याविषयीची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांत एवढेच निष्पन्न झालें की विमान कोसळण्यापूर्वी विमानांत कसलातरी स्फोट झाला होता.

नोडोला विमानतळावरून श्री. हॅमरशील्ड यांच्या निधनाची वार्ता जगभर प्रसृत करण्यांत आली. ही बातमी जाहीर होताच कटांगाचे अध्यक्ष श्री. टिशोंबे व राष्ट्रसंघाचे प्रतिनिधि श्री. मोहम्मद खियारी यांनी युद्धविराम झाल्याचे जाहीर केलें. श्री. हॅमरशील्ड यांना ज्यासाठी एवढा धोका पत्करून विमानाचा प्रवास करावा लागला, तें कार्य त्यांच्या निधनानंतर इतक्या तडकाफडकी झालें.

श्री. हॅमरशील्ड यांचा अंत्यविधि नोडोला येथील एका चर्चमध्ये झाला. मोहागनी लाकडाच्या शवपेटिकेंत श्री. हॅमरशील्ड यांचा देह ठेवला होता. शवपेटिकेवर निळ्या व पिवळ्या रंगाचा स्वीडनचा राष्ट्रीय ध्वज गुंडाळण्यांत आला होता. सेंट ॲंड्रूजच्या चर्चमध्ये ही शवपेटिका ठेवण्यात आली होती व त्या पेटिकेशेजारी दोन पहारेकरी पहारा करीत उभे होते. ताज्या फुलांचा मोठा ढीग त्या शवपेटिकेवर जमला होता.

नोडोलामधील पुष्कळ लोकांनी श्री. हॅमरशील्ड यांचें अंत्यदर्शन घेतलें. श्री. टिशोंबे यांनीहि श्री. हॅमरशील्ड यांचें अंत्यदर्शन घेतलें. करड्या रंगाचा पोषाख परिधान करून टिशोंबे अत्यंत धिमी पावलें टाकीत पुढें गेलें. त्यांनी श्री. हॅमरशील्ड यांच्या मृत देहाला अभिवादन केलें व एक मिनिटभर ते अगदी स्तब्धपणें उभे राहिले. नंतर त्यांनी आपलें मस्तक झुकविलें व ते माघारी वळून निघून गेले. त्यापूर्वी ते एवढेच म्हणाले की हॅमरशील्ड ही एकच व्यक्ति अशी होती की जिच्याशी मला अगदी मोकळेपणाने बोलता येणे शक्य होते.

श्री. हॅमरशील्ड यांचें विमान इष्टस्थळीं पोहोचलें नाही, ही बातमी जेव्हा राष्ट्रसंघाच्या कार्यालयांत कळाली, तेव्हा त्या अडतीस मजली गगनचुंबी इमारतीत एकच हाहाकार उडाला. सर्वत्र दु:खाची छाया पसरली व शेवटी जेव्हां श्री. हॅमरशील्ड यांच्या निधनाची वार्ता तेथे पोहोचली, तेव्हा सर्व-जण अवाक् होऊन गेले. या पहिल्या धक्क्यांतून स्वत:ला सावरीत एक उच्च-श्रेणीचा राष्ट्रसंघाचा अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याला एवढेच म्हणाला, " मला वाटतें, आपण ध्वज खाली आणावा ! " कांहीतरी उत्तर द्यायचें म्हणून अनाहूतपणें दुसऱ्याने " होय " म्हटलें.

राष्ट्रसंघाच्या कार्यालयांत घोळक्या घोळक्यांनी सर्व सेवक एकत्र जमून चर्चा करीत होते. दुःख व्यक्तवीत होतें. त्या इमारतीचा लिफ्ट चालविणारा लिफ्टमन तर ओक्साबोक्सी रडूं लागला म्हणे. यावरून त्यांची लोकप्रियता दिसून येते.

१० एप्रिल १९५३ पासून १९६१ च्या सप्टेंबर महिन्यापर्यंत श्री. हॅमरशील्ड यांनी या कार्यालयाचा कारभार अतिशय कार्यक्षमतेने चालविला होता. कोणत्याहि देशाच्या प्रतिनिधीला ते पासपोर्ट मिळवून देण्यासाठी आवश्यक ती तरतूद करीत, तर दुष्काळी विभागांत अन्न पाठविण्याची खबरदारी घेत, त्या इमारतीच्या ५,४०० खिडक्या झाडून घेण्याची व्यवस्था करीत, तर जगांत कुठेहि तेढ निर्माण झाली तर ती नष्ट करण्यासाठी ते शांतपणे कामाला लागत. अत्यंत व्यवस्थितपणे ते हा सर्व गाडा हाकींत. पण सप्टेंबरच्या सुरवातीला जेव्हा ते लिओपोलल्डव्हिला येथें जाण्यासाठी निघाले, तेव्हा आपल्या गैरहजेरीत आपलें काम कुणी करावें, तें ठरवून घावयास मात्र विसरून गेले. अशा प्रकारची चूक त्यांच्या हातून कधीहि होत नसे. पण या त्यांच्या चुकीमुळे त्यांच्या निधनानंतर खऱ्या अर्थाने राष्ट्रसंघाला कायदेशीर असा कुणीहि सरचिटणीस राहिला नाही.

परंतु याचा अर्थ त्यांच्या निधनानंतर राष्ट्रसंघाचें कार्य थांबून राहिलें, असें मात्र नव्हें. त्यानंतर राष्ट्रसंघाच्या तेरा उपचिटणिसांनी लगेच एक सभा घेऊन राष्ट्रसंघाचें काम पूर्ववत् चालू ठेवावें, असा निर्णय घेतला व काम चालू ठेवलें.

श्री. हॅमरशील्ड यांच्या निधनाची वार्ता खरी आहे, असें समजताच अमेरिकेचे श्री. स्टीव्हनसन यांनी कुणीतरी आफ्रो-आशियाई राष्ट्रांपैकी प्रतिष्ठित व्यक्तीने राष्ट्रसंघाच्या सरचिटणीसपदाचीं सूत्रें निदान तात्पुरतीं तरी हातीं घ्यावीं म्हणून प्रयत्न करूं लागले. श्री. फ्रेड्रिक बोलँड या आयर्लंडच्या प्रतिनिधींच्या मार्फत श्री. मोंगी स्लिम यांचें नांव या पदासाठी सुचविण्यांत आलें व त्याला हळूहळू सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींची मान्यता मिळाली व ते राष्ट्रसंघाच्या सोळाव्या आमसभेच्या अधिवेशनाचे वेळीं राष्ट्रसंघाचे सरचिटणीस म्हणून काम पाहूं लागले. राष्ट्रसंघाच्या चिटणिसांच्या जागेवर पोहोचण्यासाठी चढाव्या लागणाऱ्या हिरव्या संगमवररी सात पायऱ्या चढून जात असतांना श्री. मोंगी स्लिम यांचें अंतःकरण भावनांनी जड झालें होतें. त्यांना आपलें भाषणसुद्धा नीट करतां येईना. फ्रेंचमध्ये ते एवढेच म्हणाले की "मला ज्या परिस्थितीत ही जागा

स्वीकारावी लागत आहे......'' पुढें बोलणें त्यांना अशक्य झालें व सर्वांच्या नजरा श्री. हॅमरशील्ड यांच्या रिकाम्या खुर्चीकडे वळल्या.

कुणी म्हणतात की श्री. हॅमरशील्ड यांना आपल्या मृत्यूची चाहूल लागली असावी. कॉंगोमध्ये हस्तक्षेप करून आपण रशियाचा जळफळाट ओढवून घेतला आहे आणि हें व्यक्तिगत सुरक्षिततेच्या दृष्टीने चांगलें नाही, याची त्यांना कल्पना होती. त्यांचे जे अगदी जवळचे मित्र होते, त्यांना असे वाटते की त्यांना आपण मृत्यूचें चुंबन घेण्याचा प्रयत्न करीत आहोत, याची खात्रीने कल्पना होती. कारण त्यांनी १९६१ सालच्या सुरवातीला आपलें मृत्युपत्र तयार करून ठेविलें होतें.

कॉंगोत जाण्यासाठी जेव्हा ते निघाले तेव्हा त्यांची खोली अगदी उत्तमपणे व नीटनेटकी लावलेली होती. दरसाल ते जो वार्षिक अहवाल सादर करीत, त्याचा मसुदा तयार झालेला होता. त्याला त्यांनी स्वतःच प्रस्तावना लिहिली होती. त्या प्रस्तावनेत त्यांनी असें म्हटले होते की "यानंतर मला कांही लिहिता येईल किंवा काय याबद्दल मी साशंक आहे."

ऱ्होडेशियन सरकारतर्फे श्री. हॅमरशील्ड यांच्या विमानाला अपघात कसा झाला असावा, याची संपूर्ण चौकशी करण्यांत आली. शिवाय जळालेल्या अल्बेर्टिना या विमानाचें अवशेष पुन: अमेरिकेंत नेऊन तेथेहि विमानाला कसा अपघात झाला असावा, याविषयी संशोधन करण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. परंतु निश्चित असें कारण सापडलें नाहीं.

हा विश्वासघात तर नसेल ना ? की विमानांतच कांही दोष होता की वैमानिकाची चूक होती, की "लोन रेंजर"चा हा प्रताप होता. याबद्दल पूर्णपणे निर्णायक असें उत्तर सांपडलें नाही. कारण विमान चांगलें होतें, वैमानिक तज्ज्ञ होता. "लोन रेंजर"च्या तडाक्यांत तें सापडलें नव्हतें, वगैरे निष्कर्ष अपघातानंतर उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून तज्ज्ञांनी वेळोवेळी काढले आहेत. सर्वसामान्यपणे तज्ज्ञांचें मतें नोडोलाच्या विमानतळाच्या रोखाने विमान येत असतां तें वाजवीपेक्षा अधिक खाली आले व विमानाचा मागचा भाग झाडांच्या शेंड्यांवर आपटला व त्यामुळे त्याला आग लागली व तें कोसळलें. कांही असलें तरी त्याचा परिणाम फार भयानक झाला.

जगांतील सर्व शांतताप्रिय राष्ट्रांना श्री. हॅमरशील्ड यांच्या निधनाने धक्का

बसला. सर्व राष्ट्रांच्या पुढाऱ्यांनी अतिशय दु:खित अंत:करणाने श्री. हॅमरशील्ड यांना श्रद्धांजलि वाहिली. अमेरिकेचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. केनेडी असे म्हणाले की "त्यांचें नांव जगाच्या शांततेसाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांच्या मालिकेंत अग्रभागी चमकेल." तर श्री. मॅक्मिलन म्हणाले," जगाची कर्तव्य बुद्धीने सेवा करणाऱ्यांपैकी ते एक होते. आपले कर्तव्य करीत असतांना त्यांनी धैर्याने व निष्ठेने काम केलें." रशियाच्या प्रावदा या वर्तमानपत्रांत मात्र "श्री दाग हॅमरशील्ड यांच्या विमानाला अपघात होऊन ते मृत्युमुखी पडले" एवढीच बातमी देण्यांत आली होती.

कांही योगायोग आपातत: एखाद्या गोष्टीचा सारा संदर्भच बदलून टाकतात व त्यामुळे एखाद्या सामान्य घटनेला एक निराळीच पातळी प्राप्त होते. अशीच एक घटना श्री. हॅमरशील्ड यांच्या बाबतीत घडली होती. श्री. हॅमरशील्ड यांना कविता वाचनाची हौस होती. उत्तमोत्तम वाङ्मय ग्रंथांचें वाचन करणे, हा त्याचा विरंगुळा होता. "सदा सर्वकाळ जर मी राष्ट्रसंघाचेंच काम करूं लागलों तर माझ्या मनाचा व बुद्धीचा ताजेपणा नष्ट होईल," असें ते म्हणत. दिवसांतून निदान एक तास तरी स्वत:च्या आवडीच्या विषयाच्या वाचनासाठी ते राखून ठेवीत. त्यासाठी थोडी झोप कमी झाली तरी त्याबद्दल त्यांची तक्रार नसे. म्हणूनच जेव्हा जेव्हा प्रवास करण्याचा प्रसंग येई, तेव्हा तेव्हा आपल्या-बरोबर ते पुष्कळ पुस्तकें घेत.

परंतु कांगोच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी ते जेव्हा लिओपोल्ड-व्हीलला गेले, तेव्हा मात्र त्यांच्यापाशी फक्त एकच पुस्तक होतें व तें म्हणजे फ्रेंच भाषेंत लिहिलेलें ख्रिस्ताचें चरित्र! या चरित्रांत खूण घालण्यासाठी म्हणून त्यांनी जो कागद ठेवला होता, तो कागद म्हणजे त्यांनी सरचिटणीस-पद धारण करतांना घेतलेली शपथ होती. त्यामध्ये लिहिलेलें होते. "मी दाग हॅमरशील्ड गंभीरपणें अशी शपथ घेतो की राष्ट्रसंघाचा सरचिटणीस म्हणून माझ्यावर सोपविलेलीं सर्व कामें मी प्रामाणिकपणे, जास्तीत जास्त चांगल्या तऱ्हेने व स्वत:च्या बुद्धीला पटतील, त्याच पद्धतीने करीन. हीं कामें करीत असतांना राष्ट्रसंघाच्याच हिताचा मी विचार करीन आणि माझ्यावर कोणत्याहि सरकारच्या विचारसरणीचा प्रभाव पडणार नाही, अशी माझी वागणूक ठेवीन......"

# प्रे. जॉन केनेडी

केनेडींच्या खुनाचे प्रकरण ज्या पद्धतीने निकालात काढण्यात आले ती पाहिली म्हणजे यातील गूढता अधिकच वाढत जाते. या खटल्यात वरवर दिसतात किंवा भासविण्यात येतात. त्यापेक्षा अधिक उच्चपदस्थ लोकांचे हात गुंतलेले असावेत व त्यामुळेच अधिक काही माहिती उपलब्ध होईल असे वाटत नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम.......................... वि: ......................
क्रमांक .......................... नों दि ..................

श्री. केनेडी यांचा जन्म २९ मे १९१७ या दिवशी बुकलिन (मॅसेच्युसेट्स) येथे झाला. श्री. जॉन केनेडी यांचे वडील धनिक व व्यापारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना नऊ मुलें होतीं. पैकी जॉन केनेडी हें त्यांचें दुसरें अपत्य होय. श्री. जॉन केनेडी यांचें बालपण अतिशय सुखांत गेलें. त्यांचें शालेय शिक्षण अमेरिकेंत झालें. पण वयाच्या १८ व्या वर्षी श्री. केनेडी यांना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये श्री. हॅरॉल्ड लास्की या जगप्रसिद्ध विद्वानाच्या हाताखाली शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यांत आलें. नंतर ते वयाच्या तेविसाव्या वर्षी हॉर्वर्ड विद्यापीठाचे पदवीधर झाले.

पदवी मिळतांच त्यांनी अमेरिकन आरमारांत प्रवेश केला. १९४१ सालींच त्यांना सॉलोमन बेटावर पाणसुरुंग बोटीचे मुख्य कप्तान म्हणून टेहेळणीच्या कामावर पाठविण्यांत आलें. ही पाणसुरुंग बोट जपान्यांच्या तावडींत सापडली व जपानी विनाशिकेने त्या बोटीचे दोन तुकडे केले. त्या वेळीं श्री. केनेडी यांना अनेक जखमा झाल्या होत्या, परंतु जखमांची पर्वा न करतां, आपल्या बरोबरच्या दहा सहकाऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सुदैवाने ते त्यांच्या सहकाऱ्यांसह या संकटांतून बचावले.

या संकटांत दाखविलेल्या असामान्य शौर्य-धैर्याबद्दल त्यांना नेव्ही क्रॉस व पर्पल हार्ट हे बहुमान देण्यांत आले. त्यानंतर ते आरमारांतून निवृत्त झाले.

आरमारांतून निवृत्त होतांच त्यांनी आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेचे वार्ताहर म्हणून काम करायला सुरवात केलीं. पण या उद्योगांत त्यांचें मन रमेना म्हणून त्यांनी १९४६ सालीं प्रथम राजकारणांत प्रवेश केला. तेथून पुढे त्यांची अतिशय झपाट्याने

प्रगति व्हावयास सुरवात झाली. वर्षांच्या पस्तिसाव्या वर्षी १९५२ साली सर हेन्री कॅबट लॉज यांच्यासारख्या ज्येष्ठ पुढाऱ्याचा निवडणुकींत पराभव करून ते प्रथम सिनेटर म्हणून निवडून आले.

१९५६ साल हें श्री. केनेडींच्या आयुष्यांतील अतिशय क्रांतिकारी साल होय. त्याच वर्षी त्यांच्या Profiles in Courage या ग्रंथाला " पुलिट्झर प्राइज " हें बक्षीस मिळालें. त्यामुळे अमेरिकेंत त्यांचें नांव सर्वतोमुखी झालें व त्यामुळेच १९५८ साली पुनः सिनेटर म्हणून त्यांची निवड होणें अगदी सहज शक्य झालें.

त्यांची व कु. जॅकेलिन ब्रोव्हियर यांची एका भोजन-समारंभाचे वेळी १९५१ सालीच गाठ पडली, तेव्हापासून खरं म्हणजे त्यांचें प्रणयाराधन सुरू होतें. पण १९५२ साली ते सिनेटर म्हणून निवडून आल्यानंतर त्याला अधिक चालना मिळाली व १२ सप्टेंबर १९५३ रोजी कु. जॅकेलिनशीं त्यांचा विवाह झाला.

नंतर नोव्हेंबर १९६० मध्ये ते अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडून आले, तेव्हापासून २२ नोव्हेंबर १९६३ या दिवशी त्यांचा खून होईपर्यंत त्यांनी अमेरिकेंत व जगांत वारेमाप लोकप्रियता मिळविली होती. त्यांचे सारें आयुष्यच असें झंझावाती स्वरूपाचें होतें.

अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द अवघी चौतीस महिन्यांची झाली पण या चौतीस महिन्यांत त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. कुणाच्या रागा लोभाची पर्वा न करतां अमेरिकेच्या व जगाच्या कल्याणासाठी आवश्यक ते निर्णय तडकाफडकी घेऊन ते अमलांत आणले. अमेरिकेंत निग्रोंना समान नागरी हक्क मिळवून देण्याचा केनेडींनी घेतलेला निर्णय हा अशाच धाडसी निर्णयांपैकी होता. त्याच निर्णयामुळे गोऱ्या लोकांचा त्यांनी रोष ओढवून घेतला. कदाचित् त्यामुळेच त्यांच्या जिवावर बेतलें असेल.

गॅलप पोलमधून व्यक्त होणारी श्री. केनेडी यांची लोकप्रियता कमी होत होती आणि त्याचें त्यांना दुःख होतें. १९६४ साली होणाऱ्या निवडणुका त्यांना लढवायच्या होत्या. पुनः एकदा तरी अध्यक्ष म्हणून निवडून येणें आवश्यक आहे असें त्यांना वाटत होतें म्हणून त्यांची धडपड होती. आणि त्यासाठीच ते फ्लॉरिडा व टेक्सास या राज्यांचा दौरा करण्यास प्रवृत्त झाले होते. त्यांना

१४४४९

हें माहीत होतें की, याच राज्यांतून आपल्याला सर्वांत अधिक विरोध होणार. टेक्सास तर त्यांच्या विरोधकांचा-शत्रूंचा-बालेकिल्लाच होता. पण त्यांना असें वाटे की, आपण हा विरोध मोडून काढूं शकूं निदान तो कमी तरी करूं असें.

प्रे. केनेडी दौऱ्यावर निघाले ते प्रथम फ्लॉरिडाला गेले. तेथे त्यांचा सुमारे दहा-अकरा तास मुक्काम होता. या मुक्कामांत त्यांनी तीन ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. ताम्पा येथील नव्या लष्करी विमानदळाच्या प्रमुख केंद्राची पाहणी केली. फ्लॉरिडामध्ये फक्त ताम्पा येथें त्यांच्या व्याख्यानाला चार-पांच हजार लोक हजर होते. इतरत्र त्यांचे जवळजवळ थंडें स्वागत झालें असें म्हणायला हरकत नाहीं. नाहीं म्हणायला खुद्द फ्लॉरिडा येथील चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुढे त्यांचे जें भाषण झालें त्यालाहि बरी गर्दी होती.

फ्लॉरिडाचा दौरा आटोपून ते पुनः वॉशिंग्टनला गेले. तेथें व्हाइट हाऊस-मध्ये दरसाल होणाऱ्या एका समारंभांत त्यांनी भाग घेतला व दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि. २१ नोव्हेंबरला त्यांनी आपल्या पत्नीसह टेक्सास राज्यांत प्रवेश केला. त्यांनी प्रथम सॅन् अँटोनियो, हाउसटन व फोर्टवर्थ शहरांना भेटी दिल्या. तेथील लोकांनी त्यांचें फारच उत्साहाने स्वागत केलें. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांना व त्यांच्या पत्नीला पाहण्यासाठी लोकांनी गर्दी करून सोडली. प्रे. केनेडी व सौ. जॅकलीन केनेडी दोघेहि लोकप्रियतेचे मोठे भोक्ते, त्यामुळे त्यांनीहि जनता-संपर्क साधण्यासाठी, त्यांच्या संरक्षणार्थ उभारलेल्या संरक्षण व्यवस्थेची फारशी बूज ठेविली नाही.

टेक्सासमध्ये त्यांचे इतकें चांगलें स्वागत होईल असे त्यांना बिलकुल वाटलें नव्हतें. त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना बजावलें होतें की, हा शत्रूचा प्रदेश आहे. त्यापूर्वीच श्री. ॲडलाय स्टीवन्सन यांनी या राज्यांत दौरा काढला होता, तेव्हा तेथील लोकांनी त्यांचा चांगलाच समाचार घेतला होता. श्री. स्टीवन्सन यांच्या विरुद्ध निदर्शने करण्यांत आलीं होतीं. एका ठिकाणीं तर चेंगराचेंगरीचा फायदा घेऊन स्टीवन्सनना निदर्शनासाठी आणलेल्या एका फलकांत बांधून टाकण्यांत आलें होतें; त्यामुळे श्री. केनेडींनी या राज्यांत दौरा करण्याचे ठरवितांच पुष्कळांनी त्यांना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवितालासुद्धा धोका आहे, असें सांगून पाहिलें होतें. या पार्श्वभूमीवर

श्री. केनेडींचें झालेलें स्वागत निःसंशय चांगलें होतें. म्हणूनच केनेडी दांपत्य अतिशय खुषींत होतें.

शुक्रवारी दिनांक बावीस नोव्हेंबरला श्री. केनेडी सकाळीं जरा लवकरच उठले. ते फोर्टवार्थमध्ये ज्या हॉटेलांत उतरले होते, त्या हॉटेलच्या भोवती तात्पुरतें कंपाउंड टाकण्यांत आलें होतें व संरक्षक दलांतील सैनिकांचा पहारा बसविण्यांत आला होता.

धुक्यांतून चालतच ते कम्पाउंडपर्यंत गेले. एवढ्या पहाटेसुद्धा तेथे लोकांनी गर्दी करून सोडली होती. केनेडी दांपत्याचें लोकांना विलक्षण आकर्षण होतें. तेथे पोचताच गर्दीतून कुणीतरी विचारलें, "कां हो! जॅकलीनना का नाही आणलंत बरोबर?"

प्रे. केनेडी मनापासून हसले व म्हणाले, "तिला नट्टापट्टा करायला माझ्यापेक्षा थोडा जास्त वेळ लागतो. पण खरं सांगतों, त्यानंतर ती खरोखरच अधिक सुंदर दिसते." असं कांहीतरी खेळकरपणें ते बोलत होते एवढ्यांत जॅकलीन केनेडी आल्याच!

त्या वेळीं त्या खरोखरच आकर्षक दिसत होत्या. त्यांनी गुलाबी रंगाचा उनी पोषाख घातला होता. सुंदर हातमोजे घातले होते. आकर्षक केशरचना केली होती. आणि डोक्यावर पिलबॉक्स पद्धतीची हॅट घातली होती.

फोर्टवर्थ शहरांतील चेंबर ऑफ कॉमर्सने दिलेल्या न्याहारीला हजर राहून केनेडी दांपत्याने तेथील लोकांना आपल्या सहवासाचा लाभ दिला व लोकप्रियतेच्या पुनःप्रत्ययाचा आनंद उपभोगला. तेथील भाषणांत श्री. केनेडी म्हणाले की "आजचें जग हे कमालीचें असुरक्षित आहे. आयुष्य अतिशय धकाधकीचें आहे. उद्या काय घडेल तें आज सांगतां येत नाही......निदान या दशकांत नाही, शतकांतसुद्धा......"

आपला फोर्टवर्थमधील कार्यक्रम आटोपून केनेडी दांपत्य विमानांत बसलें. निळे पट्टे असलेले पांढऱ्या शुभ्र रंगाचें तें शाही विमान डलासच्या दिशेने झेपावूं लागलें. एवढ्या गर्दीच्या धावपळीनंतरसुद्धा श्री. केनेडी अगदी ताजेतवाने होते. विमानांत बसल्या बसल्या त्यांनी आपल्या डलास येथील भाषणावर शेवटचा हात फिरविला.

त्यांनी त्या भाषणांत म्हटलें होतें की जगाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची

जबाबदारी नियतीनेच या देशावर–या देशांतील आजच्या पिढीवर–टाकली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती दूरदृष्टि, समता, बंधुभाव व संयम आपणापाशीं असला पाहिजे...

डलासच्या ल्व्हफील्ड विमानतळ दृष्टिपथांत आला. आकाशाच्या कुशींतून केनेडींचें विमान जमिनीकडे झेपावूं लागलें. विमानतळावर एकच गडबड उडाली. संरक्षकदल स्वागत समिति व लोक केनेडी आता इथे उतरतील या जाणिवेने सज्ज झाले. येवढ्यांत विमानतळावर विमानाने आपले पाय टेकले आणि निमिषार्धात प्रे. केनेडी व सौ. केनेडी प्रसन्न स्मित उधळीत विमानांतून बाहेर पडले. त्यांचा उत्साह आणि आनंद जणू भरून ओसंडत होता.

डलासची स्वागत समिति केनेडी दांपत्याशीं हस्तांदोलन करावयास सिद्ध होती. समितीतर्फे सौ. केनेडींना तांबड्या गुलाबांचा एक मोठा गुच्छ देण्यांत आला. डाव्या हाताने तो गुच्छ सावरीत सर्वांशीं हस्तांदोलन करीत त्या पुढे जात होत्या.

विमानतळाबाहेर त्यांच्यासाठी एक शाही मोटार जय्यत तयार ठेवण्यांत आली होती. मतदारांपैकी कांहीजण संरक्षक सांखळीचें कुंपण मोडून आंत घुसले होते. त्यांच्याशीं हस्तांदोलन करून केनेडी दांपत्य त्या मोटारींत बसलें, तेव्हा बरोबर अकरा वाजून पन्नास मिनिटे झाली होती.

तीं दोघेहि मागच्या सीटवर बसली होती. श्री. केनेडींच्या डाव्या बाजूला सौ. जॅकलीन केनेडी बसल्या होत्या. पुढच्या सीटवर टेक्ससचे गव्हर्नर श्री. जॉन कोनाली आणि त्यांच्या पत्नी निली कोनाली हे बसले होत. मोटारीचें छत मुद्दामच दुमडून ठेवण्यांत आलें होतें. त्यांच्या मोटारीच्या मागे–पुढे सुरक्षादलाच्या मोटारी होत्या. त्यांच्यामागे चालत असलेल्या तिसऱ्याच मोटारींत अमेरिकेचे उपाध्यक्ष श्री. लिंडन जॉन्सन हे बसले होते.

ही सारी मिरवणूक डलास शहराकडे निघाली होती. तेथे त्यांना मेजवानी देण्यांत येणार होती. श्री. केनेडी व सौ. केनेडी लोकांनी केलेल्या अभिनंदनाचा हात उंचावून स्वीकार करीत होतीं. हें त्यांचें स्वागत पाहून त्यांचें अंतःकरण आनंदाने व अभिमानाने भरून आलें होतें. एवढ्यांत सौ. निली कोनाली मागे वळून म्हणाला, " आज तरी तुम्हांला असे म्हणतां येणार नाही की, तुमचें डलासमध्यें थंड स्वागत होत आहे. "

एवढ्यांत मोटारीने एक डौलदार वळण घेतलें. श्री. केनेडी हे सौ. कोनालींना

कांहीतरी उत्तर देणार येवढ्यांत–धाड–असा आवाज आला. श्री. केनेडींनी आपला गळा दाबून धरिला. येवढ्यांत बंदुकीच्या दुसऱ्या गोळीचा आवाज झाला आणि त्या आवाजासरशीं श्री. केनेडी सौ. केनेडींच्या मांडीवर कोसळले. त्यांचा डावा पाय मोटारीच्या दारावर गेला. सौ. केनेडींनी हंबरडा फोडला. आक्रांताने त्या किंचाळल्या–अरेरे, देवा यांना गोळी घालण्यांत आली–नाही–नाही जॅक! असं म्हणून त्यांनी त्यांच्या अंगावर आपलं शरीर झोकून दिलें.

श्री. कोनाली काय झाले हे पाहण्यासाठी मागे वळले, तेवढ्यांत तिसरी गोळी रोरावत आली व त्यांना लागली. तेहि सौ. कोनालींच्या मांडीवर कोसळले. अक्षरश: निमिषार्धात हें सारं घडलं. तेवढ्यांत त्यांच्या मदतीसाठी मोटारीवर चढूं पाहणाऱ्या एका रक्षकाला सौ. केनेडींनी हाताने ओढून वर घेतले व पुनः त्या आपल्या पतीचे डोकें मांडीवर घेऊन बसल्या.

गाडीच्या ड्रायव्हरला काय घडलं आहे याची कल्पना आली. त्याने प्रसंगावधान राखून आपलें वाहन बाजूला घेतलें. "आपण येथून ताबडतोब बाहेर पडूं या" असें म्हणून अक्षरशः वायुवेगाने तो निघाला. पांचच मिनिटांत त्यांची गाडी पार्कलँड मेमोरियल हॉस्पिटलच्या आवारांत शिरली. त्यांच्या मागोमाग श्री. जॉन्सन व टेक्सासचे सिनेटर श्री. राल्फ यार्बरो यांच्या मोटारी आंत आल्या.

सौ. केनडींचें धैर्य खरोखरच अतुलनीय! त्याहि परिस्थितींत त्यांनी श्री. केनेडी यांना गाडींतून स्ट्रेचरवर घ्यावयास मदत केली व ऑपरेशन थिएटर-पर्यंत त्यांच्या छातीवर हात ठेवून त्या चालत गेल्या. डॉ. केम्प क्लार्क या डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण व्यर्थ! कारण वैद्यक शास्त्राच्या दृष्टीने त्यांचा प्राणपक्षी केव्हाच उडून गेला होता. शिल्लक होते ते फक्त त्यांचे शरीर. तेहि छिन्नविच्छिन्न!

हें सर्व होत असतांना सौ. केनेडी त्याच खोलींत हजर होत्या. असहायतेने सारें पाहात होत्या! फसवून पकडलेल्या वाघिणीसारख्या, असहाय, तिरस्काराच्या, घृणेच्या, संतप्त दृष्टीने सारे पाहात होत्या. कारण दुसरं कांही करतां येणें शक्यच नव्हतें.

बरोबर १२–४५ ला दोन कॅथॉलिक धर्मगुरुंनी श्री. केनेडींना ठेवलें होतं, त्या खोलींत प्रवेश केला. त्यांनी शवाच्या कपाळाला तेल लाविलें.

त्यांच्यासाठी प्रार्थना करावयास सुरवात केली. सौ. केनेडी तेथेंच उभ्या होत्या. त्यांनीहि त्यांच्या जॅकसाठी कापऱ्या, आर्त पण स्पष्ट आवाजांत प्रार्थना करावयास सुरवात केली. देवा! माझ्या जॅकच्या हातून कांही पातक घडलं असेल तर त्याला क्षमा कर! देवा, तू दयाळू आहेस! त्याला क्षमा कर— त्याला क्षमा कर!

बंदुकीच्या आवाजासरशीं क्षणभर सर्वत्र शांतता पसरली पण चारदोन मिनिटांत पोलीस व गुप्त पोलीस आपापल्या कामाला लागले. डलास बुक हाऊसच्या सहाव्या मजल्यावरून एक बंदुकीची नळी आंत जातांना दिसत होती...

या सर्व प्रकरणाची काळजीपूर्वक चौकशी केल्यानंतर पोलिसांना ताबडतोब तासाभरांत खुनी सांपडला. पोलिसांतर्फे खुनाची जी हकीगत सांगण्यात येते ती थोडक्यांत पुढीलप्रमाणे आहे—

डलास बुक हाऊसच्या सहाव्या मजल्यावरून ओस्वाल्ड ली हार्वे या खुनीने टेलिस्कोप बसविलेल्या रायफलमधून श्री. केनेडी व कोनाली यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्या इमारतीच्या पांचव्या मजल्यावर पुस्तकाखाली लपविलेली ती बंदूक सापडली. गोळीबार होताच पोलिसांनी धावपळ करून त्या डलास बुक हाऊसच्या इमारतींत प्रवेश केला. तेथे एका छोट्याशा उपाहारगृहात कोक मशिनमधून कोक पिण्यासाठी अनेक लोक जमले होते. त्यांपैकी पोलिसांनी नेमके ओस्वाल्डलाच छेडले. त्या बुक हाऊसच्या सुपरवायझरने सांगितले की, हा इसम येथेंच काम करतो. तेव्हा त्याला सोडून पोलीस पुढे गेले. ओस्वाल्ड जो तिथून निघाला तो काही अंतर चालून गेला व तेथे त्याने बस पकडली. बसमधून आणखी थोडें अंतर गेल्यावर ओस्वाल्ड आपल्या घरीं गेला. तिथे त्याने आपले जाकीट घातले व तो बाहेर पडला व एका टॅक्सीने सिनेमा-गृहापाशी उतरला. एवढ्यांत त्याला एका पोलीस अधिकाऱ्याने–टिपिटने–हटकले. त्याच्यावर ओस्वाल्डने चार गोळ्या झाडून त्याला ठार केलें व तेथून तो एका सिनेमागृहांत गेला व तेथें त्याला पकडण्यात आलें. कारण त्या सिनेमा-गृहातील कॅशियरने फोनवरून पोलिसांना खबर दिली की, एक संशयास्पद माणूस येथे आला आहे.

ओस्वाल्डला पकडून पोलीसांनी त्याला पोलिस-ठाण्यावर नेलें. तेथे तो

सुमारे पंचेचाळीस तास होता. पोलीस ठाण्यांतून त्याला पक्क्या तुरुंगांत नेण्याचा पोलिसांचा विचार होता. पण त्याला पोलीस-कोठडींतून बाहेर काढतांच जॅक रुबी नांवाच्या बावन्न वर्षांच्या गृहस्थाने अगदी जवळून पिस्तूल झाडून त्याचा खून केला. तोपर्यंत श्री. ओस्वाल्ड याला पोलिसांनी ४४ तासापर्यंत सारखे छेडले होते, पण तरीहि त्याने गुन्हा कबूल केला नव्हता. रुबीने ओस्वाल्डला ठार मारल्यामुळे केनेडीचा नेमका खुनी कोण या विषयींचे गूढ कायम राहिलें.

टेक्सस हे राज्य समृद्ध आहे. तेल-खाणीवर पैसा मिळवून गबर झालेले कितीतरी लोक या राज्यांत आहेत. अशाच ली. हंट या नांवाच्या एका करोडपतीने योजनाबद्ध अशा पद्धतीने हा खून करविला, असे म्हणतात.

त्यानंतर हें सर्व प्रकरण ज्या पद्धतीने निकालांत काढण्याचा यशस्वी प्रयत्न अमेरिकेंत केला जातो तो पाहिला म्हणजे श्री. केनेडींच्या खुनाचे गूढ अधिकच वाढते. ओस्वाल्ड हा खुनी होता व त्याने डलास बुक हाऊस या बिल्डिंगमधून गोळ्या झाडून श्री. केनेडींचा खून केला, असें जर गृहीत धरले तर ज्या पद्धतीने गोळ्या लागल्या असत्या, तशा गोळ्या श्री. केनेडींना लागलेल्या नाहीत. उदाहरणार्थ, श्री. केनेडींना घशाजवळ लागलेली गोळी पुढच्या बाजूने शरीरांत शिरली असें डॉक्टरांनी प्रथम सांगितले होते. पण नंतर हें आपलें म्हणणे त्यांनी बदलले. पण त्याबद्दल चर्चा करायला ते तयार नाहीत.

श्री. केनेडी ज्या मोटारींतून प्रवास करीत होते त्या मोटारीच्या विंडस्क्रीनमधून गोळी आली व त्यामुळे त्या विंडस्क्रीनला भोक पडलें आहे असें म्हणतात. याचाच अर्थ गोळीबार पुढील बाजूने करण्यांत आला असा होतो. हा विंडस्क्रीन बदलण्यांत आला असून तो तूर्त पोलिसांच्या ताब्यांत आहे व कुणालाही तो पाहण्याची परवानगी देण्यांत येत नाही.

ली ओस्वाल्डची पॅराफिन टेस्ट करण्यांत आली, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील पॅराफिन टेस्ट ही नकारदर्शक आली. जर त्याने गोळ्या झाडल्या असत्या तर ही पॅराफिन टेस्ट निश्चितपणे करणात्मक ( Positive ) आली असती, असें तज्ज्ञांचे मत आहे.

सुमारे १२-३० ते १२-३१ च्या दरम्यान श्री. केनेडींवर गोळ्या झाडण्यांत आल्या. त्यानंतर ओस्वाल्ड ज्या घरांत रहात होता त्या घराच्या दारांत तो

सुमारे एक वाजता पोचला, असा पोलिसांचा अहवाल सांगतो. हें जर खरें मानलें तर फार पंचाईत येते. कारण ओस्वाल्डने गोळ्या झाडल्या व सहाव्या मजल्यावरून तो पायी खाली उतरला. ( कारण त्या इमारतीचा लिफ्ट नादुरुस्त होता. ) मग त्याने कोक यंत्रातून पैसे टाकून ते पेय घेतलें. त्यानंतर तो कांही इमारती ओलांडून गेला. तेथे त्याने बस पकडली. बसमधून त्याने थोडा वेळ प्रवास केला. त्यानंतर त्याने एक टॅक्सी ठरविली व टॅक्सीने तो जवळजवळ चार मैल गेला व घरीं एक वाजता पोचला असे जर गृहीत धरलें तर तें शक्य वाटत नाहीं. कारण रस्त्यांत भरपूर गर्दी होती व त्यामुळे जास्तीतजास्त दहा मैल वेगाने टॅक्सी जाऊं शकली असती. त्यापेक्षा अधिक वेगाने ती जाणेंच शक्य नव्हते. म्हणून तो एक वाजता घरीं पोचला हें जर बरोबर असेल तर तो डलास बुक हाऊसमध्ये असणे शक्य नाही.

डलास डिस्ट्रिक्टचे ॲटर्नी जनरल श्री. वेड ( Wade ) यांनी आपल्या निकालपत्रांत पुष्कळ कोलांट्या उड्या मारल्या आहेत. ज्या टॅक्सी ड्रायव्हरने ओस्वाल्डला नेले त्या टॅक्सी ड्रायव्हरचें नांव डॅरियल क्रिक असें आहे असें श्री. वेड यांनी सांगितलें होतें. परंतु नंतर खाजगी चौकशींत अशी माहिती मिळाली की, श्री. क्रिक यांनी टेक्सासमध्ये कधी टॅक्सी हाकण्याचें कामच केलें नव्हतें. हें कळतांच श्री. वेडने आपलें म्हणणें बदललें.

ओस्वाल्ड हाच जर खरा खुनी होता तर त्याने खून योजनापूर्वक केला होता. मग त्याला खून करतांच पळून जाण्याऐवजी घरीं जाणें आवश्यक आहे, असें कां वाटावें. जर तो आपलें जाकीट आणण्यासाठी घरीं गेला असें अटर्नी जनरलने सांगितले आहे तेंच बरोबर असें मानले तर तशी जरूरी नव्हती. कारण बाहेर उकाडा होत होता. शिवाय क्षणभर असें गृहीत धरलें तरी जो मनुष्य पळून जाणार आहे, निदान तसा प्रयत्न करणार आहे, तर तो आपल्या-पाशीं पुरेसे पैसे घेईल की नाही ? ॲटर्नी जनरलने तर असें सांगितलें आहे की, त्याला पकडला तेव्हा त्याच्याकडे फक्त तेरा चौदा डॉलरच काय ते होते. उलट त्याच्या घरीं मात्र दीडशें डॉलर रोकडीच्या स्वरूपांत होते. हें कितपत संभवनीय वाटतें ? ही सर्व पद्धति पूर्वनियोजित असावी, असें वाटत नाही आणि एवढ्या मोठ्या माणसाचा खून करण्याचा निर्णय घेणारी व्यक्ति पळून जाण्याची योजना केल्याशिवाय कशी राहील ?

ओस्वाल्डला प्रथम टिपिट या पोलीस अधिकाऱ्याचा खून केल्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलें. पुन: हा पोलीस अधिकाऱ्याच्या खुनाचा खटलाहि गुप्तच होता. श्री. वेड यांनी असें सांगितलें आहे की, यापेक्षा कमी पुरावा असतांनासुद्धा त्यांनी तेवीस लोकांना फाशी दिलें आहे, ( विजेरी खुर्चीवर बसवून ) पण याहि बाबतींत पुष्कळ कच्चे दुवे सांपडतात. प्रथम श्री. वेड यांनी असें सांगितलें होतें की ओस्वाल्डला पकडण्याचा प्रयत्न करण्यात आला, तेव्हा त्याने पिस्तुलाने गोळी झाडली. पण सुदैवाने गोळी उडाली नाही. ही न उडालेली गोळी आपल्यापाशीं पुरावा म्हणून दाखल आहे. पण नंतर प्रत्यक्ष ओस्वाल्डला पकडणाऱ्या पोलिसाने जेव्हा शपथेवर असें सांगितलें की, ओस्वाल्डने गोळी झाडण्याच्या अगोदरच मी त्याच्या पिस्तुलावर पकड मिळविली वगैरे.

ही जबानी होतांच श्री. वेड यांनी आपलें म्हणणें या जबानीशीं मिळतें जुळतें होईल अशा पद्धतीने पुन: बदललें. बरें, ज्या पिस्तुलानें टिपिट या पोलीस अधिकाऱ्याचा खून करण्यांत आला, तें पिस्तुल व ओस्वाल्डला पकडताच त्याचेपाशीं सापडलेलें पिस्तूल याबद्दल श्री वेड यांनी पूर्णपणे मौन पाळलें आहे. हेंसुद्धा एक गूढच नव्हें काय ?

टिपिट यांना ज्या वेळीं मारण्यांत आलें तेव्हा तेथे प्रत्यक्ष हजर असलेल्या एका साक्षीदाराने टिपिटला मारणाऱ्या व्यक्तीचें वर्णन असें केलें आहे की तो ठेंगणा, लठ्ठ व झुपकेदार केसांचा माणूस होता. ओस्वाल्डचीं जीं छायाचित्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यावरून तरी असें वाटतें की तो ठेंगणा असेल कदाचित् पण किरकोळ शरीर प्रकृतीचा व थोडेसे टक्कल पडलेला असा असावा. ही वस्तुस्थितीहि फारशी समाधानकारक नाही.

या सर्व खटल्याची प्रथमपासून शेवटपर्यंत बारकाईने छाननी केली तर असें दिसतें की, यामध्ये पोलीस व इतर सरकारी अधिकारी यांची पुष्कळ ठिकाणी संशयास्पद अशी वागणूक दिसून येते. सर्व चौकशी करतांना पोलिसांनी ओस्वाल्ड हाच खरा खुनी आहे, असें पूर्णपणे गृहीत धरलें आहे अशी शंका येते. खरें म्हणजे न्यायाच्या दृष्टीने असें गृहीत धरणे पूर्णपणे चुकीचें आहे.

जॅक रुबीने ओस्वाल्डचा सर्वांसमक्ष खून केला हें पाहणारे कित्येक साक्षीदार होते. ओस्वाल्डने खून केला की नाही हें परिस्थितिजन्य पुराव्यावरून

टरविणें भाग होतें. अशा परिस्थितींत जॅक रुबीला मात्र तीन तीन वकिलांचा सल्ला घेण्याची मुभा मिळणे व ओस्वाल्डला मात्र वकिलाचा सल्ला घेण्याची मुभा न मिळणें या गोष्टी काय दर्शवितात?

आता जवळजवळ असें सिद्ध करण्यांत आलें आहे की, ओस्वाल्ड हाच खुनी होता. मग या खटल्यांत ज्या साक्षीदारांची वेळोवेळीं साक्ष किंवा जबानी घेण्यांत आली ते सर्व साक्षीदार वर्तमानपत्रांच्या बातमीदारांशीं याबद्दल बोलायचें का टाळतात? तशी त्यांना पोलिसांकडून 'समज' तर देण्यांत आली नसेल ना?

ओस्वाल्डची पत्नी श्री. मरीना ओस्वाल्ड अजूनहि गुप्त पोलिसांच्याच ताब्यांत आहे. तिला कुणालाहि भेटूं दिलें जात नाही. तिच्या सासूलासुद्धा तिला भेटूं दिलें जात नाही. तिच्या परिचितांपैकी कुणाशींहि तिला स्वतंत्रपणे कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवतां येत नाही. तिला पाठविलेलीं पत्रें किंवा तिच्याकडून येणारीं पत्रें प्रथम "सेंसॉर" केलीं जातात. कोणत्याहि वर्तमान-पत्राच्या वार्ताहराला श्रीमति ओस्वाल्ड यांना भेटूं दिलेलें नाही. जर सत्य प्रस्थापित झालेलेंच आहे तर मग ही गुप्तता कशासाठी पाळण्यांत येत आहे?

ओस्वाल्ड हाच खुनी होता हें सिद्ध करण्याचा डलास येथील पोलीस अधिकाऱ्यांचा आटापिटा पाहिला आणि यासंबंधी आतापर्यंत पुढे करण्यांत आलेला पुरावा पाहिला म्हणजे असे वाटते की 'येन केन प्रकारेण' हा खटला संपविण्याचा प्रयत्न चालू आहे. एकदा का ओस्वाल्ड हाच खुनी आहे असें न्यायालयीन चौकशीने सिद्ध झालें, म्हणजे सुटलों एकदाचें असें या प्रकरणांत पोलिसांना होऊन गेलें असावे.

ओस्वाल्डचेंच नांव घेण्यांत एफ. बी. आय किंवा सी. आय्. ए. या संघटनांचें काय उद्दिष्ट असावें, तसेंच या दोन्ही गुप्त पोलीस संस्था या बाबतींत पूर्णपणे एकमेकांशीं सहमत कां आहेत अशी एक शंका मनांत येऊन जाते.

याव्यतिरिक्त ओस्वाल्डविषयी उपलब्ध असलेली इतर माहिती पाहिली म्हणजे आणखी निराळेच संशय मनांत येतात. उदाहरणार्थ, ओस्वाल्ड हा जेव्हा

नोकरी करी तेव्हा त्याला कमीत कमी पगार मिळे. पुष्कळदा तो बेकार असे. असे असतांना त्याला वरचेवर मेक्सिकोला जाऊन येणे शक्य होई. राजकीय वाङ्मय किंवा पुस्तिका प्रकाशित करण्यासाठी आवश्यक ते पैसे त्याचेपाशीं असत. एवढेंच काय पण तो रशियाविरुद्ध लिहीत असलेलें पुस्तक लिहिण्यासाठी लघुलेखक ठेवण्याइतकी त्याला ऐपत होती.

एफ् बी. आय्. ने पूर्वी असें मान्य केलें होतें की ओस्वाल्डला मनिऑर्डरनें पुष्कळदा पैसे येत असत. पण हे पैसे कुठून येत असत तें मात्र या संस्थेने गुप्त ठेविले आहे. असें कां ?

ओस्वाल्ड यास जेव्हा पकडण्यांत आलें तेव्हा त्याचेपाशीं अनेक फोन नंबर व मोटारच्या परवान्याचे नंबर सापडले. हे फोन नंबर संशयास्पद हालचाली करणाऱ्या लोकांवर लक्ष ठेवणाऱ्या खास गुप्त पोलिसांचे होते. हे नंबर टेलिफोन डिरेक्टरीमध्ये मिळणें शक्य नाही—असें असता ते ओस्वाल्डपाशीं कुठून आले ?

फेअर प्ले फॉर क्यूबा या समितीमध्ये ओस्वाल्ड काम करीत असें, हें एफ्. बी. आय्. ला माहीत होतें. तरीहि ओस्वाल्डवर पोलिसांचें लक्ष कां नसावें ?

श्री. केनेडी टेक्ससला आले, त्यापूर्वीच्या रात्रीं केनेडींचें चित्र छापून खाली "पाहिजे—जिवंत किंवा मृत" असें छापलेलें भित्तिफलक डलासमध्ये कित्येक ठिकाणीं लावण्यांत आले होते. त्यांची गुप्तचरांना दाद कां नसावी ?

ओस्वाल्ड हा कास्ट्रोवादी आहे, हें पोलिसांना माहीत होतें, तरीहि त्याला तावडतोब म्हणजे चोवीस तासांत मेक्सिकोला जाण्यास पासपोर्ट कसा मिळाला ? पुढे रशियांत जाण्यास मात्र त्याला तेथून पासपोर्ट मिळाला नाही.

हे सर्व पाहिलें म्हणजे असा संशय येतो की ओस्वाल्ड हा गुप्त पोलीसखात्याचाच तर नोकर नसेल ना ?

या खटल्याची पूर्ण चौकशी करण्यासाठी वॉरन कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनमध्ये श्री. वॉरन डल्लेस, जॉन मॅक्कॉय वगैरे बड्या लोकांचा समावेश करण्यांत आलेला आहे, परंतु हें कमिशनसुद्धा सर्व चौकशी गुप्तपणेच करीत आहे. किंबहुना डलास पोलीस खात्याने तयार केलेल्या खटल्याचाच पुनर्विचार करीत आहे. त्यामुळे या कमिशनच्या अहवालांतून काही अधिक माहिती बाहेर येईल असें वाटत नाही.

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होईल की श्री. केनेडी यांच्या खून-खटल्यांत वरवर दिसतात किंवा भासविण्यांत येतात, त्यापेक्षा अधिक लोकांचे व उच्चपदस्थ लोकांचे हात गुंतलेले असावेत व त्यामुळेच असें वाटतें की, आतापर्यंत माहीत झाले आहे त्यापेक्षा अधिक कांही माहीत होईल असें वाटत नाही. तें कांहीहि असो, श्री. केनेडी जरी मृत्युमुखी पडले असले तरी त्यांचें कर्तृत्व मात्र अमेरिकन लोकांच्या हृत्पटलावर कोरलेलें आहे. मृत्यूवर त्यांनी मात केली आहे हे खास!


● ● ●



गंगाधरशास्त्री पटवर्धन.



जॉन विल्किन्स बूथ.



प्रे. अब्राहम लिंकन.






बूथ लिंकनच्या बॉक्समधून उडी घेत असतांन



लुइस पाइन व डव्हिड हेरॉल्ड.

परराष्ट्रमंत्री सेवार्ड यांचा खून करण्याची कामगिरी या दोघांवर होती.



८

मेरी सुराट, लुई रेने, डेव्हिड हेरॉल्ड व जॉर्ज अॅट्झेरॉट
यांना फाशी देताना. दि. ९ जुलै १८६५.

जॉर्ज अॅट्झेरॉट.
उपाध्यक्ष अॅंड्रू जॉन्सन यांना मारण्याची
कामगिरी याच्यावर होती.





ट्रॉट्स्की आणि नटालिया.



लिऑन ट्रॉट्स्की.



खुनी जॅक्सन



ट्रॉट्स्कीचे अंत्यदर्शन.




मेजर जनरल ऑँगसॉन. युद्धमंत्री १९४३.



आझाद ब्रह्मदेश सेनेंतील ऑग सॉन.



पंतप्रधान सॉलोमन बंदरनायके.



पं नेहरूंच्या समवेत बंदरनायके कुटुंब.




श्री. डाग हॅमरशील्ड.




या धनदाट झाडींत हॅमरशील्ड यांचे विमान कोसळले.




प्रे. जॉन फिट्झेरॉल्ड केनेडी.



टेक्सास स्कूल डिपॉझिटरी
कौंटी रेकॉर्ड्स बिल्डिंग
खुन्याची खिडकी
कौंटी क्रिमिनल कोर्टस बिल्डिंग
एल्म स्ट्रीट
मोटारींसाठी रस्ता
ओल्ड कोर्ट हाऊस



या खिडकीतून खुनीने बाणाने दाखविलेल्या केनेडींच्या मोटारीवर गोळी झाडली.



गोळी लागतांच श्री. केनेडी आपल्या मागच्या सीटवर कलले. त्यांच्या भयचकित पत्नी आणि एक शरीररक्षक त्यांना मदत करीत असतां.




सब-मशीनगन्स घेऊन तयार असलेल्या सीक्रट सर्व्हिसमधील माणसांच्या पहाऱ्यांत केनेडींची मोटार हॉस्पिटलकडे भरधांव निघाली.



भयचकित झालेल्या कांही प्रेक्षकांनी तर जमिनीवर बसकणच मारली तर कांही छायाचित्रकार त्या दुःखद प्रसंगाचे छायाचित्रण करत होते.




जॅक रुबी ओस्वाल्डचा खून करताना.



हीच ती दुर्बिण लावलेली बंदूक.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ दि ............
क्रमांक ............ कॅ दि ............



REFBK-0014449

ली हार्वे ओस्वाल्ड
याने खून केल्याचे जाहीर करण्यांत आले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४४४९

REFBK-0010323